अकोला । सोमवार
दि. १६ जून २०२५
वर्ष : १९ अंक : १०६
पाने : ८ + ४

दैनिक **अजिंक्य भारत** बातम्यांचा गतिमान पाठलाग

स्वागत मूल्य ३ रुपये



# इंद्रायणी नदीवरील पूल कोसळला ; ६ जणांचा मृत्यू

## २५ पर्यटक नदीत गेले वाहून ; ३२ लोक जखमी, ६ गंभीर

**पुणे : दि. १५वृत्तसंस्था**

मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील जुना पूल रविवारी (१५ जून) दुपारी अचानक कोसळला. या भीषण दुर्घटनेत ६ जणांचा मृत्यू झाला असून, २५ पर्यटक नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

रविवारी सुट्टीचा दिवस असल्याने कुंडमळा या प्रसिद्ध पर्यटनस्थळी पर्यटकांची मोठी गर्दी होती. दुपारी साडेतीनच्या सुमारास पूल अचानक कोसळला. यावेळी अनेक पर्यटक आणि काही लहान मुले पुलावर उपस्थित होती.

पूल कोसळताच अनेकजण थेट नदीत पडले आणि जोरदार प्रवाहात वाहून गेले. या घटनेनंतर घटनास्थळी मोठा गोंधळ उडाला. घटनास्थळी पिंपरी-चिंचवड पोलीस, आपत्ती व्यवस्थापन पथक आणि स्थानिक प्रशासन दाखल झाले असून, बचावकार्य युद्धपातळीवर सुरू आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या घटनेसंदर्भात विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक आणि संबधित तहसीलदार यांच्याशी मी सातत्याने संपर्कात आहे. काही जण वाहून गेल्याने त्यांचा युद्धपातळीवर शोध घेतला जात आहे. घटनास्थळी एनडीआरएफला पाचरण करण्यात आले आहे. अंधार पडल्याने बचावकार्यात अडथळा येत आहेत. तरीदेखील लाईट लावून बचावकार्य सुरु आहे. तुटलेल्या पुलाच्या सांगाड्याखाली अजूनही काही जण अडकले आहेत. त्यांना बाहेर काढण्यासाठी क्रेनच्या सहाय्याने पुलाचे भाग काढले जात आहेत. या दुर्घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण आहे. मावळचे आमदार सुनिल शेळके यांनी घटनास्थळी येऊन बचावकार्याबाबत सुचना दिल्या. यावेळी आमदार शेळके म्हणाले की, कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवरील पूल जुना असून या परिसरातील शेतकऱ्यांसाठी ये -जा करण्यासाठी हा पूल बांधलेला होता. परंतु, आज या पुलावर मोठ्या संख्येने पर्यटक आल्याने भार सहन न झाल्याने पूल कोसळला. त्यातच दुचाकीवरूनही पर्यटक आले होते. त्यामुळे ही दुर्घटना घडली.



या घटनेत एक वृद्ध पाण्याखाली अडकला होता. त्याचं तोंड पाण्याबाहेर होतं. तर बाकीचं शरीर हे पुलाच्या सांगाड्याखाली अडकलं होतं. गेल्या तीन तासांपासून त्याला बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरु होते. पण बचाव पथकाला यश मिळताना दिसत नव्हतं. अखेर एनडीआरएफच्या पथकाला कटरच्या सहाय्याने लोखंडी पुलाचे भाग कापावे लागले. त्यानंतर पथकाला वृद्धाला बाहेर काढण्यात यश आलं.

### यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश– फडणवीस



इंद्रायणी नदीवरील पूल कोसळून झालेल्या दुर्घटनेबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी, या घटनेत प्राथमिक माहितीनुसार २ लोकांचा मृत्यू झाला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, अशी भावना व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, '६ जणांना आतापर्यंत वाचविण्यात यश आले आहे. सर्व यंत्रणांना अलर्ट मोडवर ठेवण्याचे आदेश दिले आहेत. ३२ लोक जखमी झाले असून त्यापैकी ६ गंभीर आहेत. त्यांना उपचारांसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### सखोल चौकशी होणार– शिंदे



ही घटना कशी घडली, याबद्दल मी जिल्हाधिकाऱ्यांना बोललो आहे. याबाबत चौकशी होईल. जे जखमी आहेत, त्यांचे जीव वाचवून त्यांना चांगले उपचार देण्यासाठी आपले प्राधान्य आहे. नवीन पुलाची वर्कऑर्डर १० जूनला दिली असल्याचेही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले.

### हे अतिशय खेदजनक– पवार



या घटनेवर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दुःख व्यक्त केलं आहे. अतिशय खेदजनक आहे. उपस्थित पर्यटक, स्थानिक ग्रामस्थ, पोलीस यंत्रणा व राष्ट्रीय आपत्ती निवारण दलतर्फे बचावकार्य सुरु आहे, त्याद्वारे अनेकांना वाचविण्यात यश यावं तसंच जखमींना यथायोग्य उपचार मिळोत, अशी प्रार्थना करतो. दुर्घटनेत ज्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो व त्यांच्या कुटूंबियांप्रती सहवेदना व्यक्त करतो, अशी भावना शरद पवारांनी व्यक्त केली आहे.

### मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची मदत– महाजन



मंत्री गिरीश महाजन हे घटनास्थळी दाखल झाले असून त्यांनी मृतांच्या नातेवाईकांना ५ लाखांची मदत दिली जाणार असल्याची घोषणा केली. अतिशय दुर्देवी अशी ही घटना आहे. हा पादचाऱ्यांसाठी पूल होता. जूना होता, १९९२ पासून हा पूल होता. पर्यटकांची मोठी गर्दी होती. या पुलाला आतमध्ये कोणताही सपोर्ट नव्हता. लोक आतल्या भागावर येऊन मोठ्या संख्येने उभा राहिले आणि मग तो पूल कोसळला, त्यातून ही घटना घडली.

### १२५ पर्यटक वर्षा विहारासाठी आले

मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील इंद्रायणी नदीवर आजुबाजूच्या गावांना जोडणारा लोखंडी पूल आहे. सदर लोखंडी पूल हा सुमारे ३० वर्ष जुना आहे. हा पूल तीन महिन्यांपासून वाहतुकीसाठी बंद होता, परंतु तरीही तो खुला होता आणि पर्यटक तिथे पोहोचले. पुलाची स्थिती आधीच वाईट होती. मुसळधार पावसामुळे नदीचे पाणी वेगाने वाढले आणि पाण्याचा प्रवाह इतका वेगवान होता की पूल कोसळला. या अपघातात सुमारे २५ ते ३० लोक नदीच्या जोरदार प्रवाहात वाहून गेल्याची भीती आहे.

### काही मोटारसायकलीसुद्धा वाहून गेल्या

रविवार असल्याने पर्यटकांची संख्या जास्त होती, त्यामुळे हानी मोठ्या प्रमाणावर झाली आहे. काही मोटारसायकलीसुद्धा नदीच्या प्रवाहात वाहून गेल्याची माहिती आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पूल कोसळल्यानंतर तातडीने बचावकार्य सुरू करण्यात आले. स्थानिक प्रशासन, अग्निशमन दल आणि राष्ट्रीय आपत्ती निवारण दल यांच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. सध्या बचावकार्य जोरात सुरू असून, अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

## झिपलाइन करताना दोरी तुटून मुलगी दरीत कोसळली!

**मनाली (हिमाचल प्रदेश) :** हिमाचल प्रदेशातील प्रसिद्ध पर्यटनस्थळ मनाली येथे सहलीसाठी गेलेल्या नागपूरच्या १२ वर्षीय त्रिशा बिजवे या मुलीच्या साहसी झिपलाइन राईडने एक भयावह वळण घेतले. झिपलाइन चालू असताना हार्नेसला जोडलेली दोरी तुटल्याने त्रिशा थेट खडकाळ दरीत कोसळली.

या घटनेत त्रिशा गंभीर जखमी झाली असून सध्या तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही धक्कादायक घटना मागील आठवड्यात घडली असून, तिचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. त्रिशा बिजवे आपल्या कुटुंबासोबत मनालीला सुट्टीसाठी गेली होती. झिपलाइन राईड करत असताना अचानक तिच्या हार्नेसला जोडलेली सुरक्षा दोरी तुटली आणि ती सुमारे ३० फूट खोल खडकाळ दरीत कोसळली. या घटनेचा व्हिडिओ उपस्थित पर्यटकांनी चित्रित केला असून, तो सोशल मीडियावर



झपाट्याने व्हायरल झाला आहे. त्रिशाला तातडीने जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, जिथे तिच्यावर उपचार सुरू आहेत. कुटुंबीयांच्या माहितीनुसार, त्रिशाला या अपघातात अनेक ठिकाणी फ्रॅक्चर झाले असून काही दिवसांपूर्वी तिच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. तिच्या वडिलांनी प्रफुल्ल बिजवे यांनी सांगितले की, त्रिशाची प्रकृती सध्या स्थिर आहे. डॉक्टरांचे पथक सातत्याने तिच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून आहे. बिजवे कुटुंबाने झिपलाईन ऑपरेटरवर गंभीर निष्काळजीपणाचा आरोप करत, सुरक्षा व्यवस्थेचा संपूर्ण अभाव होता असे सांगितले आहे.

## केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर कोसळले ; पायलटसह ७ ठार



**केदारनाथ: दि. १५वृत्तसंस्था**

केदारनाथ धामहून गुप्तकाशीला जाणारे हेलिकॉप्टर रविवारी पहाटे गौरीकुंडच्या जंगलात कोसळले. यात पायलटसह ७ जणांचा मृत्यू झाला. या अपघातानंतर, चार धाम प्रदेशात चालणाऱ्या हेलिकॉप्टर सेवा स्थगित करण्यात आल्या.मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी सकाळी आर्यन कंपनीचे हेलिकॉप्टर कोसळले. ही दुर्घटना गौरीकुंड परिसरात घडली. सकाळी ५.३० वाजता ही घटना घडल्याचे सांगण्यात येत आहे. खराब हवामानामुळे हेलिकॉप्टर कोसळल्याची प्राथमिक माहीती मिळत आहे. हेलिकॉप्टर नोडल अधिकारी राहुल चौबे आणि जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी नंदन सिंह रजवार यांनी हेलिकॉप्टर कोसळल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला. गौरीकुंडच्या वर गवत कापत असलेल्या नेपाळी वंशाच्या महिलांनी (पान २ वर)

### चार धाममध्ये हेलिकॉप्टर सेवेवर बंदी

देहरादून : चार धाम यात्रेदरम्यान उपलब्ध असलेल्या हेलिकॉप्टर सेवेवर बंदी घालण्यात आली आहे. उत्तराखंडमधील केदारनाथ येथे आज (दि.१५) झालेल्या हेलिकॉप्टर अपघातानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. यूकेएडीए आणि डीजीसीएने पुढील आदेश येईपर्यंत या सेवेवर बंदी घातली आहे. यासोबतच, उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी राज्यात हेलिकॉप्टर ऑपरेशन्सबाबत एसओपी तयार करण्याचे कडक निर्देश दिले आहेत. उत्तराखंडमधील केदारनाथ येथे झालेल्या हेलिकॉप्टर अपघाताला गांभीर्याने घेत मुख्यमंत्री धामी यांनी हेलिकॉप्टर ऑपरेशन्सबाबत कडक सूचना जारी केल्या आहेत. राज्यात हेलिकॉप्टर सेवांच्या संचालनासाठी एक कठोर एसओपी तयार करावी, ज्यामध्ये हेलिकॉप्टरच्या तांत्रिक स्थितीची संपूर्ण तपासणी करणे आणि उड्डाणापूर्वी अचूक हवामान माहिती घेणे अनिवार्य करावे, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. तसेच मुख्यमंत्र्यांनी मुख्य सचिवांना तांत्रिक तज्ञांची एक समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत, जी हेलिकॉप्टर ऑपरेशन्सच्या सर्व तांत्रिक आणि सुरक्षितता (पान २ वर)

## ब्लॅक संडे

## नांदेडमध्ये गोदा पात्रात बुडून पाच भाविकांचा मृत्यू !

नांदेडमध्ये गोदा पात्रात बुडून पाच भाविकांचा मृत्यू झाला असल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. नांदेड – तेलंगणा सीमेलगत बासर येथे श्री सरस्वती देवस्थान आहे. या ठिकाणी दर्शनाला गेलेल्या ५ भाविकांचा गोदावरी पात्रात बुडून मृत्यू झाला आहे. हे भाविक तेलंगणातील असल्याची माहिती समोर येत आहे. श्री सरस्वती क्षेत्राच्या दर्शनासाठी येथे भाविकांची गर्दी असते. हैद्राबादमधील कुटुंबातील १८ जण या ठिकाणी दर्शनासाठी आले होते. दर्शन करण्यापूर्वी नदीपात्रात स्नान करताना पाण्याचा अंदाज आला नाही आणि त्यात कुटुंबातील ५ जण बुडाले. हे सर्वजण १७ ते १८ वयोगटातील आहेत.



### माथेरान: शोर्लोट तलाव येथे तीन पर्यटक बुडाले

माथेरान या पर्यटनस्थळाला मुंबई परिसरातील असंख्य लोक भेट देतात. दरम्यान आज याठिकाणी मोठी दुर्घटना घडली आहे. येथील शोर्लोट तलाव येथे तीन पर्यटक बुडाल्याची माहिती समोर येत आहे. नवी मुंबईचे हे पर्यटक आहेत. एकूण १० जण याठिकाणी पोहण्यासाठी उतरले होते. तलावातील पाण्याचा अंदाज न आल्याने तीन तरुणांना जीव गमवावा लागला आहे. येथे प्रशासनातर्फे बचाव कार्य सुरू आहे.

## मथुरा येथे उत्खनन करताना ६ घरे कोसळली!

### १२ हून अधिक लोक गाडले, ३ जणांचा मृत्यू

**मथुरा: दि. १५वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील मथुरा येथे एकत्रितपणे ६ घरे कोसळल्याची घटना समोर आली आहे. ढिगाऱ्याखाली गाडल्याने ३ जणांचा मृत्यू झाला आहे. त्याच वेळी, अजूनही अनेक लोक ढिगाऱ्याखाली गाडले गेल्याचे वृत्त आहे, त्यांना बाहेर काढण्यासाठी बचाव कार्य सुरू आहे.

अचानक घरे कोसळल्याने परिसरात गोंधळ उडाला. येथील कुंपणात (मोकळ्या जमिनीवर) जेसीबीने उत्खनन सुरू असल्याचे स्थानिक लोकांनी सांगितले. याच दरम्यान



ही दुर्घटना घडली आहे. मथुराच्या गोविंद नगर पोलीस स्टेशन परिसरात ही घटना घडली आहे. ही घरे कच्च्या ढिगाऱ्यावर बांधली गेली होती. घरे कोसळल्याचा आवाज ऐकून जवळपास राहणारे लोक घराबाहेर पडले. नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

### ६ घरे अचानक कोसळली :

रविवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास ही दुर्घटना घडली. आतापर्यंत ३ जणांचा मृत्यू झाला आहे. ४ जणांना ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले आहे. १०–१२ जण अजूनही गाडले गेल्याचे वृत्त आहे. ढिगाऱ्याखाली दबलेल्या लोकांना बाहेर काढण्यासाठी बचावकार्य सुरू आहे. घटनेची माहिती मिळताच पोलीस, महानगरपालिका, प्रशासन आणि अग्निशमन दलाचे पथक घटनास्थळी पोहोचले. बचावकार्य सुरू आहे. मृतांची ओळख तोताराम (३८), यशोदा (६) आणि काव्या (३) अशी झाली आहे.

## पान 1 वरून...

### केदारनाथमध्ये हेलिकॉप्टर ..

हेलिकॉप्टर कोसळल्याची माहिती दिली. उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी हेलिकॉप्टर अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले. एसडीआरएफ, स्थानिक प्रशासन आणि इतर बचाव पथके मदत आणि बचाव कार्य करत असल्याचे त्यांनी सांगितले. यापूर्वी, उत्तरकाशी जिल्ह्यात ८ मे रोजी सकाळी एक हेलिकॉप्टर कोसळले होते. या दुर्घटनेत पायलटसह सहा जणांचा मृत्यू झाला होता. अपघाताची माहिती मिळताच पोलीस–प्रशासनासह आपत्ती व्यवस्थापन पथक घटनास्थळी पोहोचले. गंगोत्री राष्ट्रीय महामार्गावर गंगनानीजवळ हेलिकॉप्टर कोसळल्याची माहिती मिळताच पोलीस, एसडीआरएफ, अग्निशमन दल, वैद्यकीय पथक आणि इतर आपत्कालीन मदत पथके घटनास्थळी पोहोचली होती. हे हेलिकॉप्टर एअरोट्रान्स कंपनीचे होते, ज्याने ८ मे रोजी सकाळी सहस्त्रधारा हेलिपॅडवरून हर्षिलसाठी उड्डाण केले होते. हेलिकॉप्टरमध्ये पायलटसह सात जण होते, त्यापैकी सहा प्रवाशांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. एक प्रवासी जखमी झाला होता. हेलिकॉप्टरमधील चार प्रवासी मुंबईचे तर दोन आंध्र प्रदेशचे होते.

### चार धाममध्ये हेलिकॉप्टर ...

पैलूंचा सखोल आढावा घेऊन एसओपी तयार करेल. ही समिती हेलिकॉप्टर सेवेचे संचालन पूर्णपणे सुरक्षित, पारदर्शक आणि निर्धारित मानकांनुसार आहे याची खात्री करेल. हेलिकॉप्टर अपघातांच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीने या प्रकरणी अहवाल सादर करावा, असे निर्देशही मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. ही समिती राज्यातील हेलिकॉप्टर अपघातांची चौकशी करेल. या चौकशीत रविवारी (दि.१५) झालेल्या अपघाताचा तसेच जुन्या घटनांचा समावेश असेल. ही समिती प्रत्येक घटनेची कारणे सखोलपणे तपासेल आणि दोषी व्यक्ती किंवा संस्थांची ओळख पटवून त्यांच्यावर कठोर कारवाईची मागणी करेल. मुख्यमंत्री म्हणाले की, राज्यातील हेलिकॉप्टर सेवांचे महत्त्व तीर्थयात्रा, आपत्ती व्यवस्थापन आणि आपत्कालीन सेवांसाठी खूप मोठे आहे, त्यामुळे यामध्ये सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल.

# आठवडी बाजारातील शासकीय जागेवर अवैध धंदे



। गणेश खडसे ।

### असा कोणताही जुगार सुरू नाही : ठाणेदार नरेश रणधीर

अवधूतवाडी पोलिस ठाण्याच्या हद्दीत शासकीय जागेवर कुठेही जुगार, मटका सुरू नाही, अशी प्रतिक्रिया ठाणेदार नरेश रणधीर यांनी दिली.

### शासकीय जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांची गय केली जाणार नाही : मुख्याधिकारी शुभम क्यातमवार

यवतमाळ शहरातील अनेक ठिकाणचे अतिक्रमण काढून रस्ते मोकळे करण्यात आले. मात्र, आठवडी बाजार परिसरात केवळ भाजी विक्रेते इतर व्यवसायासाठी जागा उपलब्ध करून दिली आहे. मात्र, आठवडी बाजार परिसरात सुरु असलेल्या जुगाराची माहिती या अगोदरही प्राप्त झाली होती, आता त्यावर कारवाई करण्यात येईल. यासाठी पोलिसांची मदत घेणार असून पोलिस अधीक्षकांना पत्र देणार असल्याची माहिती मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांनी दिली.

### अवैध मटका जुगारावर तातडीने कारवाई करणार : 'एलसीबी'प्रमुख सतीश चवरे

न.प.च्या शासकीय जागेवर सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर तातडीने कारवाई करण्यात येईल. त्यासोबतच बांधकाम करण्यात आलेले शेड सुद्धा काढून टाकण्यात येईल. त्यासाठी पोलिस पथक पाठविण्यात येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखा प्रमुख सतीश चवरे यांनी दिली.

**यवतमाळ, दि. १५ :** शहरातील नगरपरिषदेच्या आठवडी बाजार परिसरातील शासकीय जागेवर खुलेआम मटका व जुगार सुरू आहे. विशेष म्हणजे जुगार अड्डा चालकाने आठवडी बाजार परिसरात टिनाचे शेड टाकले आहे. सामान्य भाजी विक्रेत्यांनी भाजी विक्रीसाठी जागा नाही. मात्र, आठवडी बाजार परिसरात खुलेआम मटका जुगार चालविला जातो, त्यामुळे नागरिकांकडून आश्चर्य व्यक्त केले जात आहे.
यवतमाळ शहरातील अवधूतवाडी पोलिस स्टेशनच्या हद्दीत आठवडी बाजार परिसर येतो. या परिसरात खुलेआम मटका व जुगाराचे काऊंटर सुरू आहे. मात्र, याकडे पोलिस दुर्लक्ष करीत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.
आठवडी बाजारात सुरू असलेल्या हारजीत जुगार अड्ड्याला कुणाची संमती आहे, हा मात्र संशोधनाचा विषय आहे. थेट शासकीय जागेवर जबरीने अतिक्रमण करून टिनाचे शेड उभारण्यात आले आहे. आठवडी बाजाराच्या पालिकेकडून दररोज होणाऱ्या वसुलीतही या अड्ड्याचे नाव नाही. एकंदरीत या अड्ड्याला नगरपरिषद प्रशासनाचीही मूकसंमती असल्याचे दिसून येत आहे. यवतमाळ शहरात गुन्हेगारी वाढती असून दररोज खून, खुनाचा प्रयत्न यासारख्या घटना घडत आहेत. काही दिवसांपूर्वी याच मटका जुगार अड्ड्यावर दोन गटांत चांगलाच वाद झाला होता. मात्र, मटका जुगार चालविणाऱ्या मालकाने यामध्ये समेट घडवून पुन्हा आपला अवैध व्यवसाय थाटात सुरू ठेवला आहे.

# शैक्षणिक साहित्य खरेदीसाठी पालकांची लूट कराल तर खबरदार!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला , दि. १५ :** जिल्ह्यातील खाजगी शाळा, कॉन्व्हेंटकडून पालकांना विशिष्ट दुकानदारांकडूनच गणवेश, पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास भाग पाडले जात असल्याचे वृत्त दैनिक अजिंक्य भारतने प्रकाशीत केल्यावर त्याची दखल घेत प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंह पवार यांनी गटशिक्षणाधिकाऱ्यांमार्फत खाजगी शाळा, कॉन्व्हेंटला पत्र देत कारवाईचा इशारा दिला आहे. पालकांनी यासंदर्भात तक्रार द्यावी, संबंधित शाळांची चौकशी करून निश्चितच कारवाई करण्यात येणार असल्याचे शिक्षणाधिकारी पवार यांनी सांगितले.
वाढत्या महागाईच्या काळात जीवनावश्यक वस्तूंसह सर्वच गोष्टींची प्रचंड दरवाढ झाली आहे. या दरवाढीने सामान्य, गोरगरीब लोक आधीच मेटाकुटीस आले आहेत. अशा परिस्थितीत दरवर्षी होणारी शैक्षणिक साहित्याची दरवाढ आणि त्यातही विशिष्ट दुकानदारांकडून गणवेश, शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यास खाजगी शाळा, कॉन्व्हेंटकडून पालकांना भाग पाडल्या जात असल्याने पालकांची हजारो रुपयांची आर्थिक लुटीचे प्रकार सर्रास घडत असल्याचे वृत्त दैनिक अजिंक्य भारतने प्रकाशित केले होते.

# कर्तव्यावर असताना अपघात: नागपूर पोलिसांचे वाहन उलटले



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १५ :** रविवारी सकाळच्या सुमारास अकोल्याहून नागपूरच्या दिशेने जात असलेले नागपूर पोलिसांचे वाहन बोरगावजवळ टायर फुटल्याने अनियंत्रित होऊन उलटले. या अपघातात तीन पोलीस कर्मचारी गंभीर जखमी झाले आहेत.
नागपूर येथील पोलीस कर्मचाऱ्यांची गाडी अकोल्याकडून नागपूरकडे जात असताना रविवारी दुपारी तीन वाजताच्या सुमारास हा अपघात घडला यावेळी जखमींना दीपक, करण, गौरव आणि विवेक हे मित्र अपघाताच्या वेळी धाब्यावर जेवत होती. अपघाताची दृश्यं पाहून त्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली त्यांनी जखमी पोलिसांना तत्काळ उचलून जवळच्या रुग्णालयात दाखल केले.
ही घटना समजताच वंचित बहुजन युवा आघाडीचे कार्यकर्ते पराग गवई हे आपल्या सहकाऱ्यांसह तातडीने रुग्णालयात पोहोचले आणि जखमींची विचारपूस केली. या अपघाताच्या संदर्भात जबाबदार अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र कुठल्याही अधिकाऱ्याने फोन उचलला नाही, हे विशेष. या घटनेने पुन्हा एकदा पोलीस दलाच्या कार्यकर्तृत्वासोबतच सामान्य तरुणांनी दाखवलेल्या तत्परतेचे व मानवी मूल्यांचे दर्शन घडवले.
पोलीस प्रशासनाला आता विचार करावा लागेल की, आपल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी काय उपाययोजना करता येतील, जेणेकरून अशा घटना टाळता येतील.

# 'जीएमसी'मध्ये वयोवृद्ध आजी बनल्या वॉर्ड बॉय

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि. १५ :** अकोला वैद्यकीय शासकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय () येथील ओपीडी विभागात सोमवारी एक विचित्र आणि दुःखद प्रकार घडला. एका वयोवृद्ध महिलेला स्वतःच्या मुलाला एक्स-रेसाठी घेऊन रुग्णालय परिसरात तासाभरापासून भर उन्हात भटकंती करावी लागली. कारण, रुग्णालयातील विभागांची माहिती नसणे आणि वॉर्ड बॉय उपलब्ध न राहणे.
या प्रकाराची माहिती सामाजिक कार्यकर्ते ऋषभ काळे यांना मिळाल्यानंतर त्यांनी रुग्णाची चौकशी केली असता, संबंधित रुग्ण आणि त्याच्या मातेसह गेल्या एक तासापासून एक्स-रे विभाग शोधत असल्याचे समजले. रुग्णालयात विभागीय मार्गदर्शनाची कमतरता असल्यामुळे आजीला मुलाला हाताने धरूनच फिरावे लागले. विशेष म्हणजे वॉर्ड बॉय अनुपस्थित असल्याने महिलेलाच वॉर्ड बॉयचे काम करावे लागले. ही बाब लक्षात येताच ऋषभ काळे यांनी तत्काळ रुग्णालयाचे सुपरवायझर प्रकाश चिंतलकार यांना दूरध्वनीद्वारे संपर्क साधून परिस्थितीची माहिती दिली. त्यानंतर सुपरवायझर यांनी तातडीने वॉर्ड बॉय उपलब्ध करून दिला. संबंधित वॉर्ड बॉयने तत्काळ रुग्णाला एक्स-रे विभागात नेले आणि आवश्यक सेवा दिली.

# 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत गावठी दारू अड्ड्यावर छापा; ६७ हजार ८०० रूपयांचा मुद्देमाल जप्त

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला , दि. १५ :** जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर पोलिसांनी पुन्हा एकदा धडक कारवाई करत गावठी दारू तयार करणाऱ्या अड्ड्यावर मोठा छापा टाकला आहे. पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशानुसार अंमलात आणण्यात येत असलेल्या ऑपरेशन प्रहार मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली.
स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे रविवारी १५ जून रोजी पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस स्टेशन बार्शीटाकळी हद्दीतील शिंदखेड मोरेश्वर गावात छापा टाकण्यात आला. कारवाईदरम्यान गावठी हातभट्टी दारू २४ लिटर किंमत ४ हजार ८०० व दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा ४२० लिटर सडवा किंमत ६३ हजार ८०० असा एकूण ६७ हजार ८०० चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.यावेळी दारू तयार करणारी साधनसामग्री नष्ट करण्यात आली असून, शहदेव शंकर अवचार या इसमावर कलम ६५(ई), महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
ही संपूर्ण कारवाई माननीय पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, तसेच पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत जिपीएसआय दशरथ बोरकर, पोहवा गोकुळ चव्हाण, पोअं. स्वप्नील खेडकर, अन्सार अहमद, लीलाधर खंडारे व चालक पोअं. मनिष ठाकरे यांनी सहभाग घेतला.
जिल्ह्यात अवैध दारू निर्मितीच्या आडव्या हातांना रोखण्यासाठी पोलिसांची कारवाई भविष्यातही सुरूच राहणार असल्याचे संकेत प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

# ऑपरेशन सिंदूरनंतर पंतप्रधान मोदी पहिल्यांदा विदेश दौऱ्यासाठी रवाना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**नवी दिल्ली, दि. १५ :** ऑपरेशन सिंदूर' नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी पहिल्यांदाच विदेश दौऱ्यासाठी रवाना झाले आहेत. सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या तीन देशांचा पाच दिवसीय दौरा ते करणार आहेत. कॅनडामध्ये होणाऱ्या -७ शिखर परिषदेत ही मोदी सहभागी होणार आहेत.
पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी सायप्रसला रवाना झाले. पंतप्रधान मोदी १५ ते १८ जून दरम्यान परदेश दौऱ्यावर आहेत. या काळात ते सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशियाला भेट देतील. ऑपरेशन सिंदूर नंतर पंतप्रधान मोदींचा हा पहिला परदेश दौरा द्विपक्षीय संबंध वाढवण्याच्या आणि युरोपियन युनियन आणि भूमध्यसागरीय प्रदेशाशी भारताचे संबंध मजबूत करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो. पंतप्रधान मोदी सायप्रस नंतर कॅनडाला जाणार आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले की, १५-१६ जूनचा हा दौरा सायप्रस प्रजासत्ताकाचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोडौलिडेस यांच्या निमंत्रणावरून होत आहे. दोन दशकांत भारतीय पंतप्रधानांचा हा पहिलाच सायप्रस दौरा आहे. पंतप्रधान मोदी आणि राष्ट्राध्यक्ष क्रिस्टोडौलिडेस यांच्यात राजधानी निकोसियामध्ये चर्चा होईल. ते लिमासोलमध्ये उद्योजकांना संबोधित करतील. दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, पंतप्रधान मोदी १६-१७ जून रोजी कॅनडामध्ये असतील आणि सलग सहाव्यांदा जी-७ शिखर परिषदेत सहभागी होतील. जी-७ देशांच्या नेत्यांसोबत द्विपक्षीय बैठका देखील घेणार आहेत. पंतप्रधान मोदी १८ जून रोजी क्रोएशियाला भेट देणार आहेत. आतापर्यंत भारतीय पंतप्रधानांचा या देशाचा पहिलाच दौरा असेल. पंतप्रधान मोदी पंतप्रधान प्लेनकोविक यांच्याशी द्विपक्षीय चर्चा करतील आणि क्रोएशियाचे अध्यक्ष झोरन मिलानोविक यांचीही भेट घेतील.

# डीएनए चाचणीद्वारे शोधला माजी मुख्यमंत्री विजय रुपाणींचा मृतदेह!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अहमदाबाद , दि. १५ :** एअर इंडियाच्या अहमदाबाद - लंडन मार्गावरील १७१ विमानाला झालेल्या अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचा मृत्यू झाला. विमानात असलेल्या २४२ जणांपैकी २४१ जणांचा मृत्यू झाला. विमान ज्या ठिकाणी कोसळले तिथे असलेल्या ३३ नागरिकांचाही मृत्यू झाला. यामुळे विमान अपघातातील मृतांची एकूण संख्या २७४ झाली आहे. अनेक मृतदेह अपघातात अर्धवट जळून गेले आहेत. यामुळे मृतदेहांची ओळख पटविण्यासाठी डीएनए चाचणी सुरू आहे. माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम डीएनए चाचणीद्वारे पूर्ण करण्यात आले आहे. लवकरच विजय रुपाणींचा मृतदेह शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यासाठी नातलगांना सुपूर्द केला जाणार असल्याचे वृत्त आहे.

**८६ पेक्षा जास्त मृतदेहांची ओळख डीएनए चाचण्यांद्वारे**

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार ८६ पेक्षा जास्त मृतदेहांची ओळख डीएनए चाचण्यांद्वारे करण्यात आली आहे. याआधी गुजरातचे गृहमंत्री हर्ष संघवी यांनी माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम डीएनए चाचणीद्वारे पूर्ण केल्याचे जाहीर केले. राजकोट येथे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणींचे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार असल्याचे वृत्त आहे. पण या संदर्भातली सविस्तर माहिती अद्याप जाहीर झालेली नाही. माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांच्या निधनाचे वृत्त आले आहे. अपघातात अर्धवट जळालेल्या मृतदेहांमधून रुपाणींच्या मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम डीएनए चाचणीद्वारे करण्यात आले आहे. गुजरात सरकारच्यावतीने संपूर्ण गुजरातमध्ये सोमवारी सरकारी शोक पाळला जाईल. राष्ट्रध्वज अर्ध्यावर आणला जाईल. सोमवारी मनोरंजनाच्या कार्यक्रमांचे तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार नाही.

# 'त्या' बेपत्ता इसमाचा मृतदेह धरणात सापडला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

### मृत व्यक्ती किन्हीराजा येथील रहिवासी

**किन्हीराजा, दि. १५ :** तीन दिवसापासून बेपत्ता असलेल्या व्यक्तीचा मृतदेह अखेर सोनाळा धरणात १३ जून रोजी सकाळी आढळून आला आहे. सदर मृत व्यक्ती हा किन्हीराजा येथिल रहिवासी असून तुकाराम गंगाराम जामकर (वय ५५) असे मृत व्यक्तीचे नांव आहे.
मिळालेल्या प्राप्त माहिती नुसार किन्हीराजा येथिल वार्ड क्रमांक ४ मधिल रहिवासी असलेला तुकाराम गंगाराम जामकर (वय ५५) हा आंध आदिवासी मच्छीमार सोसायटीचा सक्रीय सदस्य असून तो मच्छीमारीचा व्यवसाय करुन तो आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवित होता व परिवारालाही आर्थिक हातभार लावत होता. नेहमीप्रमाणे तुकाराम हा ११ जून रोजी दुपारी ४ वाजता सोनाळा धरणावर मासे पकडण्यासी गेला होता.मात्र रात्रीचे १२ वाजले तरी तुकाराम हा घरी परत आला नसल्याने तुकारामचे नातेवाईक व मित्र मंडळी असे ३० ते ४० जण रात्री १ वाजता तुकारामचा शोध घेण्यासाठी सोनाळा धरणावर गेले.मात्र त्या ठीकाणी मासे पकड्यासाठी नेलेले काही साहित्य हे धरणाच्या काठावरच आढळुन आले तर धरणात मच्छी पकडण्यासाठी वापरण्यात येत असलेली थर्माकोलची कॅस्टीक मात्र धरणाच्या दुसऱ्या टोकाला आढळून आली. दुसऱ्या दिवशी सकाळी ४० ते ५० व्यक्तींनी पुन्हा तुकारामच्या शोधासाठी धरणाचा पुर्ण परीसर पिंजुन काढला तरी मात्र तुकाराम कुठेच सापडला नाही.'त्यामुळे त्याच्या मुलाने वडील बेपत्ता झाल्याची तक्रार जऊळका पोलीस स्टेशनला दाखल केली .मात्र तीसऱ्या दिवशी १३ जून रोजी सकाळी तुकारामच्या शोधासाठी गेलेल्या नातेवाईकांना तुकारामचा मृतदेह सोनाळा धरणाच्या पाण्यावर तरंगतांना आढळून आला. त्यानंतर नातेवाईक व मित्रमंडळीच्या मदतिने सदर मृतदेह पाण्याच्या बाहेर काढून शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला.तुकाराम जामकर हा नेहमी प्रमाणे थर्माकोलच्या कॅस्टीकवर बसुन मच्छी पकडण्यासाठी धरणात गेला असावा व मच्छी पकतांना किंवा मच्छी पकडण्यासाठी जाळे टाकत असतांना त्याचा अचानक तोल जाऊन तो पाण्यात पडला असवा व त्यातच त्याचा मृत्यू झाला असावा असा प्राथमिक अंदाज व्यक्त केल्या जात आहे.मात्र शवविच्छेदनाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच सत्य काय ते समोर येईल.तुकारामच्या पश्चात आई,वडील,पत्नी,चार मुले,तीन सुना असा परिवार आहे

# निंबोळा देवी दर्शन घेऊन नदीपात्रात अंघोळ करतांना पाय घसरून मायलेकींचा मृत्यू

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

## दोघा महिलांना वाचविण्यात स्थानिकांना यश





**मलकापुर, दि. १५ :** नांदुरा तालुक्यातील निंबोळा देवी येथे देवी दर्शन घेऊन नदीपात्रात आंघोळ करीत असताना मायलेकींचा पाय घसरल्याने त्यांना वाचविण्यासाठी गेलेल्या दोन महिलाही पाण्यात डुबत असल्याने त्यांनी आरडाओरड केल्याने स्थानिक ग्रामस्थांच्या लक्षात येताच त्यांनी बचाव कार्यास सुरुवात केली यात दोन महिलांना वाचविण्यात यश आले असून दोन्ही मायलेकींचा पाण्यात बुडून करुण अंत झाल्याची घटना आज दुपारी दोन वाजे दरम्यान निंबोळा येथे घडली आहे.
याबाबत सविस्तर वृत्त असे की खामगाव येथील सुटाळपुरा, गढीजवळ राहणाऱ्या पूनम मयूर जामोदे वय ३२, कु.आर्वी मयूर जामोदे वय ५, संध्या सागर जामोदे वय ३४,राधा गजानन जामोदे वय ५४ ह्या नांदुरा तालुक्यातील निंबोळा देवी येथे दर्शनासाठी आल्या होत्या दर्शन आटोपून त्या मंदिरा जवळील नदीपात्रात आंघोळ करण्यासाठी गेले असता दोघा मायलेकींचा पाय घसरल्याने त्या नदीपात्रात पडल्या त्यांना वाचविण्यासाठी संध्या जामोदे, राधा जामोदे ह्या गेल्या असता त्याही डुबू लागल्याने त्यांनी आरडाओरड केली त्याच वेळी नदीजवळ पुजा करीत असलेल्या कृष्णा काळे चांदुर बिस्वा, संतोष पठाडे रा.केदार यांनी त्यांना वाचविण्याचा प्रयत्न केला असता सध्या जामोदे, राधा जामोदे यांना वाचण्यात यश आले, सर्वांना उपचारार्थ डॉ.चेतन जाधव यांचे खाजगी दवाखान्यात दाखल केले.घटनेची माहिती मिळताबरोबर माजी नगराध्यक्ष ॲड हरीश रावळ, शिवसेना शहरप्रमुख गजानन ठोसर, नगरसेवक अनिल गांधी, नगरसेवक अनिल बगाडे, पत्रकार अशोक रवणकार सह नातेवाईकांनी रुग्णालयात धाव घेतली.उपचारादरम्यान नाकातोंडात पाणी गेल्याने पुनम मयूर जामोदे वय ३२, आर्वी मयूर दामोदर वय ५ ह्या दोघींचा मयलेकींचा मृत्यू झाला असल्याचे डॉ.नी सांगितले. तर संध्या जामोदे व राधा जामोदे यांच्यावर डॉ. चेतन जाधव यांच्या खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहे,शहर पो.स्टे मलकापुर येथे मर्ग दाखल करुन पो.उप.नि सुरेश रोकडे यांनी पंचनामा करून सायंकाळी पाच वाजता दोन्ही मायलेकींचे मलकापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला.

### पांगरी ते किन्ही रस्त्याची दुरावस्था, काम सुरू करण्याची मागणी

**देऊळगाव राजा :** तालुक्यातील पांगरी ते किन्ही या रस्त्याची अत्यंत दुर्दशा झालेली असून सदर रस्त्यावर खड्डे पडलेले आहे . त्यामुळे रहदारीसाठी नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे . सदर रस्त्यावरून शाळकरी विद्यार्थी तसेच परिसरातील शेतकऱ्यांना दररोज ये जा करावी लागते. सदर रस्त्याचे काम प्रशासनाने त्वरित करून द्यावे अशी मागणी पांगरी वाडीचे सरपंच दिनकर वाघ यांच्यासह पांगरी येथील नागरिकांनी कार्यकारी अभियंता पंतप्रधान ग्राम सडक योजना बुलढाणा यांच्याकडे केली आहे .
पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत पांगरी ते पिंपळगाव चिलमखॉ इथपर्यंत सदर रस्ता मंजूर झाला असून रस्त्याचे काम सुरू झाले आहे . मात्र किन्ही पासून पांगरी पर्यंत सदर रस्त्याचे काम सुरू असताना पांगरी गावा लगत शेवटचा अंतिम टप्प्याचे काम रखडलेले आहे. त्यामुळे त्या रस्त्यावर खूप खड्डे पडलेले आहे . मराठवाडा व विदर्भाला जोडणारा हा रस्ता असून येथे मोठ्या प्रमाणात रहदारी सुरू असते .रस्त्याला खड्डे पडलेले असल्यामुळे नागरिक त्रस्त झालेले आहे .प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे व सदर रस्त्याचे काम लवकरात लवकर सुरू करावे अशी मागणी पंतप्रधान ग्राम सडक योजनेचे कार्यकारी अभियंता बुलढाणा यांच्याकडे सरपंच दिनकर वाघ व ग्रामस्थांनी केली आहे

# इराणच्या अणु प्रकल्पावर इस्रायलचा हल्ला

तेहरान, दि.१५ वृत्तसंस्था

इस्रायल आणि इराणमधील संघर्ष सुरूच असून, गेल्या दोन दिवसांत इराणमध्ये १३८ लोकांचा मृत्यू झाला आहे. दरम्यान आता इस्रायलने इराणच्या अणुस्थळांवर लढाऊ विमानांनी हल्ला केला आहे. इस्रायली संरक्षण दलाने रविवारी एक्सवर पोस्ट करत सांगितले की त्यांनी तेहरानमधील इराणच्या संरक्षण मंत्रालयाच्या मुख्यालयाला लक्ष्य केले आहे. इस्रायली सैन्याने असेही म्हटले आहे की, त्यांनी तेहरानभोवती इराणच्या अणुकार्यक्रमाशी संबंधित कथित ठिकाणांनाही लक्ष्य केले आहे.
इस्रायलच्या संरक्षण दलाने आज एक्सवर एक पोस्ट केली आहे. त्या पोस्टमध्ये त्यांनी म्हटले आहे की, ''इस्रायली संरक्षण दलाने आज तेहरानमधील इराणी अण्वस्त्र प्रकल्पाशी संबंधित विविध ठिकाणांवर हल्ले केले. या कारवाईत इराणच्या संरक्षण मंत्रालयाचे मुख्यालय, अण्वस्त्र संशोधनाशी संबंधित एसपीएनडी प्रकल्पाचे केंद्र आणि इतर महत्त्वाची ठिकाणे लक्ष्य करण्यात आली.''इराणने दिलेल्या माहितीनुसार तेहरानमधील शाहरान तेल डेपोवर इस्रायली हल्ला झाला असून, परिस्थिती नियंत्रणात आहे. राजधानीजवळील एका तेल शुद्धीकरण केंद्रावर इस्रायली हल्ल्यानंतर आगही लागली. इराणच्या तस्निम वृत्तसंस्थेनुसार, इस्रायलने तेहरानमधील संरक्षण मंत्रालयाच्या इमारतीवरही हल्ला केला असून, त्यात किरकोळ नुकसान झाले.इराणच्या अणुस्थळांवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यांमुळे तणाव निर्माण झाला असून, ज्यामध्ये ७८ लोकांचा मृत्यू झाला आणि ३२० हून अधिक लोक जखमी झाले, असे इराणच्या संयुक्त राष्ट्रातील राजदूताने सांगितले.

## संरक्षण मंत्रालयाचे मुख्यालयही लक्ष्य



## अमेरिकेसोबत सुरू असलेल्या अणु चर्चेतून इराणची माघार

दरम्यान, इस्रायलकडून झालेल्या या हल्ल्यांनंतर लगेचच, इराणने अमेरिकेसोबत सुरू असलेल्या अणु चर्चेतून माघार घेण्याची औपचारिक घोषणा केली आहे. इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे की, अशा 'आक्रमक आणि चिथावणीखोर कृत्या'नंतर, कोणत्याही चर्चेसाठी कोणताही आधार उरलेला नाही. यावर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत म्हटले आहे की, जर इराणला तडजोड करायची असेल तर त्यांच्याकडे अजूनही दुसरी संधी आहे.

## थोडक्यात

### केरळच्या तिरुअनंतपुरममध्ये ब्रिटिश लढाऊ विमानाचे आपत्कालीन लँडिंग



**तिरुअनंतपुर :** केरळच्या तिरुअनंतपुरममधील आंतरराष्ट्रीय विमानतळावर एका ब्रिटिश लढाऊ विमानाचं आपत्कालीन लँडिंग करण्यात आलं असल्याची माहिती समोर आली आहे. इंधन संपल्यामुळे ब्रिटिश एफ-३५ या लढाऊ विमानाचं आपत्कालीन लँडिंग करण्यात आलं आहे. आतापर्यंत समोर आलेल्या वृत्तानुसार, ब्रिटिश एफ-३५ हे लढाऊ विमान शनिवारी हिंदी महासागरावरून उड्डाण करत होतं. मात्र, इंधनाचा साठा कमी राहिल्यामुळे शनिवारी रात्री या विमानाचं तिरुअनंतपुरम आंतरराष्ट्रीय विमानतळावर लँडिंग करण्यात आलं आहे.या ब्रिटिश लढाऊ विमानात इंधनाचा साठा कमी असल्याचे कारण देत विमानाने तत्काळ लँडिंगची परवानगी मागितली होती. त्यानंतर परवानगी देण्यात आल्यानंतर या विमानाचं तत्काळ लँडिंग करण्यात आलं आहे. दरम्यान, ब्रिटनच्या संरक्षण मंत्रालयाने अद्याप या आपत्कालीन लँडिंगच्या तपशीलांवर कोणतंही निवेदन जारी केल्याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. सध्या हे लढाऊ विमान तिरुवनंतपुरम विमानतळावर उभे आहे. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे. दरम्यान, ब्रिटिश एफ-३५ या लढाऊ विमानाने विमानवाहू जहाजावरून उड्डाण केलं होतं असं सांगितलं जात आहे.

### राम दरबार भाविकांसाठी खुला



**अयोध्या :** येथील राम मंदिराच्या पहिल्या मजल्यावर स्थापन करण्यात आलेला राम दरबार आज मर्यादित संख्येत भाविकांसाठी खुला करण्यात आला. यासाठी पास उपलब्ध करून देण्यात आले आहेत.मंदिर न्यासाने काल सायंकाळी यासंदर्भात निर्णय जाहीर केल्यानंतर राम मंदिरात येणारे भाविक आता राम दरबारात जाऊ शकतील. निर्णयाला विलंब झाल्याने शनिवारी सायंकाळी केवळ दोनच टप्प्यांत भाविकांना राम दरबाराचे दर्शन घेता आले.श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासाचे सदस्य अनिल मिश्रा यांनी राम दरबार खुला करण्यासंदर्भातील निर्णयाची माहिती दिली. स्थानिक प्रशासनासमवेत झालेल्या बैठकीनंतर श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यायाचे सरचिटणीस चंपत राय यांनी भाविकांना राम दरबार खुला करण्याची परवानगी देण्यात आल्याचे मिश्रा म्हणाले.रामलल्लांच्या दर्शनासाठी देण्यात येणाऱ्या पासप्रमाणेच राम दरबारात जाण्यास इच्छुक असलेल्या भाविकांसाठी पास उपलब्ध करून देण्यात येणार आहे.मिश्रा म्हणाले, रामलल्ला यांच्या दर्शनाच्या व्यवस्थेप्रमाणेच राम दरबारासाठी देखील सकाळी सात ते नऊ वाजेपर्यंत, नऊ ते अकरा वाजेपर्यंत, दुपारी एक ते तीन वाजेपर्यंत, तीन ते पाच वाजेपर्यंत, पाच ते सात वाजेपर्यंत आणि सात ते नऊ वाजेपर्यंत तीनशे पास उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

### पंतप्रधान नरेंद्र मोदी सायप्रस, क्रोएशिया दौऱ्यावर



**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी पाच दिवसांच्या परदेश दौऱ्यावर जाणार आहेत. यादरम्यान ते सायप्रस, कॅनडा आणि क्रोएशिया या देशांचा दौरा करतील. 'ऑपरेशन सिंदूर'नंतरचा पंतप्रधान मोदींचा हा पहिलाच परदेश दौरा असून यात कॅनडातील जी-७ देशांच्या बैठकीतील त्यांची उपस्थिती तसेच अन्य अध्यक्षांशी होणाऱ्या भेटीगाठी महत्त्वाच्या असतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी (ता.१५) सायप्रसमध्ये पोचतील. सायप्रस प्रजासत्ताकाचे अध्यक्ष निकोस क्रिस्टोडॉलिडेस यांच्या आमंत्रणावरून ते दोन दिवसांच्या दौऱ्यावर असतील. राजधानी निकोसिया येथे क्रिस्टोडॉलिडेस यांच्यासमवेत पंतप्रधान मोदींची द्विपक्षीय बैठक होईल. तसेच लिमासोल येथे उद्योगक्षेत्रातील प्रमुखांशीही ते संवाद साधतील मागील दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात, कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या आमंत्रणावरून, पंतप्रधान मोदी जी-७ शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी कॅनडाच्या कनानास्किस शहरात पोचतील. सोबतच, कॅनडाच्या पंतप्रधानांसमवेतही त्यांची द्विपक्षीय चर्चा होईल.

# मुनीर ठरले बिन बुलाए मेहमान

## अमेरिकेनेच केली पाकची पोलखोल ; परेडला निमंत्रण नसल्याची स्पष्टोक्ती

वॉशिंग्टन, दि.१५ वृत्तसंस्था



अमेरिकेतील वॉशिंग्टनमध्ये १४ जूनला झालेल्या अमेरिकी सैन्य परेडमध्ये पाहुणे म्हणून पाकिस्तानी सैन्याचे प्रमुख असीम मुनीर यांना बोलविण्यात आले होते; परंतु व्हाईट हाऊसने आम्ही त्यांना निमंत्रितच केलेले नसल्याचे जाहीर केल्याने पाकचा पर्दाफाश झाला आहे. वॉशिंग्टनमधील ही परेड अमेरिकन सशस्त्र दलांच्या २५० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केली गेली. राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा ७९ वा वाढदिवसदेखील याच दिवशी झाला.
भारत-पाकिस्तान हवाई संघर्षानंतर पाकिस्तानने लष्कर प्रमुख असीम मुनीर यांना फील्ड मार्शल केले होते. एकही युद्ध न जिंकलेल्या देशाचा हा लष्करप्रमुख काय म्हणून अमेरिकेच्या लष्करी परेडमध्ये निमंत्रित आहे, हेदेखील जगाला पडलेले एक कोडेच होते. आता मात्र पाकिस्तानने उठविलेल्या या अफवाच असल्याचे समोर आले आहे. असीम मुनीर यांना अमेरिकेत आमंत्रित केल्याच्या वृत्ताचे व्हाईट हाऊसने खंडन केले आहे. व्हाईट हाऊसच्या एका अधिकाऱ्याने असीम मुनीर यांना लष्करी समारंभात सन्माननीय पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आल्याच्या बातम्या फेटाळून लावल्या आहेत.

# काँग्रेसच्या काळापेक्षा दुपटीने मागच्या अकरा वर्षात देशाचा विकास

## अशोक चव्हाणांचे विधान

नवी दिल्ली , दि.१५ वृत्तसंस्था



माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी काँग्रेसमधील काळात दोन वेळा मुख्यमंत्रीपदी काम केले आहे. त्यावेळी त्यांनी भाजपवर टीकेची झोड उठवली होती. मात्र आता त्याच भाजपचे अशोक चव्हाण कमळ हाती घेतले आहे. अशोक चव्हाण यांनी वर्ष भरपूर्वीच भाजप मध्ये प्रवेश केला आणि ते राज्यसभेवर खासदार झाले.
परंतु एकेकाळी भाजपवर निशाणा साधणारे चव्हाण पंतप्रधान नरेंद्र मोदींचे कौतुक करताना दिसत आहे. नांदेडमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी काँग्रेस सरकार आणि भाजप सरकारच्या काळातील विकास कामांची गती यावर भाष्य केले आहे.
अ''काँगेसच्या काळात विकास झाला, मात्र त्यापेक्षा दुपटीने मागच्या अकरा वर्षात देशाचा विकास झाला. मी काँगेस मध्येच होतो. काँगेसच्या काळात ही विकास झाला मात्र जो विकास मागच्या ११ वर्षात झाला तो अधिक गतीने झाला. आज जमाना आयपीएलचा आहे. त्यामुळे कमी वेळेत लक्ष्य गाठणं महत्त्वाचं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी विकसित भारत २०४७ पर्यंत करण्याचं धोरण ठेवले आहे,'' असे अशोक चव्हाण म्हणाले. दरम्यान, काँग्रेसच्या कार्यकाळात भाजपकडून भ्रष्टाचाराचा आरोप होतं होता, त्यावर प्रतिक्रिया देण्याचं चव्हाण यांनी मात्र टाळलं.
वंदे भारत एक्स्प्रेस नांदेड पर्यंत वाढण्याचा निर्णयाचे श्रेय तत्कालीन रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांना आहे रावसाहेब दानवे यांनी यासाठी पाठपुरावा केला. जालना ते नांदेड पर्यंत रेल्वे लाईनचे काम सुरु होते. त्यामुळे तो निर्णय आता झाला. आता कोण श्रेय घेते मला माहीत नाही. रावसाहेब दानवे यांनी २०२३ सालीच ही घोषणा केली होती, असेही अशोक चव्हाण म्हणाले.

# पिझ्झा ऑर्डरमध्ये वाढ अन् युद्धाचा भडका, काय आहे कनेक्शन?

वॉशिंग्टन, दि.१५ वृत्तसंस्था



इस्राईलने इराणवर केलेल्या हल्ल्यांनंतर पश्चिम आशियातील तणाव वाढला आहे. इस्राईलच्या हल्ल्यापूर्वी एक तास अमेरिकेचे मुख्यालय असलेल्या वर्जिनियातील अर्लिंग्टन परगण्यामध्ये पिझ्झाची मागणी वाढली होती आणि त्यातून तणाववाढीचा 'पिझ्झा इंडेक्स' पुन्हा एकदा सिद्ध झाल्याची चर्चा आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये आहे.
'पेंटॅगॉन'च्या परिसरामध्ये वुई द पिझ्झा, डिस्ट्रिक्ट पिझ्झा पॅलेस, डॉमिनोज आणि एक्स्ट्रीम पिझ्झा ही पिझ्झाची चार दालने आहेत. इस्रायलने शुक्रवारी केलेल्या हल्ल्यांपूर्वी एक तास म्हणजे स्थानिक वेळेनुसार सायंकाळी सात वाजता या चारही दालनांमधील पिझ्झाची मागणी अनपेक्षितपणे वाढल्याचे दिसून आले. त्यावेळी डॉमिनोजशी जोडलेल्या गुगल मॅपवरही 'नेहमीपेक्षा जास्त व्यग्र' असे दिसत होते.
कोणत्याही मोठ्या तणावपूर्व प्रसंगापूर्वी अमेरिकी संरक्षण मंत्रालयाच्या परिसरातील दालनांमध्ये पिझ्झाची मागणी वाढते, असा आतापर्यंतचा अनुभव आहे. शीतयुद्धापासून घडलेल्या घटनांमध्ये हा अनुभव नोंदवण्यात आला आहे. त्यामुळे, हा 'पिझ्झा इंडेक्स' आणि आंतरराष्ट्रीय तणाव यांचे नाते असल्याचे मांडण्यात येते. एखादी मोठी घटना घडणार असेल, तर 'पेंटॅगॉन'मधील अधिकारी-कर्मचाऱ्यांना कार्यालय सोडता येत नाही. त्यामुळे ते पिझ्झाची ऑर्डर करतात आणि त्यामुळे परिसरातील दालनांमध्ये पिझ्झाची मागणी वाढते, असे कारण त्यामागे देण्यात येते.सोशल मीडियावर 'पिझ्झा इंडेक्स'च्या पोस्टना उधाण आले होते. त्यामध्ये वेगवेगळे तर्क लावण्यात आले होते. 'डॉमिनोजने पेंटॅगॉनमध्येच शाखा काढायला पाहिजे,' अशी प्रतिक्रिया एका यूझरने दिली. आता गुप्तचर संस्थांपेक्षा गुगल मॅपच्या विश्लेषणातून जास्त चांगली गोपनीय माहिती मिळतेय, असे दुसऱ्या यूझरने म्हटले आहे.शीतयुद्धापासून सोव्हियत महासंघाच्या गुप्तचर संस्थांकडून 'पिझ्झा इंडेक्स'कडे गांभीर्याने पाहण्यात येते. त्याला 'पिझ्झिंट' अशी उपमा देण्यात आली होती.१९८०-१९९०च्या दशकांमध्ये अनेक महत्त्वाच्या घटनांमध्ये पिझ्झाची विक्री वाढल्याचे माध्यमांमध्ये नोंदविण्यात आले होते. त्याला 'पिझ्झा मीटर' असेही नाव देण्यात आले होते. एक ऑगस्ट १९९० रोजी पिझ्झाची मागणी वाढली होती, त्याच्या दुसऱ्या दिवशी इराकने कुवेतवर आक्रमण केले. अमेरिकेकडून १९९१मध्ये 'ऑपरेशन डेझर्ट स्टॉर्म' राबविण्यात येत होते. त्यावेळी मोठी लष्करी कारवाई होताना प्रत्येक वेळी पिझ्झाची मागणी वाढत होती, असे डॉमिनोजच्या अर्लींग्टनच्या शाखेचे मालक फ्रँक मीक्स यांनी सांगितले.

# पुणे मॉडेल स्कूल राज्यभर राबविणार-अजित पवार

पुणे , दि.१५ वृत्तसंस्था



'जिल्हा परिषदेच्या शाळांना नवे रूप देण्यासाठी ग्रामपंचायती आणि सरपंचांनी पुढे येऊन शाळेच्या वाटचालीत सक्रिय सहभाग घ्यावा. पुणे मॉडेल स्कूल आणि मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र उपक्रम राज्यात राबविण्यात येईल,' अशी घोषणा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शनिवारी केली. जिल्हा परिषदेच्या शाळांमधून चांगले शिक्षण मिळत असून, त्यात सातत्य टिकले पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.
पुणे मॉडेल स्कूल आणि मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्राचा लोकार्पण सोहळा पवार यांच्या हस्ते झाला.
यावेळी शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

# कर्जमाफी घोषणेबाबत सरकारकडून शेतकऱ्यांची फसवणूक-थोरात

संगमनेर, दि.१५ वृत्तसंस्था



प्रहार पक्षाचे बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफी आणि अन्य महत्त्वाच्या मागण्यांसाठी सुरू केलेले अन्नत्याग आंदोलन थांबविण्यासाठी सरकारने घेतलेली भूमिका ही शेतकऱ्यांची पुन्हा एकदा फसवणूक ठरू नये. सत्तेवर येण्यापूर्वी या सरकारने पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचे आश्वासन दिले होते. हे आश्वासन पाळणे सरकारचे नैतिक आणि राजकीय कर्तव्य आहे. सरकारने समिती स्थापन करण्याची नौटंकी करण्यापेक्षा सरसकट कर्जमाफीची घोषणा करावी, अशी मागणी माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.
शेतकरी कर्जमाफीची मागणी सरकारकडे करताना माजी मंत्री थोरात म्हणाले, आज सरकारकडे लाखो कोटी रुपयांचे महामार्ग आणि विविध प्रकल्प उभारण्यासाठी पैसे आहेत. परंतु शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मात्र सरकारी तिजोरी रिकामी असल्याचा देखावा केला जात आहे. शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यासाठी समिती कशाला पाहिजे? शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करण्यासाठी समिती नाही, नियत लागते. या अगोदरही विविध आंदोलने दडपण्यासाठी सरकारने समिती स्थापन करण्याची नौटंकी केलेली आहे.

# राफेल बनवणाऱ्या डसॉल्ट एव्हिएशनने उघड केला पाकिस्तानचा खोटारडेपणा

## भारताची तीन राफेल पाडल्याचा दावा फेटाळला

नवी दिल्ली, दि.१५ वृत्तसंस्था



पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने राबवलेल्या ऑपरेशन सिंदूर दरम्यान तीन भारतीय राफेल लढाऊ विमाने पाडल्याचा पाकिस्तानचा दावा डसॉल्ट एव्हिएशनचे सीईओ एरिक ट्रॅपियर यांनी खोटा असल्याते म्हणत फेटाळून लावला आहे.
''या प्रकरणी भारताने आमच्याशी अद्याप संपर्क साधलेला नाही, त्यामुळे नेमके काय घडले हे आम्हाला माहित नाही. पण आम्हाला माहित आहे की पाकिस्तानी जे म्हणत आहेत (तीन राफेल नष्ट केले) ते चुकीचे आहे,'' असे पॅरिस एअर शोच्या आधी फ्रेंच मासिक चॅलेंजेसला दिलेल्या मुलाखतीत डसॉल्ट एव्हिएशनचे सीईओ एरिक ट्रॅपियर यांनी सांगितले.भारत-पाकिस्तानमधील लष्करी तणावावर थेट भाष्य करण्याचे टाळत, ट्रॅपियर यांनी राफेल जागतिक दर्जाचे लढाऊ विमान असल्याचे स्पष्ट केले. ''आम्हीच सर्वोत्तम आहोत असे म्हणणे नेहमीच कठीण असते, परंतु माझा विश्वास आहे की, आम्ही सर्वोत्तम करण्याचा प्रयत्न करतो. जर तुम्हाला हवेतून हवेत लढाई, जमिनीवर हल्ले, आण्विक प्रतिबंध आणि विमानवाहू वाहक तैनात करण्यास सक्षम असलेले एकच विमान हवे असेल तर राफेलची कोणीही स्पर्धा करू शकत नाही.''ट्रॅपियर पुढे म्हणाले की, ''राफेलचा अमेरिकेच्या एफ-२२ शी संघर्ष झाला तर, एफ-२२ च्या गुप्त आणि हवाई श्रेष्ठतेमुळे राफेलला आव्हानांना सामोरे जावे लागू शकते. पण ''जर तुम्ही बहुपयोगिता आणि प्रत्यक्ष लढाईसाठीची तयारी महत्त्वाची मानत असाल, तर राफेल हे चीनच्या एफ-३५ पेक्षाही श्रेष्ठ ठरते आणि चीन सध्या त्यामध्ये ज्या काही सुविधा देते, त्यापेक्षा राफेल निश्चितच अधिक प्रभावी आहे.''दरम्यान, पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ यांनी काही दिवसांपूर्वी ब्लूमबर्ग टेलिव्हिजनला दिलेल्या मुलाखतीत सांगितले होते की, ''भारताने केलेल्या हल्ल्यांना प्रत्युत्तर देताना पाकिस्तानी सैन्याने पाच भारतीय विमाने पाडली आहेत, ज्यात तीन राफेलचा समावेश आहे.'' मात्र, आता डसॉल्ट एव्हिएशनचे सीईओ एरिक ट्रॅपियर यांनीच हा दावा खोडून काढत राफेलच्या क्षमतेवर विश्वास व्यक्त केला आहे.

# ताजमहल नव्हे ४ बीएचके घर, पत्नीसाठी पतीने उभारली हुबेहूब ताजमहलची प्रतिकृती

बुरहाणपूर, दि.१५ वृत्तसंस्था

जगातल्या ७ आश्चर्यांपैकी एक असलेल्या ताजमहलला प्रेमाचं प्रतिक म्हणून ओळखलं जातं. शाहजहानने बांधलेल्या या ताजमहलसारखं आलिशान घर मध्य प्रदेशातील बुरहाणपूरमध्ये एका दाम्पत्यानं बांधलंय. दाम्पत्यानं आपल्या प्रेमाचं प्रतिक म्हणून स्वत:चा ताजमहल उभा केलाय. याचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.
मध्य प्रदेशातील आनंद प्रकाश चौकसे आणि त्यांची पत्नी अंजली यांनी ताजमहलसारखं घर उभारलंय. संगमरवरी दगडात बांधलेलं हे घर ४ बीएचके आहे. ताजमहलच्या लहान प्रतिकृतीच्या रुपात ते बांधण्यात आलं आहे. इन्स्टाग्रामसह अनेक सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर याचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.एका इन्स्टाग्राम युजरने मध्य प्रदेशातील दाम्पत्याच्या या घराचा व्हिडीओ शेअर केला आहे. ताजमहलसारखं दिसणारं हे घर खरंच तुमचं आहे का असं युजरने दाम्पत्याला विचारलं. त्यांनी सांगितलं की, हे घर आमचंच आहे आणि ताजमहलची लहान प्रतिकृती आहे. ताजमहलच्या मीटरचे माप या घरात फुटांमध्ये बदलण्यात आलंय. ताजमहलच्या तीन पट लहान असं हे घर आहे. प्रेमाचं प्रतिक म्हणून हे घर बांधलं असून संगमरवरी घुमट, नक्षीदार खांब आणि दरवाजे लावण्यात आले आहेत. ताजमहलसारख्या या घराचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. दाम्पत्याचं सोशल मीडियावर कौतुक करण्यात येतंय. दाम्पत्याकडून हायटेक गुरुकुल चालवण्यात येतं. शाळेत २२०० पेक्षा जास्त विद्यार्थी तिथंच राहून शिक्षण घेतात. शाळेच्या जवळच त्यांनी ताजमहलसारखं घर उभारलं आहे. घराचं इतर बांधकाम करण्यासाठी जितका वेळ लागला तेवढाच वेळ घुमट बांधण्यासाठी लागला. या घराला दुहेरी भिंत आहे. एक भिंत आत आणि एक बाहेर, त्या दोन भिंतींमध्ये दोन फुटाचं अंतर आहे. यामुळे बाहेरच्या वातावरणाचा आत परिणाम होत नाही असं आनंद यांनी सांगितलं.



हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे. आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## जगण्यातल्या गर्दीत मरण झाले स्वस्त!

मुंब्रा स्थानकाजवळ गेल्या सोमवारी ९ जून रोजी सकाळी ९.३० वाजताच्या सुमारास भयंकर रेल्वे दुर्घटना घडली. दोन लोकल गाड्या एकमेकांजवळून जाताना लटकलेल्या प्रवाशांच्या बॅगा घासल्या गेल्यामुळे ८ प्रवासी रेल्वे ट्रॅकवर पडले. या घटनेत ६ प्रवाशांचा मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे. दोन्ही बाजूनं लोकल जाताना फूटओव्हरवर लोक उभे असताना पडण्याची पहिलीच घटना आहे. सीसीटीव्ही होते की नाही, लोकलमध्ये गर्दी किती होती? यासंदर्भात माहिती घेतली जाऊ शकते. याची चौकशीही नक्कीच होईल. मुंबई उपनगरांतून सुमारे ६५ लाख लोक दररोज नोकरधंद्याच्या निमित्ताने लोकलचा वापर करतात. यातील सुमारे ४५ लाख लोक हे नोकरीसाठी तर २० लाख लोक हे इतर कारणांनी प्रवास करतात. यातील सर्वात जास्त प्रवासी हे सकाळी आठ ते दहा वाजण्याच्या सुमारास तर सायंकाळी सहा ते आठ वाजण्याच्या काळात मुंबई लोकलचा वापर करतात. गेल्या दहा वर्षात मुंबईतील लोकलमध्ये प्रवास करताना सरासरी आठ -नऊ जणांचा मृत्यू होत असल्याचे रेल्वे पोलिसांच्या अहवालांतून स्पष्ट होते. अपघातांच्या वेळेवर नजर टाकली तर ८० टक्के अपघात हे सकाळी आठ ते दहा व सायंकाळी सहा ते आठ या कालावधीतच झालेले आढळतात. गेल्या वर्षभरात २,५९० जणांचा मृत्यू झाल्याचे आकडेवारी सांगते. लोकलमध्ये लटकून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या मृत्यूची मागील सप्ताहात घडलेली दुर्घटना ही याच दुर्दैवी मालिकेतील एक. जगभरातल्या नागरी प्रवासी सेवा देणाऱ्या वाहतुकीवर नजर टाकली तर मुंबई लोकल ही सर्वात जास्त जीव घेणारी नागरी प्रवासी सेवा आहे, हे कळते. पराकोटीच्या सहनशक्तीने आणि आला दिवस घालविण्याच्या मानसिकतेने चाकरमानी मुंबईकरांनी किड्या-मुंग्यांसारखे जगणे स्वीकारलेय, असे दिसते. व्यवस्थेकडून त्यांच्या पदरात काहीच पडत नाही. अपघातात आपण नव्हतो ना, हाच विचार करीत मुंबईकर उसासा टाकतो आणि दिवस ढकलतो. इथे माणसाचा जीव स्वस्त आणि जमीन महाग आहे. हे सर्व अमानवी आहे. हे लपविण्यासाठी मग व्यवस्था याला मुंबई स्पिरिट असे नाव देते. काही क्षणांसाठी का होईना; मुंबईकरांच्या मनात तयार झालेल्या उद्वेगावर यातून पांघरूण घातले जाते. दुसरा दिवस उजाडला की, पुन्हा याच लोकलच्या घड्याळाच्या फिरत्या काट्यासारखा मुंबईकर दिवस घालवितो आणि कालचा अपघात विसरतो. ८० टक्के अपघात सकाळी आठ ते दहा व संध्याकाळी सहा ते आठ या काळात होताना आढळत असल्यामुळे जर कार्यालयांच्या वेळा बदलल्या तर प्रश्न काहीसा सुटू शकतो. ज्या सेवा दहा ते सहा या वेळेत देणे गरजेच्या नसतील, त्या सेवा कार्यालयातील कर्मचाऱ्यांना इतर शिफ्टमध्ये बोलावल्यास लोकल सेवेवरील ताण कमी करता येईल. दुसरा पर्याय म्हणजे वाढत्या लोकसंख्येला सामावून घेण्यासाठी दर दोन मिनिटांनी धावणाऱ्या गाड्यांची संख्या वाढवावी लागेल अर्थात त्यासाठी अतिरिक्त रेल्वे रूळ उपलब्ध करावे लागतील. त्यासाठी १६ वर्षापूर्वी जो उन्नत रेल्वे (एलेव्हेटेड रेल्वे) प्रकल्प रेल्वेच्या अर्थसंकल्पात मांडण्यात आला होता व तत्कालीन रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी यांनी यासंदर्भात घोषणा केली होती पण प्रत्यक्षात मात्र ही योजना सरकारी फायलीत दफन झाली होती त्या योजनेला पुनरूज्जीवित करावे लागेल. तेव्हाच काही प्रमाणात लोकलसेवेचा दर्जा सुधारेल आणि अपघात टाळणे शक्य होईल. बुलेट ट्रेनसाठी अब्जावधी रूपयांचा निधी उभा केला जातो पण एलेव्हेटेड रेल्वे प्रकल्पांवर होणारा खर्च अमाप असल्याची ओरड केली जाते हे अनाकलनीय आहे. देशातील सर्वांत जास्त कर भरणाऱ्या मुंबईकरांच्या सोयीसाठी निधी का उभा राहू शकत नाही?यासाठी राजकीय नेतृत्वाची इच्छाशक्ती कमी पडते. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी; मात्र येथील नागरी सेवांचा विचार करता ही आर्थिक राजधानी आजही इंग्रजांनी उभ्या केलेल्या नागरी प्रवासी सेवेवर चालतेय, असेच म्हणावे लागेल. एकंदरीतच मुंबई ही सोन्याचे अंडे देणारी कोंबडी म्हणूनच तिचा वापर केला गेला. मुंबईतील रेल्वेस्थानकेही नगर आणि उपनगरांची प्रमुख बाजारपेठ बनली आहेत. या भागात असलेले जमिनीचे भाव गगनाला भिडणारे आणि मोठी मागणी असलेले आहेत. या रेल्वेस्थानकांची पुनर्बांधणी केल्यास त्यातून अब्जावधी रूपयांचे उत्पन्न रेल्वेला मिळू शकते व मुंबईची लोकलसेवा सुधारता येऊ शकतात. मात्र हे शिवधनुष्य पेलण्याची कोणत्याही सरकारची इच्छाशक्ती गेल्या दोन दशकांत दिसलेली नाही. मुंबई ज्वालामुखीच्या तोंडावर आहे. गेल्या सप्ताहात झाला त्यापेक्षा कितीतरी जास्त जीवघेणा अपघात होण्याची भीती उजाडणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक वाढत आहे. यातून आणखी एक अस्वस्थ करणारी बाब समोर येते, ती म्हणजे विकासाच्या असमतोलाची. वाहतुकीच्या एवढ्या यमयातना सोसाव्या लागल्या तरी देशाच्या इतर भागांतून मुंबईकडे धाव घेण्याचे प्रमाण काही कमी होत नाही. जर असे असेल तर हा प्रश्न एका मोठ्या गंभीर समस्येचा भाग आहे, हे ओळखले पाहिजे. एका बाजूला रेल्वे प्रशासनाकडून सुधारणांच्या अपेक्षा ठेवतानाच विकेंद्रित विकासाच्या मोठ्या आव्हानाकडे दुर्लक्ष करता येणार नाही. जगण्यातल्या गर्दीत मरण स्वस्त होणे, ही बाब कोणत्याही कल्याणकारी म्हणविणाऱ्या राजवटीला शोभणारी नाही. त्यासाठी रेल्वे प्रशासनाने आतातरी किमान वाढत्या लोकसंख्येचा विचार करुन रेल्वेगाड्यांची संख्या वाढवावी अन्यथा अशा घटना पुढेही घडतच राहतील.

## ब्लॅकबॉक्स






लक्ष्यभेद
जयदीप सोनखासकर
9890508017

मरण झाले स्वस्त
जगणे कठीण झाले
प्रवास नाहीत मस्त
तेच जीवघेणे झाले

एयर इंडिया विमानाने
अपघात कसा झाला
ब्लॅक बॉक्स कारणाने
का शोध तुम्ही घ्यायला?

एवढे जीव एकाएकी
जातातच तरी कसे?
भारत झाली महाशक्ती
का असे तुम्हाला वाटते

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१



हत्तीच्या पायाला
जसा दोर आहे ।
तसा दोर आहे
बंधनाचा ॥

ज्या बंधनामध्ये
कटुता राहते ।
ते नाते राहते
अकारण ॥

सैल सोडल्याने
घट्ट होत जाते ।
नाते होत जाते
अतूट हो ॥

अशा बंधनाला
मुक्त करायचे ।
बंध तोडायचे
मुळातून ॥

# कला शाखा : भविष्य घडवणारी शैक्षणिक वाटचाल



शैक्षणिक

प्रा.सचिन सुरवाडे
मो. 9960867504

दहावीचा निकाल हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनातील एक महत्त्वाचे वळण असते. दहावीचा टप्पा हा प्रत्येक विद्यार्थ्याच्या आयुष्यातील एक निर्णायक क्षण असतो. या टप्प्यावर विद्यार्थी आणि पालक अनेकदा संभ्रमात असतात पुढे कोणता अभ्यासक्रम घ्यावा? कोणती शाखा निवडावी? विज्ञान, वाणिज्य की कला? अनेकदा समाजातील चुकीच्या समजुतीमुळे ''कला शाखा'' ही शेवटचा पर्याय म्हणून पाहिली जाते. समाजात पसरलेल्या एकंदर पूर्वग्रहदूषित मानसिकतेमुळे बहुतांश वेळा कला शाखा दुय्यम समजली जाते. पण खरे पाहता, कला शाखा ही केवळ एका पर्यायी किंवा 'गुण कमी मिळालेल्यांची' शाखा नाही, तर ती विचार, सृजनशीलता, अभ्यास, आणि समाजाशी जुळलेल्या जाणिवांचा एक विस्तृत पट मांडणारी दिशा आहे. कला शाखा ही सामाजिक परिवर्तनाची एक शक्तिशाली दिशा आहे. या लेखामध्ये आपण कला शाखेचे स्वरूप, त्यातील संधी, अभ्यासक्रम, स्पर्धा परीक्षांसाठीची अनुकूलता, आणि तिच्या माध्यमातून घडणाऱ्या व्यक्तिमत्त्व विकासाचा सखोल आढावा घेणार आहोत.

आजच्या घडीत आपण 'करिअर' म्हणजे केवळ उच्च पगार, परदेशातील संधी किंवा मोठ्या कंपन्यांची नोकरी एवढ्यापुरतेच पाहतो. पण शिक्षण ही केवळ जीविका मिळवण्याची साधनाच नसून ती जीवन घडवण्याची प्रक्रिया असते. कला शाखा विद्यार्थ्याला केवळ ज्ञान देत नाही, तर त्याला समाजाशी जोडते, त्याला विचार करण्यास शिकवते, भाषेचा योग्य वापर करता येतो, व्यक्त होण्याची ताकद देते आणि एक जबाबदार नागरिक म्हणून घडवते.कला शाखेच्या अभ्यासक्रमात समाविष्ट असलेल्या राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, आणि मराठी व इंग्रजी अशा भाषाविषयांचा अभ्यास म्हणजे समाजाच्या प्रत्येक घटकाशी नातं जोडण्याचं शिक्षण असतं. राज्यशास्त्रामधून आपण शासनव्यवस्था, नागरिकांचे हक्क, आणि लोकशाही मूल्यं शिकतो. समाजशास्त्र आपल्याला समाजातील घटक, वर्ग, जेंडर प्रश्न, व जातीय संकल्पना समजावून सांगतो. इतिहास आपणास आपल्या परंपरा, संघर्ष, स्वातंत्र्याची किंमत आणि भविष्याचे दिशादर्शन शिकवतो. तर अर्थशास्त्र आपल्याला जीवनाशी निगडित असलेली वित्तीय शिस्त, बाजारव्यवस्था आणि सामाजिक समतेचा अर्थ सांगतो. भाषांचे अध्ययन हे आपल्या विचारसंपृक्ततेला धार देण्याचे काम करते. खरं तर कला शाखेतील शिक्षण म्हणजे केवळ किती मार्क्स मिळवले किंवा किती पाढे पाठ आहेत यावर आधारित नसून, ते आपल्या सभोवतालच्या समाजाशी संवाद साधण्याची क्षमता निर्माण करतं. हीच ती शाखा आहे जिथे विद्यार्थ्यांच्या विचारांची दिशा ठरते. ते इतिहासातून प्रेरणा घेतात, समाजशास्त्रातून सामाजिक बांधिलकी समजतात, आणि राज्यशास्त्रातून राजकीय जागृती मिळवतात. या विषयांमुळे केवळ त्यांच्या परीक्षेतील गुण नव्हे तर त्यांच्या जीवनातील भूमिका ठरते.



कला शाखेचा सर्वात मोठा फायदा म्हणजे विविध स्पर्धा परीक्षांसाठी ती सर्वोत्तम पाया ठरते. अशा अनेक परीक्षा या शाखेतील विषयांवर आधारित असतात. जेथे इतर शाखेतील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेचा अभ्यास सुरुवातीपासून करतात, तिथे कला शाखेतील विद्यार्थी शालेय स्तरावरच हाच अभ्यास करून तयार होतो. त्यामुळे स्पर्धा परीक्षांच्या शर्यतीत तो नेहमीच एक पाऊल पुढे असतो.पुढील शिक्षणाच्या संधीही येथे विपुल असतात. च्या विविध शाखा, अशा क्षेत्रांमध्ये विद्यार्थी यशस्वीपणे वाटचाल करू शकतो. काहींचे उद्दिष्ट शिक्षक बनण्याचे असेल तर . आणि . हा मार्ग खुला असतो. तर काहींना समाजसेवा, राजकारण, प्रशासन यामध्ये करिअर करायचे असल्यासही कला शाखा त्यांना योग्य तयारी देते.कला शाखेची खरी ताकद ही आहे की ती विद्यार्थ्याला व्यक्त होण्याचं स्वातंत्र्य देते. विज्ञान शाखेमध्ये एक विशिष्ट चौकट असते, वाणिज्य शाखेमध्ये विशिष्ट नोंदवही असते, पण कला शाखा हे विचारांचं मुक्त आकाश असतं. ती विद्यार्थ्याच्या मनाला उडण्याचं बळ देते, त्याला लिहायला शिकवते, संवाद साधायला शिकवते, आणि प्रश्न विचारायला शिकवते.मात्र दुर्दैवाने आजही अनेक पालक आणि काही शिक्षक सुद्धा गुण कमी मिळाले म्हणून कला शाखा घ्यावी लागली'' अशी चुकीची धारणा बाळगतात. ही मानसिकता विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासावर परिणाम करते. परंतु आपण समजून घेतलं पाहिजे की कला शाखा हे केवळ पर्याय नसून ते एक व्यक्तिमत्व विकसित करण्याचा मार्ग आहे. आजच्या काळात सर्जनशीलता, संवाद, भावनात्मक समज, आणि समाजाविषयी संवेदनशीलता ही सगळ्यात महत्त्वाची कौशल्यं मानली जातात. आणि ही कौशल्यं कुठे विकसित होतात तर ती केवळ कलाशाखेत.कला शाखा घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण निर्माण होतात. ते विविध सांस्कृतिक, सामाजिक, साहित्यिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होतात, परिसंवाद, वक्तृत्व, कविता, लेखन, नाट्य ह्या सगळ्या उपक्रमांतून ते घडतात. त्यांच्या आत्मविश्वासात भर पडते. ते केवळ पुस्तकी विद्वान राहत नाहीत, तर वास्तवात विचार करणारे जागृत नागरिक बनतात. याच शाखेतून उत्तम लेखक, कवी, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, प्रशासक, शिक्षक, विचारवंत घडतात. समाजाच्या मनावर प्रभाव पाडणारे नेतृत्व याच शाखेतून तयार होते. दहावी नंतरचा निर्णय हा आयुष्याची दिशा ठरवणारा असतो. आणि म्हणून तो निर्णय गुणांवर आधारित नसून 'स्वतःची आवड, क्षमता आणि भविष्याचा विचार' यावर आधारित असला पाहिजे. कला शाखा ही अशा विद्यार्थ्यांसाठी आहे ज्यांना विचार करायला आवडतो, ज्यांना समाजात बदल घडवायचा आहे, ज्यांना संवाद साधायचा आहे, आणि ज्यांना माणूस म्हणून समृद्ध व्हायचं आहे. अशा विद्यार्थ्यांसाठी कला शाखा ही केवळ एक अभ्यासक्रम नसून एक आयुष्याचा दृष्टिकोन असतो.

आज जेव्हा आपण औद्योगिक क्रांती, कृत्रिम बुद्धिमत्ता, जागतिकीकरण, हवामान बदल, आणि सामाजिक विषमता अशा गुंतागुंतीच्या विषयांशी सामना करत आहोत, तेव्हा याचे उत्तर विज्ञानात जितके आहे, तितकेच किंवा कदाचित अधिक, कला शाखेतील विचारांतही आहे. त्यामुळे कला शाखा ही भविष्यातील समाजसुधारणेचा पाया ठरू शकते. शैक्षणिक, सामाजिक आणि मानवी मूल्यांनी युक्त असा एक सशक्त पाया.अशा या शाखेची निवड ही शेवटच्या पर्यायामुळे नसावी,तर ती स्वतःच्या आत्मभानामुळे, स्वप्नांवर असलेल्या विश्वासामुळे आणि समाजासाठी काहीतरी करण्याच्या जिद्दीमुळे व्हावी. आणि म्हणूनच दहावी नंतर जर तुम्हाला विचार करायला आवडत असेल, माणसांमध्ये परिवर्तन घडवायचं असेल, स्वतःचं वेगळं अस्तित्व तयार करायचं असेल, स्वतमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणायचा असेल, समाजामध्ये घडणाऱ्या घटनांकडे डोळसपणे बघून त्यातून बोध घ्यायचा असेल आणि या घटनांचे विश्लेषण करण्याची क्षमता विकसित करायचे असेल, जगामध्ये घडणाऱ्या कोणत्याही घटनेमागचा कार्यकारणभाव समजून घ्यायचा असेल तर कला शाखा हीच तुमच्यासाठी योग्य दिशा आहे.''आजच्या जगात प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी केवळ ज्ञान नव्हे, तर विचारांची खोली, भाषेचे प्रभुत्व, सामाजिक जाणीव, आणि माणुसकीची समज आवश्यक आहे आणि ही सगळी मूल्यं कला शाखा विद्यार्थ्यांच्या ठिकाणी विकसित होतात. म्हणूनच, कला शाखा ही पर्याय नसलेली नाही, तर ती सर्वोत्तम पर्यायांपैकी एक आहे. विचार करा, स्वतःला समजून घ्या, आणि भविष्यात समाजाच्या बदलाचे शिल्पकार व्हा, कारण तुमच्या निर्णयावर तुमचे नव्हे तर समाजाचेही भविष्य अवलंबून आहे.''

# चोकर्स ते चॅम्पियन्स: साऊथ आफ्रिकेची विजयगाथा



विचारमंथन

प्रवीण हटकर
8055213281

''कोशिश करने वालों की कभी हार नहीं होती'' ही ओळ केवळ प्रेरणादायी कविता न राहता, आज साऊथ आफ्रिकेच्या क्रिकेट संघाच्या आत्मचरित्राचा सारांश ठरली आहे. १४ जून २०२५ या दिवशी, क्रिकेटच्या पवित्र मैदानावर, साऊथ आफ्रिकेने वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलमध्ये ऑस्ट्रेलियाचा ५ गडी राखून पराभव करत इतिहासात सुवर्णाक्षरांनी आपलं नाव कोरलं.२७ वर्षांची तहान आणि आजचा अमृतसिंचनाचा क्षण

१९९८ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर साऊथ आफ्रिकेच्या हाती एकही ट्रॉफी नव्हती. चोकर्स या उपरोधिक विशेषणाने त्रस्त झालेला संघ, वेळोवेळी अपयशाच्या उंबरठ्यावरच थांबला होता. पण टेंबा बबुमा यांच्या नेतृत्वाखाली या संघाने केवळ विजयच नाही तर संपूर्ण क्रिकेट विश्वाचा आदरही जिंकला

टेंबा बबुमा नेतृत्वाचं नवं परिमाण:

टेंबा बबुमा, ज्यांच्याकडे बाह्य सौंदर्य नाही, उंची नाही, पण मनगटात आत्मविश्वास व हृदयात संघासाठीची आस्था होती. त्यांनी संघात विश्वास निर्माण केला, एकजूट घडवली आणि स्वप्नांची दिशा दाखवली.




त्यांचं नेतृत्व केवळ रणनीतीचं नव्हे तर संवेदनशीलतेचं होतं.मार्कराम आणि बबुमाची विजयी जोडी-

यांच्या १३६ धावांची भक्कम कामगिरी आणि बबुमाचा संयमी खेळ या दोघांनी मिळून निर्णायक इनिंग घडवली. साऊथ आफ्रिकेने २८२ धावांचं लक्ष्य सहज पार केलं आणि क्रिकेटच्या नव्या पर्वाची सुरुवात केली.

चोकर्स नाही, आता चॅम्पियन्स! :-या विजयाने केवळ ट्रॉफी मिळवली नाही तर दशकांपासूनचा न्यूनगंड दूर केला. चोकर्स या अपमानास्पद टॅगला उत्तर देत साऊथ आफ्रिकेने दाखवून दिलं की, जिद्द, एकजूट आणि नेतृत्व या त्रिसूत्रीवर भक्कम इतिहास घडवता येतो. आजचा दिवस साऊथ आफ्रिकेच्या क्रिकेटसाठी केवळ एक विजय नव्हे, तर त्यांच्या संघर्षाची, प्रयत्नांची आणि आशेच्या ठिणग्यांची विजयगाथा आहे. टेंबा बबुमा यांच्या नेतृत्वात अशक्य वाटणारी गोष्ट शक्य झाली आणि त्यांचं नाव, संघासोबत इतिहासात अजरामर झालं.अभिनंदन साऊथ आफ्रिका! आज तुमचं स्वप्न साकार झालं!

# प्रा. डॉ. सागर जाधव : एका कार्यकर्तृत्व संपन्न व्यक्तिमत्त्वाचा सेवागौरव!



गौरव

प्रा. डॉ. अशोक कांबळे
यवतमाळ, (मो. 9423652869)

अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ येथील वनस्पतिशास्त्र विभाग प्रमुख, प्रा. डॉ. सागर जाधव हे दि.३१ मे २०२५ रोजी आपल्या प्रदीर्घ आणि यशस्वी सेवेनंतर सेवानिवृत्त झाले आहेत. एक निष्ठावंत प्राध्यापक, सामाजिक भान जपणारे कवी, लेखक, वक्ते, संशोधक आणि समाज शिक्षक अशा विविध भूमिकांमधून त्यांचे कार्य बहुआयामी स्वरूपाचे राहिले आहे. विज्ञानाचे प्राध्यापक असूनही, त्यांनी बुद्धिप्रामाण्यवादी वाङ्मयीन संस्कृतीचे एक सुंदर शिल्प आपल्या बौद्धिक कसोटीवर साकारले आहे. त्यांच्या प्रभावी आणि प्रतिभा संपन्न संस्कार शाळेतून अनेक विद्यार्थी परिवर्तनवादी भूमिका घेऊन जीवनाची वाटचाल करीत आहेत. यामुळेच, एक विद्यार्थिप्रिय प्राध्यापक म्हणून त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

प्रा. डॉ. सागर जाधव यांचा जन्म बुलडाणा जिल्ह्याच्या सिंदखेडराजा तालुक्यातील लिंगा (पो. राजेगाव) या गावी दि.१६ मे १९६५ रोजी झाला. त्यांच्या आईचे नाव गुंफाबाई आणि वडिलांचे नाव शेवंतराव. त्यांचे शालेय शिक्षण बुलडाणा येथे झाले, तर महाविद्यालयीन शिक्षणासाठी त्यांनी औरंगाबाद गाठले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर) येथील मिलिंद विज्ञान महाविद्यालयातून त्यांनी बी. एस्सी. पदवी प्राप्त केली आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून वनस्पतिशास्त्र विषयात एम. एस्सी. ही पदव्युत्तर पदवी मिळवली. अत्यंत प्रतिकूल आणि हलाखीच्या परिस्थितीवर मात करत, संघर्षातून वाट काढत त्यांनी आपल्या जीवनाचा शोध घेतला. प्राध्यापक पदाच्या मुलाखतीसाठी ते यवतमाळच्या अमोलकचंद महाविद्यालयात आले आणि एक जानेवारी १९९० रोजी त्यांची याच महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाली.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्न असलेल्या या नामांकित महाविद्यालयात, विशेषतः स्वातंत्र्य संग्राम सेनानी श्रद्धेय जवाहरलाल दर्डा यांच्या महाविद्यालयात नोकरी मिळणे, ही त्यांच्यासाठी सुवर्ण संधीच होती. माजी खासदार विजयबाबू दर्डा, डॉ. ललित निमोदिया, किशोरबाबू दर्डा, ॲड. प्रकाश चोपडा आणि विद्या प्रसारक मंडळाच्या प्रोत्साहनामुळे व सहकार्यामुळे त्यांची प्राध्यापक म्हणून वाटचाल सुगम झाली. आपल्या प्रदीर्घ सेवाकाळात डॉ. जाधव यांनी केवळ अध्ययन-अध्यापनाचेच कार्य केले नाही, तर महाविद्यालयाच्या जडणघडणीतही मोलाचे योगदान दिले. २०१६ मध्ये, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित 'उडान' या लॉ फेस्टिव्हल समारंभात, त्यांना स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले. महाविद्यालयाच्या परिसरात आदरणीय पं. जवाहरलाल नेहरू उद्यान, डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान आणि संत गाडगेबाबा उद्यान यांसारख्या सुंदर उद्यानांची निर्मिती त्यांच्याच संकल्पनेतून साकार झाली. त्यांनी महाविद्यालयाच्या व्यवस्थापन समितीचे सदस्य म्हणूनही प्रभावीपणे कार्य केले. त्यांचे प्रभावी वक्तृत्व केवळ वर्गातील विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर हजारोंच्या जनसमुदायाला भारावून टाकणारे आहे. निर्मळ आणि स्वच्छ मनाचे, सामाजिक वेदनेने तळमळणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व समाजाला सतत मार्गदर्शन करत आले आहे. प्रत्येक व्यक्तीने आपल्या परिश्रमातून मिळणाऱ्या मिळकतीचा उपयोग समाजासाठी आणि



सामाजिक चळवळींना गतिमान करण्यासाठी करावा, हा ध्येयवाद प्रा. डॉ. जाधव यांनी आयुष्यभर जोपासला. त्यांची ही विचारसरणी नव्या पिढीसाठी प्रेरणादायक ठरली आहे. त्यांच्या मते, खऱ्या अर्थाने परिवर्तनाचा वसा घेतलेला कोणताही प्रतिभावंत हा अंतिमतः कार्यकर्ताच असतो, जो समाजासाठी दिव्याप्रमाणे जळत राहतो. डॉ. जाधव आपल्या बुद्धिमत्ता, वैचारिकता आणि नैतिकतेच्या जोरावर समाजपरिवर्तन घडवून आणण्यासाठी कृतिशील नेतृत्व करणारे आणि नि:स्वार्थ वृत्तीने झटणारे व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांनी तथागत गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मानवी मुक्तीच्या तत्त्वज्ञानाशी आणि क्रांतिसूर्यांशी आपली बांधिलकी जपत, आपल्या सृजनशील आणि संवेदनशील कवी मनाने समाजाभिमुख कार्य केले. प्रा. डॉ. सागर जाधव यांनी अध्ययन आणि अध्यापनासोबतच साहित्य आणि संशोधन क्षेत्रातही भरीव योगदान दिले आहे. सामाजिक परिवर्तनासाठी साहित्य हे एक प्रभावी माध्यम आहे, यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. कविता आणि लेखन: 'आंबेडकरी नव कविता' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहात त्यांच्या काही कविता आणि त्यावर केलेले समीक्षात्मक लेखन ९ मे १९९३ रोजी प्रकाशित झाले. त्यांचा 'उजेड' हा स्वतंत्र काव्यसंग्रह १४ ऑक्टोबर १९९७ रोजी प्रकाशित झाला, ज्यावर वसंत मून, डॉ. यशवंत मनोहर आणि डॉ. महेंद्र भवरे यांसारख्या मान्यवर साहित्यिकांनी समीक्षा-लेखन केले. विविध मराठी साहित्य पुस्तकांमध्ये त्यांचे एकूण १० लेख आणि काव्यग्रंथांमध्ये ६ कविता समाविष्ट आहेत. त्यांची एक कविता संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठी अभ्यासक्रमातही समाविष्ट झाली आहे. त्यांनी 'समता चक्र' (सप्टेंबर २००७) आणि 'मुंबईचे शहाणे' (फेब्रुवारी २००८) या मराठी चित्रपटांसाठीही गीतलेखन केले आहे. प्रा. डॉ. जाधव यांनी आपले जीवन महाकवी वामनदादा कर्डक यांच्या साहित्याच्या संशोधनासाठी जणू वाहून घेतले आहे. ही त्यांची जीवननिष्ठा आणि वाङ्मयीन निष्ठेचे प्रतीक आहे. त्यांनी स्वतःच्या भविष्य निर्वाह निधीतून पैसे काढून, महाकवी वामनदादा कर्डक यांच्या साहित्याचे पाच खंड प्रकाशित करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे, जे अत्यंत स्पृहणीय आणि प्रेरणादायी आहे. 'आलोक-संबोधी प्रकाशना'तर्फे महाकवी वामनदादा कर्डक समग्र वाङ्मय खंड-१ ते ५ प्रकाशित झाले असून, खंड ८ ते १६ प्रकाशनाच्या मार्गावर आहेत. महाराष्ट्रातील विविध विद्यापीठांमध्ये 'महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन' सुरू करण्यासाठी त्यांनी प्रस्ताव सादर केले आणि अनेकांना मंजुरीही मिळवली. यामध्ये औरंगाबाद (२०१८), अमरावती (२०२२-२३) आणि गडचिरोली (२०२४) येथील विद्यापीठांमध्ये अध्यासन सुरू झाले आहे, तर नागपूर, नांदेड, जळगाव, पुणे आणि सोलापूर येथील विद्यापीठांमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत. डॉ. जाधव यांची लेखणी अविरत कार्यरत असून, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर युग काव्य', 'बुद्ध धम्म आणि विज्ञान धम्म', 'काव्य सिंधू ते हिंदू', 'कविता राजकारणाच्या', 'आंबेडकरी बालगीते', 'निवडक समीक्षा' आणि 'शिकागो सर्वधर्म परिषद: ऐतिहासिक सत्य' यांसारखे अनेक ग्रंथ आगामी काळात प्रकाशित होणार आहेत. डॉ. जाधव यांना त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, साहित्यिक आणि धम्म साहित्यातील मौलिक योगदानाबद्दल महाराष्ट्रभरात विविध पुरस्कार आणि सन्मान प्राप्त झाले आहेत. यामध्ये 'धम्म परिषद', 'प्रज्ञा सूर्य समता परिषद', 'संविधान सुरक्षा परिषद' आणि 'आंबेडकरी साहित्य संमेलनां'मधील सन्मानाचा समावेश आहे. त्यांना 'महाकवी वामनदादा कर्डक स्मृती वादळ वारा पुरस्कार' (नाशिक, २०२३) आणि 'नालंदा फाउंडेशन पुरस्कार' (बीड, २०२३) यांसारख्या महत्त्वाच्या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. विशेष म्हणजे, एप्रिल २०२५ मध्ये 'बीबीसी न्यूज मराठी'ने वामनदादांच्या 'जगात देखणी, भिमाची लेखणी' या अजरामर ओळीचे दखल घेतली, ज्यामागे डॉ. जाधव यांचे परिश्रम होते. प्रा. डॉ. सागर जाधव हे आंबेडकरी सांस्कृतिक प्रवाहातील एक प्रतिभासंपन्न व्यक्तिमत्त्व आहेत. जीवननिष्ठा आणि ज्ञाननिष्ठा यांची एकरूपता त्यांनी तथागत बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याशी जोडल्यामुळे, एक आंबेडकरी विचारवंत म्हणून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्यांची ओळख निर्माण झाली आहे. अशी माणसे तांत्रिकदृष्ट्या सेवानिवृत्त होत असली, तरी त्यांच्या कार्यातून ते कधीच निवृत्त होत नाहीत. ज्ञानाच्या क्षेत्रात निवृत्तीचा विचार त्यांच्या स्वप्नातही येणार नाही. सेवानिवृत्तीच्या क्षितिजावर उभे असतानाही, ते समाजाच्या परिवर्तनवादी आशयाचीच मांडणी करत राहतील, याबद्दल शंका नाही. त्यांच्यातील समाजाप्रती असलेली तळमळ कधीही ओसरणार नाही, हा दुर्दम्य आशावाद व्यक्त करत, त्यांच्या पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

प्रा. डॉ. सागर जाधव यांच्या कार्यकर्तृत्वाला समर्पित काही ओळी:

'जीवन में असली उडान
अभी बाकी हैं,
हमारे इरादों का इम्तिहान
अभी बाकी हैं,
अभी तो नापी हैं, सिर्फ
बस मुठ्ठी भर जमीन,
अभी सारा आसमान बाकी हैं!'

## लोकार्थ

### अहमदाबाद विमान अपघातातील बळींसाठी एलआयसीच्या सवलती जाहीर

अहमदाबाद येथे झालेल्या एअर इंडियाच्या फ्लाइट एआय १७१ मधील प्रवाशांच्या आणि क्रू सदस्यांच्या तसेच जमिनीवरील लोकांच्या मृत्यूबद्दल एलआयसी ऑफ इंडिया तीव्र दुःख व्यक्त करते. एलआयसी ऑफ इंडिया बाधितांना मदत करण्यास वचनबद्ध आहे आणि आर्थिक मदत देण्यासाठी दाव्याचे निपटारे जलद करेल.

एलआयसी ऑफ इंडियाने एलआयसी पॉलिसींच्या दावेदारांच्या अडचणी कमी करण्यासाठी अनेक सवलती जाहीर केल्या आहेत. मृत्यू प्रमाणपत्रांऐवजी, विमान अपघातामुळे पॉलिसीधारकाच्या मृत्यूच्या सरकारी नोंदींमधील कोणताही पुरावा किंवा केंद्र/राज्य सरकार/विमान प्राधिकरणांनी दिलेली कोणतीही भरपाई मृत्यूचा पुरावा म्हणून स्वीकारली जाईल.दावेदारांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि बाधित कुटुंबांना दावे जलदगतीने निकाली काढण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील.अधिक मदतीसाठी दावेदार जवळच्या शाखा/विभाग/ग्राहक क्षेत्राशी संपर्क साधू शकतात.दावेदार आमच्या कॉल सेंटरवर देखील कॉल करू शकतात - ०२२ ६८२७६८२७

### एमसीए पुणे येथे बजाज लायटिंगद्वारे एलईडी रूपांतरणासह स्टेडियमला चमक



नावीन्य, कामगिरी आणि शाश्वतता यांचे मिश्रण करून एक ऐतिहासिक पाऊल उचलत, बजाज लाइटिंगने पुण्यातील गहुंजे येथील प्रतिष्ठित महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन (एमसीए) स्टेडियमचे पुढील पिढीतील एलईडी फ्लडलाइटिंगसह यशस्वीरित्या अपग्रेड केले आहे. हे केवळ पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा करण्यापेक्षा अधिक आहे - हे क्रीडा प्रकाशयोजना आणि प्रसारण उत्कृष्टतेमध्ये जागतिक मानके स्थापित करण्याच्या भारताच्या तयारीचे एक धाडसी विधान आहे.या परिवर्तनात ब्लास्टर एलईडी, बजाज लाइटिंगची अत्याधुनिक फ्लडलाइटिंग सिस्टम समाविष्ट आहे,जी खेळाच्या मैदानावर एकसमान, चकाकी मुक्त प्रकाशयोजना देण्यासाठी डिझाइन केलेली आहे. आंतरराष्ट्रीय क्रीडा मानकांनुसार डिझाइन केलेली, प्रकाश व्यवस्था केवळ सुधारित प्रकाश योजनाच नाही तर खेळाडू, स्टेडियम प्रेक्षक आणि जगभरातील लाखो प्रेक्षकांसाठी एक तल्लीन करणारा अनुभव देखील देते.''हा प्रकल्प सीमा ओलांडण्याच्या आमच्या अटल वचनबद्धतेचे प्रतिबिंबित आहे,'' बजाज लाइटिंग सोल्युशन्सचे सीओओ राजेश नाईक म्हणाले. ''बजाज लाइटिंगमध्ये, आमचा असा विश्वास आहे की प्रकाशयोजना प्रेरणादायी आणि सक्षम बनवावी. एमसीए स्टेडियमसह, आम्ही केवळ जागतिक दर्जाची प्रकाशयोजनाच दिली नाही तर भारतीय क्रीडा स्थळांच्या भविष्याचा पाया देखील घातला आहे - जिथे तंत्रज्ञान, शाश्वतता आणि कामगिरी एकत्र येतात.''

### आल्पेनलिबेने भारतातील पहिले लिक्विड चॉको भरलेले पॉप केले लॉन्च!




आल्पेनलिबे इक्लेयर्स ही तिच्या समृद्ध, चोको सारखे लिक्विड ने भरलेल्या स्वादासाठी ओळखली जाते आणि अनेक वर्षांपासून ती ग्राहकांची आवडती राहिली आहे. या खास आणि लोकप्रिय चवेला पुढे नेत, आल्पेनलिबे आता घेऊन आली आहे एक नवे रूप, आल्पेनलिबे इक्लेयर्स पॉप, भारतातील पहिली लॉलीपॉप ज्यामध्ये आहे चोको सारख्या लिक्विड भरलेलं.

केवळ ₹५ मध्ये मिळणारी इक्लेयर्स पॉप एक खास स्वादानुभव देते, बाहेरून मऊ आणि चवदार कैरेमलचा थर आणि आतमध्ये गोडसर, वाहणारा चोको सारखा लिक्विड फिलिंग. ही लज्जतदार ट्रीट आता अधिक सोयीस्कर आणि सहज खाण्यासारख्या रूपात सादर करण्यात आली आहे, विशेषतः किशोरवयीन आणि तरुणांसाठी, जे कोणत्याही वेळी, कुठेही आपली गोड खाण्याची इच्छा पूर्ण करू इच्छितात. हळूहळू चव घेतली तरी वा एकदम खाल्ली तरीही इक्लेयर्स पॉप नेहमीच्या स्नॅक्सला एका गोड चोको सारख्या आनंदात बदलतो.

संकलन -संयोजन : सुशीलकुमार मोबाईल -९६१९५८२८३५ ईमेल -susheelkuma80@yahoo.com

## आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 73



संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दच योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः—**

**दोन अक्षरी**

- अर्क
- अग्नि
- कसा
- कळ
- कोप
- कुंभ
- गडी
- गुप्त
- चाप

जप

- ढग
- तम
- ताट
- धाक
- धाप
- धोका
- नट
- नव
- पद
- पन्हे
- पल
- बोरू
- भार्या
- मन
- मांजा
- राम
- लक
- वर
- वास
- शाल
- शेर
- संग
- सर
- स्तुती
- क्षति

**तीन अक्षरी**

- अलिप्त
- आगरा
- आजार
- आजोळ
- आरुढ
- आश्रित
- कर्कशा
- कनक
- कस्तुरी
- कातडी
- गमन
- जनक
- दमन
- धोतर
- नरम
- पगडी
- पगार
- पवन
- पाडवा
- बालिश
- भावार्थ
- भेसळ
- मलम
- मलिदा
- महान
- रजक
- लटक
- वंचित
- वरण
- वऱ्हाड
- वसंत
- वानर
- विनाश
- शासक
- सभ्यता
- हासरा

**चार अक्षरी**

- अध्यापक
- अनामिका
- अनुवाद
- अमर्याद
- करवंद
- कलाटणी
- कसरत
- काकरव
- काकलक
- डमडम
- वरदान
- शालजोडी
- श्रीगणेशा
- सरगम

**अन्य अक्षरी**

- अग्निशामक
- अलभ्य लाभ
- आडपडदा
- बागुलबुवा
- बुजगावणे
- मांसभक्षक
- विचारवंत
- साम दाम दंड भेद

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोडेचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ■ | सा | रा | सा | र | वि | चा | र | ■ | बा | ■ | सा | ख | र |
| ■ | म | त | ल | ब | ■ | रू | ■ | सा | र | ना | थ | ■ | सा |
| का | ■ | वा | ■ | डी | ■ | ■ | मि | र | गी | ■ | क | ■ | य |
| न | फा | ■ | व | ■ | वा | ट | ■ | स | र | ■ | री | ग | न |
| न | ■ | गी | त | का | र | ■ | मा | ■ | ■ | स | ■ | ज | ■ |
| ■ | भू | ता | न | ■ | क | मा | ल | खा | नी | हा | र | ■ | ह |
| च | ■ | ई | ■ | वा | री | स | ■ | क | र | ■ | ह | मा | म |
| क | ट्टी | ■ | का | च | ■ | ■ | ■ | क्षी | र | सा | ग | र | |
| म | ■ | म | स्त | क | ■ | चा | ■ | खू | र | ■ | ळी | ■ | स्ता |
| क | प | ■ | का | ■ | पा | म | र | ■ | न्या | रा | ■ | ■ | ■ |
| ■ | गा | ज | र | पा | र | खी | ■ | भा | य | ख | ळा | ■ | द |
| था | र | ■ | ■ | ट | वा | ळ | खो | र | ■ | ■ | ■ | य | म |
| ट | ■ | पा | व | ली | ■ | ■ | च | त | को | र | ■ | ज | न |
| मा | हू | त | ■ | पु | ■ | सु | क | र | ■ | सि | ने | मा | ■ |
| ट | ■ | ■ | सु | त्र | धा | र | ■ | त्न | ■ | क | ■ | न | ग |

Uday Munde - 8446302691

## महाशब्दकोडे 453



**—: आडवे संकेत :—**

1) कोणतेही चांगले काम झटपट व लवकर केलेले बरे या अर्थाचा एक संस्कृत शब्दप्रयोग
4) आवृत्ती करणे, उजळणी, पारायण
6) अत्यावश्यक कर्म
8) पूर्णता, बहर, आवेश
9) साठी, करीता
11) काडीभोवती कापूस गुडाळून देवापुढे लावण्यात येणारी मोठी वात
13) कडे, वर्तुळ
15) उज्जयिनी नगरी
16) देणे, सोडणे, अर्पण करणे
17) मुठीचा तडाखा, गुद्दा
18) तात्पर्यार्थ, सत्वांश
19) येशू ख्रिस्तांच्या जन्मदिवसाचा उत्सव
21) निषेध, बंदी
22) गुरे बांधण्याची जागा
23) दक्ष, जागृत
25) एखाद्या गोष्टीची किळस येणे
28) जिचा कुणी मालक नाही अशी वस्तू
29) आडदांडपणाने केलेले काम
31) धमकी देणे, दहशत दाखविणे
33) उपभोक्ता, रमणारा, पुरुष
35) नाशकर्ता, वेळ
36) वजा, न्यून, कमी
37) वृद्धिंगत, उमलणे
40) मुद्देसूद, तपशीलवार
42) राग, त्वेष
43) मार्गस्थ, निघालेला
44) अंग मोडून येणे, अस्वस्थ वाटणे
45) वजन, तोल
46) विशेष सलगी
47) अंगावरील काळा डाग
49) अधिकाराखालील प्रदेश
50) अंगिकारलेले व्रत
51) वास घेणे, हुंगणे
53) थंड, शीत
54) लक्ष वेधून घेणारे, उत्कृष्ट
56) उत्पत्ती, जन्म, संसार
57) पदर, पल्लव
58) झाडावरच पिकू लागलेले फळ
59) एकसारखे टक लावून पाहणे
63) समाजातील प्रतिष्ठा
64) स्वर, नाद
66) ईश्वराचे सर्वव्यापी स्वरूप
68) जाणे—येणे, रहदारी
69) तबलावादक
71) ताठा, गुर्मी
73) वृक्ष, झाड
74) उजाड, उदास
75) ईश्वर

**—: उभे संकेत :—**

1) शुभेच्छा व्यक्त करणे
2) भरडलेली डाळ
3) बीजगणितातील म.सा.वि.चे विस्तारीत रूप
4) स्मरण, याद, स्मृती
5) रुग्णांची सेवा करणारा परिचारिका (इं)
6) कलाकार, एखादी कला सादर करणारा
7) उलटे, भिन्न
10) मालाच्या साठवणुकीसाठी वापरले जाणारे मोठे गोदाम
12) वायूचा क्षोभ
14) दिल्लीजवळून वाहणारी नदी
15) इतरांच्या समोर राहणे, सर्वात अगोदर काम करणे
18) संचय, संग्रह
20) फुलांचा वाफा
21) ओकारी होईल असे वाटणे
23) सासुरवाडी, बायकोचे किंवा नवऱ्याचे माहेर
24) दागिना, पर्वत
26) चोवीस कागदांचा एक याप्रमाणे वीस दस्ते
27) गजानन
30) ढेकर (हिं)
32) तुरुंगवास
34) अंगावर उगविलेला काळा डाग
36) न बोलविता उपस्थित झालेला
37) विक्रय करणे
38) काख, कासोटा, कंबर
39) सर्व, सगळे
41) थर, पडदा
42) सुमारे दोन मैल
43) निमग्न होणे, रममाण होणे
46) यंत्रे वापरल्यामुळे त्यांच्या किमतीत पडणारी तूट
48) लाकूड कापण्याचे हत्यार
49) कणखर, बळकट
52) दूध दह्याच्या विक्रीचा व्यवसाय करणारा
53) गाल, थोबाड
54) रस्त्यापासून दूरची जागा
55) अनेक पायांचा एक जीवाणू
58) पारा
60) अलंकार शास्त्रातील नवरसांपैकी एक
61) इच्छिलेले फळ देणारा एक काल्पनिक वृक्ष
62) विडा
65) सत्ताविसावे नक्षत्र
66) मनोभंग
67) क्रोध, संताप
70) जिव्हा, रसना
72) प्रामाणिक व पतदार मनुष्य

(उत्तर पुढील अंकी)

### मागील महाशब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रो | गी | ■ | हो | का | र | ■ | उ | त्स | व | मू | र्ति | ■ | भु | जं | ग | ■ |
| मां | ■ | ■ | त | न | ■ | त | प | ■ | श | ल्य | ■ | प्र | या | ग | ■ | श्री |
| चि | कि | त्स | क | ■ | स | मा | चा | र | ■ | वा | ■ | स | र | ल | ता | ■ |
| त | म | ■ | रु | प | क | ■ | र | स | पा | न | ■ | व | ■ | ■ | रा | ख |
| ■ | या | त्रा | ■ | सा | स | र | ■ | क | च | ■ | आ | वे | द | न | ■ | ल |
| शें | ■ | गा | भा | रा | ■ | ■ | शा | स | क | ■ | ■ | द | ■ | य | मु | ना |
| डे | रा | ■ | ट | ■ | सु | ग्री | व | ■ | ■ | ■ | स | ना | त | न | ■ | य |
| फ | णी | ■ | क | ■ | सं | ■ | क | ल्प | ना | श | क्ति | ■ | मा | ■ | वा | क |
| ळ | ■ | त्र्यं | ■ | नि | वा | रा | ■ | ■ | मो | ह | ■ | गु | ल | कं | द | ■ |
| ■ | सु | ब | क | ■ | द | म | ■ | दा | ह | ■ | आ | प्त | ■ | क | ळ | प |
| भू | ■ | के | व | ळ | ■ | बा | ■ | स | र | स | ■ | म | ■ | ण | ■ | ट |
| ■ | अ | श्व | ■ | ■ | गु | ण | क | ■ | म | ■ | ■ | त | ग | ■ | शो | क |
| सा | क्ष | र | ■ | बा | द | ■ | रा | ब | ■ | ब | ल | दा | य | क | ■ | था |
| र | म्य | ■ | गु | ला | म | गि | री | ■ | ना | क | ■ | न | ■ | स | ड | क |
| वा | ■ | ■ | ■ | ■ | र | ■ | ■ | उ | ■ | ब | ■ | ■ | सी | ■ | ग | र |
| न | क्त | ■ | पा | र | णे | फि | ट | णे | ■ | क | न्या | कु | मा | री | ■ | ■ |

Uday Munde - 8446302691

## राशी-भविष्य

**मेष** : आजची भांडवली गुंतवणूक फायदेशीर ठरेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला आदर मिळेल. व्यवसायात वाढ झाल्यामुळे, तुमच्या योजनांनुसार काम होईल.

**वृषभ:** महत्वाची कागदपत्रे वेळेवर सांभाळा, सामाजिक कार्यात तुम्हाला आदर मिळेल. कायमस्वरूपी मालमत्ता खरेदी करण्यात घाई करू नका.

**मिथून** : आज सर्जनशील काम होईल. नवीन करार आणि करारांमुळे तुमचा नफा वाढेल. दिवस दैवी कामात घालवला जाईल.

**कर्क** : धर्मादाय कामात पैसा खर्च होईल. सामाजिक कार्यातून तुम्हाला चांगली प्रसिद्धी मिळेल आणि तुमचा प्रभाव वाढेल. व्यवसाय चांगला चालेल. कौटुंबिक जबाबदाऱ्यांकडे लक्ष द्या.

**सिंह** : कामाच्या अतिरेकात, यशामुळे मनोबल मजबूत राहील, अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका, तुमची फसवणूक होऊ शकते.

**कन्या** : आनंद आणि समृद्धी वाढेल. आर्थिक गुंतवणुकीत विचारपूर्वक निर्णय घेतल्यास नफा होईल. कमी बोला आणि चांगले बोला.

**तुळ** : व्यवसायात सुरू असलेल्या गुंतागुंतीमुळे तुम्ही त्रस्त असाल. काम पूर्ण करण्यासाठी तुम्ही कुटुंबातील सदस्यासह प्रार्थनास्थळांना भेट द्याल.

**वृश्चिक** : दिवसाच्या सुरुवातीला रागाचे वर्चस्व राहील. तुमच्या इच्छेनुसार काम न झाल्यामुळे तुम्ही कुटुंबातील सदस्यांवर रागावाल.

**धनु** : गुंतवलेल्या पैशातून मिळणाऱ्या नफ्यात विलंब होईल. मुलासाठी निर्णय घेण्यात दुविधा होईल. आर्थिक परिस्थितीमुळे बांधकाम कामाची गती प्रभावित होऊ शकते.

**मकर** : कमी वेळेत जास्त नफा मिळविण्याच्या प्रक्रियेत अडकू नका. कठोर परिश्रम करा. कामाच्या ठिकाणी तुमच्या शौर्याची प्रशंसा वाढेल.धार्मिक आवड वाढेल.

**कुंभ** : आज विशेष प्रगतीशील योगांमुळे मनात आनंद राहील. तुम्ही तुमचे मन भक्तीत ठेवण्याचा प्रयत्न कराल. कामाच्या ठिकाणी अनुकूल परिणामांसाठी क्रियाकलाप आवश्यक आहे.

**मीन** : आळस सोडून काम करा. रखडलेल्या कामात तुम्हाला यश मिळेल. भांडवली गुंतवणुकीत तुम्हाला अपेक्षेपेक्षा जास्त नफा मिळेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३




## थोडक्यात

### २६५ लाभार्थ्यांना पट्टे वाटप लवकरच

**नागपूर :** खापरी गावठाणातील २६५ लाभार्थ्यांना लवकरच पट्टे वाटप करण्यात येणार असल्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी म्हटले आहे. मिहान प्रकल्पांतर्गत मौजा-खापरी (रेल्वे) गावठाणातील प्रकल्पग्रस्तांना शनिवारी पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते प्रातिनिधिक पट्टे वाटप करण्यात आले. यावेळी एकूण ५०० पात्र लाभार्थ्यांना पट्टे वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, नागपूर (ग्रामीण) च्या उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते, माजी जिल्हा परिषद सदस्य रुपराव शिंगणे, खापरीचे माजी सरपंच केशवराव सोनटक्के आदी उपस्थित होते.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार ६ जुलैला

**नागपूर :** तिरळे कुणबी सेवा मंडळाच्या वतीने २०२४-२५ मध्ये इयत्ता १० वी आणि १२ वी इयत्तांमध्ये उच्च गुणवत्ता मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे हा कार्यक्रम ६ जुलै २०२५ रोजी सकाळी ९.३० वाजता 'तिरळे कुणबी सेवा मंडळ टाऊन हॉल बिडीपेठ येथे होणार आहे. विद्यार्थ्यांच्या सत्कारासोबत भविष्यातील करिअर संदर्भात ज्येष्ठ समुपदेशक डॉ. प्रा. आशीष तायवाडे यांचे प्रबोधनात्मक व्याख्यान होणार आहे विद्यार्थी व पालकांनी विद्यार्थांची गुणपत्रिका आणि आवश्यक माहिती मंडळाच्या कार्यालयात सकाळी १० ते १२ आणि सायंकाळी ६ ते ८ या वेळेत प्रत्यक्ष आणून देणे. याशिवाय पुढील क्रमांकावर व्हाट्सअप करता येईल. अध्यक्ष पी.बी.वाकडे पाटील ९९२०२८२३७७, सचिव नितीन हांडे ९०४९०९१९९०, कोषाध्यक्ष महादेव बोराडे - ८६००९६१६२५. समस्त समाजबांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### चोरट्याने रोख दागिने पळविले

**नागपूर :** घराच्या मुख्य दाराला कुलूप लावून वरच्या माळ्यावर झोपण्यासाठी गेलेल्या व्यक्तीच्या घरातील रोख व दागिने असा १ लाख ४४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेला. ही घटना यशोधरानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत शुक्रवारी १३ जूनला रात्री ११ ते शनिवारी १४ जूनला सकाळी ७ वाजताच्या दरम्यान घडली. छगन केवलराम उके (५०, रा. एनआयटी क्वार्टर - नं. बी २७, २०७) हे आपल्या घराच्या मुख्य दाराला कुलूप लावून वरच्या माळ्यावर झोपण्यासाठी गेले होते. अज्ञात आरोपीने त्यांच्या दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. आरोपीने लोखंडी कपाटाचे लॉकर तोडून एकूण १ लाख ४४ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला.

विशेष तपास पथकाची धडाकेबाज कारवाई | शिक्षकांकडून प्रत्येकी १५ लाख रुपये उकळले | नोकरी एका शाळेत, नियुक्ती दुसऱ्याच संस्थेत

# शालार्थ आयडी घोटाळ्यात आणखी एकाला अटक

## मोहपा येथील संस्थाचालक दिलीप धोटे जेरबंद

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १५ :** नागपुरातील शालार्थ आयडी घोटाळ्यात, विशेष तपास पथकाने (एसआयटी) मोहपा येथील संस्थाचालक दिलीप धोटे याला अटक केली आहे. १५ शिक्षकांना बनावट आयडी देऊन, प्रत्येकी १५ लाख रुपये उकळल्याचा आणि त्यांच्या वेतनातूनही कपात केल्याचा त्याच्यावर गंभीर आरोप आहे. या कारवाईने मोठे रॅकेट उघडकीस आले आहे.

शालार्थ आयडी घोटाळ्यामध्ये दररोज नवनवीन प्रकरणे समोर येत असून, या प्रकरणात काही वरिष्ठ अधिकारी अटकेत असताना, आता विशेष तपास पथकाने (एसआयटी) आणखी एक मोठी कारवाई केली आहे. मोहपा येथील विठ्ठल रुक्मिणी शिक्षण संस्थेचे संस्थाचालक दिलीप भास्कर धोटे याला एसआयटीने शनिवारी अटक केली. धोटे याने १५ शिक्षकांना बनावट शालार्थ आयडी तयार करून, त्यांच्याकडून प्रत्येकी १५ लाख रुपये उकळून त्यांना नोकरी दिल्याच्या आरोपाखाली ही कारवाई करण्यात आली. तपास पथकाने दिलेल्या माहितीनुसार, धोटे याने १५ शिक्षकांची नियुक्ती केल्याचा आरोप आहे. धक्कादायक बाब म्हणजे, या शिक्षकांची कागदोपत्री नियुक्ती त्याने स्वतःच्या विठ्ठल रुक्मिणी शिक्षण संस्थेत दाखवली, मात्र प्रत्यक्षात त्यांना दुसऱ्याच शाळेत नोकरीवर ठेवले होते. संबंधित शिक्षकांनी चौकशीदरम्यान, नोकरीसाठी धोटे याला प्रत्येकी १५ लाख रुपये दिल्याची कबुली दिली आहे. इतकेच नव्हे, तर त्यांना मिळत असलेल्या वेतनातूनही काही रक्कम धोटे स्वतःकडे ठेवत असल्याची माहिती या शिक्षकांनी एसआयटीला दिली आहे. या प्रकरणात यापूर्वी पोलिसांनी चरण चेटुले (६३, रा. भंडारा) यांना अटक केली होती, आणि आता धोटेच्या अटकेमुळे या घोटाळ्याची व्याप्ती आणखी वाढण्याची शक्यता आहे. एसआयटी प्रमुख तथा सहायक पोलीस आयुक्त सुनीता मेश्राम यांनी, शिक्षकांनी दिलेल्या कबुलीजबाबाच्या आधारावरच धोटे याला अटक करण्यात आल्याचे स्पष्ट केले. या घोटाळ्याचा आवाका आणि त्यातील कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार पाहता, आता नागपूरसह संबंधित जिल्ह्यातील सर्वच शैक्षणिक संस्थांची सखोल चौकशी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.





### १५ लाखांत नोकरी, पगारातही कपात!

संस्थाचालक दिलीप धोटे याने प्रत्येक शिक्षकाकडून नोकरी लावण्यासाठी १५ लाख रुपये घेतल्याचा आरोप आहे. शिक्षकांनी याची कबुली दिली आहे. धक्कादायक म्हणजे, नोकरी दिल्यानंतरही या शिक्षकांच्या वेतनातून काही रक्कम धोटे स्वतःसाठी कापून घेत होता. या प्रकाराने शिक्षण क्षेत्रातील शोषणाचे गंभीर स्वरूप समोर आले आहे.

### सर्वच संस्थांची चौकशी करा

शालार्थ आयडी घोटाळ्याची व्याप्ती आणि त्यातील कोट्यवधी रुपयांचा भ्रष्टाचार लक्षात घेता, आता नागपूरसह संबंधित जिल्ह्यातील सर्वच शैक्षणिक संस्थांची सखोल चौकशी (स्कॅनिंग) करण्याची मागणी जोर धरत आहे. या तपासाच्या कक्षेत संस्थाचालक, मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांना आणण्याची मागणी होत आहे.

### एसआयटीच्या तपासाचा धडाका सुरूच

शालार्थ आयडी घोटाळ्याचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) आपली कारवाई अधिक तीव्र केली आहे. काही वरिष्ठ शिक्षण अधिकाऱ्यांच्या अटकेनंतर, एसआयटीने आता थेट संस्थाचालकांना लक्ष्य केले आहे. मोहपा येथील दिलीप धोटे यांच्या अटकेमुळे घोटाळ्याचे धागेदोरे संस्थाचालकांपर्यंत पोहोचल्याचे स्पष्ट झाले. यापूर्वी भंडारा येथील चरण चेटुले यांनाही अटक झाली होती.

## पर्यटनस्थळी गंभीर अपघात

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १५ :** मनालीत पर्यटनाला गेलेली नागपूरकर मुलगी उंच भागात झिप लाईनवर साहसी खेळ खेळत असताना बेल्ट तुटल्याने ३० फुट खाली पडली यात ती गंभीर जखमी झाली असून, पायातील हाड मोडल्याने उपचार सुरू आहे. नागपूरचे रहिवासी प्रफुल्ल बिजवे उन्हाळी सुटीचा आनंद घेण्यासाठी पत्नी आणि मुलगी त्रिशासोबत मनाली येथे गेले होते. ८ जून रोजी त्रिशा झिप लाइनरवर साहसी खेळ खेळत होती. झिप लाईनवर ती लटकून खाली येत असताना अचानक बेल्ट तुटला. त्यामुळे ती तब्बल ३० फुट उंचीवरून खाली पडली. खडकाळ जमिनीवर पडल्याने त्रिशाच्या पायात अनेक फ्रॅक्चर झाले. हा प्रकार बघून तातडीने परिसरातील नागरिक त्रिशाच्या दिशेने धावले. या घटनेत त्रिशाला गंभीर दुखापत झाल्यावर तातडीने स्थानिक रुग्णालयात हलवले गेले.

**CAPTION** वडाचे झाड...



**नागपूर :** गणेशपेठ मध्यवर्ती बसस्थानकाजवळील बैद्यनाथ चौकातील हे वडाचे झाड़ त्याचा काही भाग अशोक चौकाकडे जाणा या रस्त्यावर झुकला आहे. जड वाहनांचा वरील भाग खेटून जात असल्याने झाडाचा काही भाग असा उधळल्या जात आहे मनपा प्रशासनाने वडाचे अधिक नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.

# श्री सदानंद सरस्वती महाराजांची सिनिअर भोसला पॅलेसला भेट

## सध्याच्या विविध घडामोडींवर चर्चा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि.१५ :** जगद्गुरु भगवान शंकराचार्य स्वामी श्री सदानंद सरस्वतीजी महाराज यांनी शनिवारी नागपूर महाराज श्रीमंत राजे मुधोजी महाराज भोसले यांच्या सिनिअर भोसला पॅलेस निवासस्थानी सदिच्छा दिली.




राजपरिवाराच्या वतीने शंकराचार्यांचे पाद्यपुजन, स्वागत करण्यात आले. यावेळी श्रीमंत राजे रघुजी महाराज भोसले (पाचवे), नागपूर युवराज श्रीमंत राजे जयसिंह भोंसले, मध्यप्रदेश राज्यमंत्री दर्जा हेमंत देशमुख, अखिल भारतीय क्षत्रिय महासभेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष ठाकूर किशोरसिंह बैस, मुलताईचे उपनगराध्यक्ष शिवकुमार माहुरे, माजी नगरसेवक सुधीर (बंडु) राऊत, माजी नगरसेविका चेतना राजू टांक, छत्रपती शिवाजी महाराज स्मारक समितीचे सचिव मंगेश डुके, महाराजा ऑफ नागपूर ट्रस्टचे पदाधिकारी व सदस्य गण प्रामुख्याने उपस्थित होते.

# अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन केल्यास परवाना रद्द करणार : आयुक्तांचा इशारा

## शाकाहारी-मांसाहारी पदार्थ वेगळे न ठेवल्यास कारवाई

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १५ :** अन्नसुरक्षा नियमांचे पालन न करणाऱ्या अन्न व्यावसायिकांवर परवाना रद्द करणे, दंड आकारणे आणि कायदेशीर कारवाई करण्यासह कठोर पावले उचलली जातील, असा स्पष्ट इशारा अन्न व औषध प्रशासनाचे अन्नसुरक्षा आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिला आहे. अन्नसुरक्षा ही केवळ कायदेशीर बाब नसून, ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित महत्त्वाची सामाजिक जबाबदारी असल्याचेही त्यांनी नमूद केले.

अन्नसुरक्षा व मानके अधिनियम, २००६ आणि नियमन, २०११ मधील अनुसूची चारनुसार, सर्व अन्न व्यावसायिकांनी शाकाहारी व मांसाहारी पदार्थांची तयारी, प्रक्रिया आणि शिजवण्याची व्यवस्था स्पष्टपणे वेगळी ठेवणे अनिवार्य आहे. या नियमांचे पालन न करणाऱ्या आस्थापनांना तात्काळ नोटीस देऊन कारवाई केली जात असल्याचे नार्वेकर यांनी सांगितले. अन्न व औषध प्रशासन आणि भारतीय अन्न सुरक्षा आणि मानके प्राधिकरण (FSSAI) यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यभर प्रशिक्षण शिबिरे, कार्यशाळा व जनजागृती मोहिमा राबवल्या जात आहेत. गतवर्षी ३० हजार व्यावसायिकांना प्रशिक्षण देण्यात आले असून, यंदा एक लाख व्यावसायिकांना प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे. विशेष म्हणजे, अन्न व औषध प्रशासनात ७ जून २०२५ रोजी १८९ नवीन अन्नसुरक्षा अधिकारी रुजू झाल्याने, आता राज्यभरातील हॉटेल्स, रेस्टॉरंट्स व उपाहारगृहांमधील तपासण्यांची संख्या निश्चितच वाढणार आहे. अन्नभेसळीसंदर्भात नागरिकांनी पुढे येऊन हेल्पलाईन किंवा ॲपच्या माध्यमातून तक्रार करावी, असे आवाहनही आयुक्तांनी केले आहे.

# विवाह सोहळ्यात ३४ जणांना विषबाधा

## ११ जणांना नागपूरच्या मेडिकलमध्ये हलवले, प्रकृती चिंताजनक!

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**भिवापूर, दि. १५ :** भिवापूर येथील एका विवाह सोहळ्यातील जेवणातून ३४ जणांना विषबाधा झाली असून, ११ जणांना उपचारासाठी नागपूरच्या मेडिकलमध्ये हलवण्यात आले आहे. दहीवडा आणि गुलाबजामुळे ही विषबाधा झाल्याचा प्राथमिक संशय असून, आरोग्य विभागाने जेवणाचे नमुने तपासणीसाठी पाठवले आहेत; सध्या परिस्थिती नियंत्रणात असल्याचे सांगण्यात आले आहे.



भिवापूर येथील एका विवाह समारंभाला विषबाधेचे गालबोट लागले असून, लग्नातील जेवणानंतर तब्बल ३४ वऱ्हाड्यांना विषबाधा झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. यापैकी ११ जणांची प्रकृती अधिकच बिघडल्याने, त्यांना पुढील उपचारांसाठी नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात (मेडिकल) दाखल करण्यात आले आहे. स्थानिक तिलक वाघमारे यांच्या मुलीचा विवाह सोहळा गुरुवारी येथील जिचकार सभागृहात उत्साहात पार पडला. मात्र, रात्रीच्या जेवणानंतर अनेकांना मध्यरात्री तीन वाजताच्या सुमारास (शुक्रवारी पहाटे) उलट्या, मळमळ आणि तीव्र पोटदुखीचा त्रास सुरू झाला. त्यामुळे एकच खळबळ उडाली आणि शुक्रवार सकाळपासून अनेक रुग्णांना येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यास सुरुवात झाली. आतापर्यंत ३४ लोकांना विषबाधा झाल्याचे स्पष्ट झाले असून, उर्वरित रुग्णांवर भिवापूर ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. प्राथमिक अंदाजानुसार, जेवणातील दहीवडा आणि गुलाबजामुळे ही विषबाधा झाली असावी, असा संशय व्यक्त होत आहे. घटनेची माहिती मिळताच, आरोग्य विभागाचे एक पथक तातडीने भिवापूरमध्ये दाखल झाले. अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. इमानदार, जिल्हा परिषदेच्या साथरोग नियंत्रण अधिकारी डॉ. मनीषा लोंढे, सोमनाळा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. केवळ कोरडे आणि डॉ. वाय. बी. बोडखे यांनी रुग्णालयात जाऊन रुग्णांची भेट घेतली आणि त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. आरोग्य पथकाने घटनास्थळी भेट देऊन, लग्नातील जेवणाचे नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठवले आहेत.

# तीव्र इच्छाशक्ती असेल, तर कोणतेही लक्ष्य गाठता येऊ शकते

## आयुक्त डॉ. सिंगल : सेवानिवृत्त पोलिस अधिकारी, अंमलदारांचा स्नेहमेळावा संपन्न, रोजगार मेळाव्याची घोषणा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. १५ : नागपूर पोलिस दलातील ३७८ सेवानिवृत्त अधिकारी व अंमलदारांचा स्नेहमेळावा नुकताच उत्साहात पार पडला. आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, सेवानिवृत्त महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी मार्गदर्शन केले. यावेळी सेवानिवृत्तांच्या मुलांसाठी रोजगार मेळाव्याची महत्त्वपूर्ण घोषणाही करण्यात आली. हा एक भावनिक सोहळा ठरला. यावेळी आयुक्त डॉ. सिंगल यांनी 'तीव्र इच्छाशक्ती असेल, तर कोणतेही लक्ष्य गाठता येऊ शकते', असे मत व्यक्त केले.**



नागपूर पोलिस दलातील सेवानिवृत्त अधिकारी आणि अंमलदारांसाठी आयोजित 'स्नेहमेळावा' शनिवारी पोलिस मुख्यालयातील अलंकार हॉलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात ३७८ सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांनी उपस्थिती लावून जुन्या आठवणींना उजाळा दिला. अनेक वर्षांनी भेटलेल्या सहकाऱ्यांमुळे उपस्थितांच्या मनात जिव्हाळा, आत्मीयता आणि नात्यांची ऊब निर्माण झाल्याचा अनुभव अनेकांनी घेतला. यावेळी सेवानिवृत्त पोलिस महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय, पोलिस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, डॉ. निकुंज पवार यांच्यासह अनेक निवृत्त वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी आपल्या प्रदीर्घ पोलीस सेवेतील अनुभव कथन केले आणि सर्वांनी स्नेहमैत्री व संवाद कायम ठेवावा, असे आवाहन केले. त्यांनी आरोग्यासंबंधी महत्त्वाच्या टिप्सही दिल्या. पोलिस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल यांनी आपल्या मनोगतात, "पोलीस दल ही केवळ शिस्त आणि कर्तव्याची खूण नसून, सामाजिक बांधिलकी आणि माणुसकीचा संदेश देणारी संस्था आहे. वय ही केवळ एक संख्या असून, इच्छाशक्तीच्या जोरावर कोणतेही लक्ष्य गाठता येते. त्यामुळे, आपल्या अनुभवाचा समाजासाठी उपयोग करा," असे आवाहन केले. याचवेळी, आयुक्तांनी सेवानिवृत्तांच्या मुला-मुलींसाठी लवकरच एक रोजगार मेळावा आयोजित करण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. यासाठी लवकरच बायोडाटा संकलन सुरू होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. डॉ. निकुंज पवार यांनी आरोग्यविषयक माहिती दिली आणि आपल्या सुश्राव्य गायनातून उपस्थितांमध्ये एक नवचैतन्य निर्माण केले. हा केवळ एक औपचारिक कार्यक्रम नसून, एका भावनिक पुनर्मिलनाचा सुंदर क्षण असल्याची भावना अनेकांनी यावेळी व्यक्त केली.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन

सेवानिवृत्त महासंचालक डॉ. भूषणकुमार उपाध्याय यांनी अनुभवाचे बोल सांगत, संवाद आणि मैत्री कायम ठेवण्याचा सल्ला दिला. तर, आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल यांनी, "निरोगी राहा, आनंदात राहा आणि समाजासाठी आपल्या अनुभवाचा उपयोग करा," असे आवाहन केले, ज्यामुळे उपस्थितांमध्ये एक नवीन उत्साह संचारला.

# भारत विरुद्ध न्यूझीलंड मालिकेची घोषणा

## विराट-रोहित मैदानात उतरणार




**नवी दिल्ली: दि. १५ प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) पुढील वर्षी होणाऱ्या भारत विरुद्ध न्यूझीलंड मालिकेचे वेळापत्रक जाहीर केले आहे. भारतात दोन्ही संघ तीन सामन्यांची वन-डे तर आणि ५ सामन्यांची टी-२० मालिका खेळणार आहेत. मार्च २०२५ चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर जानेवारी २०२६ मध्ये दोन्ही संघांमधील हा पहिलाच सामना असेल.

२०२४ टी-२० विश्वचषक स्पर्धेनंतर विराट कोहली आणि रोहित शर्मा यांन निवृत्ती स्वीकारली होती. आता हे दोघेही न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेत खेळणार आहेत. न्यूझीलंडचा भारत दौरा ११ जानेवारी रोजी खेळवल्या जाणाऱ्या पहिल्या एकदिवसीय सामन्याने सुरू होईल. मालिका ३१ जानेवारी रोजी खेळवल्या जाणाऱ्या शेवटच्या टी सामन्याने संपेल. आगामी टी विश्वचषक २०२६ च्या पार्श्वभूमीवर ही मालिका भारतासाठी खूप महत्त्वाची असेल. भारत आणि श्रीलंका फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये एकत्रितपणे टी विश्वचषक आयोजित करणार आहेत.भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील पहिल्या एकदिवसीय सामन्याचे यजमानपद वडोदराला मिळाले आहे. १५ वर्षांहून अधिक काळानंतर प्रथमच या मैदानावर पुरुषांचा क्रिकेट सामना खेळवला जाणार आहे. हा सामना नव्याने बांधलेल्या कोटाम्बी स्टेडियमवर होणार आहे. या मैदानावर डिसेंबर २०२४ मध्ये भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन महिला वनडे सामन्यांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच, २०२५ च्या महिला प्रीमियर लीग () चे ६ सामने येथे आयोजित करण्यात आले होते. वडोदरानंतर गुजरातमधील राजकोटला दुसऱ्या एकदिवसीय सामन्याचे यजमानपद मिळाले आहे. येथे १४ जानेवारी रोजी सामना खेळला जाईल. त्यानंतर वनडे मालिकेतील शेवटचा सामना इंदूरमध्ये १८ जानेवारीला होणार आहे. टी-२० मालिकेतील पहिले दोन सामने नागपूर आणि रायपूर येथे अनुक्रमे २१ जानेवारी आणि २३ जानेवारी २०२६ रोजी होतील. तिसरा, चौथा आणि पाचवा टी-२० सामना गुवाहाटी (२५ जानेवारी), विशाखापट्टणम (२८ जानेवारी) आणि तिरुवनंतपुरम (३१ जानेवारी) येथे खेळला जाणार आहे.

# ऑस्ट्रेलियाचा पुन्हा रडीचा डाव, फायनलमध्ये स्लेजिंग!

**नवी दिल्ली: दि. १५ प्रतिनिधी**

ऑस्ट्रेलियाचे क्रिकेटपटू म्हटले की, प्रतिस्पर्धी संघातील खेळाडूंना स्लेजिंग अर्थात टोमणे मारणे आलेच. खेळात विशेषतः क्रिकेटमध्ये स्लेजिंग ( प्रतिस्पर्धी खेळाडूंना मानसिकदृष्ट्या अस्थिर करण्यासाठी किंवा त्याचा एकाग्रता भंग करण्यासाठी मारलेले टोमणे किंवा उपहासात्मक टिप्पणी) केले जाते. प्रतिस्पर्धी संघ चांगली कामगिरी करत असेल तर याचा वापर होतो. ऑस्ट्रेलिया संघ यासाठी आघाडीवर असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघाचा कर्णधार टेन्बा बवुमा याने धक्कादायक खुलासा करताना म्हटलं आहे की, वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतिम फेरीदरम्यान ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी




त्यांचा आत्मविश्वास ढळावा यासाठी ''चोक'' हा शब्द वापरत स्लेजिंग केलं.लॉर्ड्स मैदानावर सामन्याच्या चौथ्या दिवशी जेव्हा दक्षिण आफ्रिका विजयाच्या जवळ पोहोचत होती, तेव्हा ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी चोक (दडपणाखाली अपयशी ठरणे) हा शब्द वापरला. टेंबा बावुमा आणि एडेन मार्कराम यांची भागीदारी तोडण्यासाठी ऑस्ट्रेलियन संघाने सर्व प्रकारचे प्रयत्न केले. याबाबत बीबीसीशी बोलताना बवुमा म्हणाला की, लॉर्ड्स मैदानावर झालेल्या डब्ल्यूटीसी फायनलमध्ये चौथ्या दिवशी दक्षिण आफ्रिका विजयाच्या उंबरठ्यावर असताना, ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी बवुमा व त्याच्या संघाला मानसिकदृष्ट्या अस्थिर करण्यासाठी ''चोक'' (ऐन मोक्याच्या क्षणी कचखाणे) हा वादग्रस्त शब्द वापरला होता.

आम्ही फलंदाजी करत असताना ऑस्ट्रेलियन खेळाडूंनी चोक हा शब्द उच्चारत असल्याचं ऐकायला मिळालं. मात्र आम्ही आत्मविश्वासाने मैदानात उतरलो, असेही त्याने स्पष्ट केले. अनेक जण आमच्या मार्गावर प्रश्न उपस्थित करत होते, पण आम्ही अंतिम फेरी गाठली.




# फिजिक्स स्पोर्ट्स चॅम्पियनशिपच्या सुवर्णपदकावर कोरले भारताने नाव

**नवी दिल्ली: दि. १५ प्रतिनिधी**

भारताचे खेळाडू सध्या क्रिकेट आणि सुरु असलेल्या शुटींगच्या वर्ल्डकपमध्ये व्यस्त आहेत. यादरम्यान फिजिक्स स्पोर्ट्स चॅम्पियनशिपमध्ये भारताच्या महिला खेळाडूने कमाल केली आहे. ११ ते १५ जून यादरम्यान साउथ आशियाई बॉडी बिल्डिंग आणि फिजिक्स स्पोर्ट्स चॅम्पियनशिप आयोजित करण्यात आली होती. यामध्ये भारताच्या लेकीने सुवर्णपदक नावावर केले आहे. या स्पर्धेमध्ये अरुणाचल प्रदेशची मुलगी हिलांग याजिकने चमकदार कामगिरी केली आहे.या ऐतिहासिक कामगिरीसह, हिलांग याजिक आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक जिंकणारी अरुणाचल प्रदेशची पहिली महिला शारीरिक क्रीडा खेळाडू बनली आहे. अरुणाचल बॉडी बिल्डिंग असोसिएशनचे अध्यक्ष नबाम टूना यांनी हिलांगच्या कामगिरीचे वर्णन केले यावेळी ते म्हणाले की, ''केवळ वैयक्तिक यश नाही तर आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करणारी प्रेरणादायी कामगिरी आहे'' असे ते म्हाणाले. पुढे त्यांनी सांगितले की, याझिकच्या यशामुळे येणाऱ्या काळात ईशान्येकडील तरुणांना बॉडी बिल्डिंग आणि फिजिक स्पोर्ट्सकडे आकर्षित केले जाईल. साउथ आशियाई बॉडी बिल्डिंग आणि फिजिक्स स्पोर्ट्स चॅम्पियनशिप ही स्पर्धा भूतान बॉडी बिल्डिंग असोसिएशनने आयोजित केली होती.

या स्पर्धेमध्ये ७ देश सहभागी झाले होते. यामध्ये भारत, नेपाळ, श्रीलंका, बांगलादेश, पाकिस्तान, मालदीव आणि अफगाणिस्तान यासारख्या अनेक दक्षिण आशियाई देशांतील खेळाडूंचा समावेश होता. ही स्पर्धा वर्ल्ड बॉडी बिल्डिंग अँड फिजिक स्पोर्ट्स फेडरेशन () आणि एशियन बॉडी बिल्डिंग अँड फिजिक स्पोर्ट्स फेडरेशन () यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.भारतीय बॉडी बिल्डिंगसाठी हा विजय फारच महत्वाचा आहे. याजिक ही अरुणाचल प्रदेशातीलच नव्हे तर संपूर्ण ईशान्य प्रदेशातील पहिली महिला खेळाडू आहे जिने या स्तरावर सुवर्णपदक जिंकले आहे. या विजयावरून असे दिसून येते की सीमावर्ती राज्ये देखील आता आंतरराष्ट्रीय स्तरावर जोरदार कामगिरी करत आहेत. याझिकने यापूर्वी फेडरेशन कप-२०२४ (गोवा) मध्ये रौप्य पदक जिंकले आहे.



## कायरन पोलार्डने मोडला विराट कोहलीचा महारेकॉर्ड

**नवी दिल्ली: दि. १५ प्रतिनिधी**

अमेरिकेत मेजर लीग क्रिकेट स्पर्धेला सुरूवात झाली आहे. या स्पर्धेत वेस्टइंडिजचा दिग्गज फलंदाज कायरन पोलार्ड एमआय न्यूयॉर्क संघाचं प्रतिनिधित्व करत आहे. या संघाचं प्रतिनिधित्व करताना टेक्सास सुपर किंग्ज संघाविरूद्ध खेळताना त्याने १६ चेंडूत ३२ धावांची खेळी केली. या खेळीच्या बळावर त्याने विराट कोहलीचा टी-२० क्रिकेटमधील मोठा रेकॉर्ड मोडून काढला आहे.एमआय न्यूयॉर्क संघाचा या स्पर्धेतील पहिला सामना टेक्सास सुपर किंग्ज संघाविरूद्ध पार पडला. या सामन्यात पोलार्डने १६ चेंडूंचा सामना करत ३२ धावांची खेळी केली. पोलार्डने टी-२० क्रिकेटमध्ये आतापर्यंत ६९६ सामन्यांमध्ये १३५६९ धावा केल्या आहेत. तर विराट कोहलीच्या नावे टी-२० क्रिकेटमधील ४१४ सामन्यांमध्ये १३५४३ धावा करण्याची नोंद आहे. यासह कायनर पोलार्ड हा टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत विराटला मागे सोडत चौथ्या स्थानी पोहोचला आहे.टी- क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत वेस्टइंडिजचा माजी फलंदाज ख्रिस गेल अव्वल स्थानी आहे. ख्रिस गेलच्या नावे टी-२० क्रिकेटमध्ये १४५६२ धावा करण्याची नोंद आहे.

# सरफराज खानने इंट्रा स्कॉड सामन्यात झळकाविले शतक




भारताचा संघ इंग्लंडविरुद्ध मालिका सुरू व्हायला फक्त ५ दिवस शिल्लक राहिले आहेत. त्याआधी भारताचा संघ इंग्लंडमध्ये कसून मेहनत करत आहे. भारतीय संघ हा या मालिकेनंतर आता शुभमन गिलच्या नेतृत्वात खेळताना दिसणार आहे. भारताच्या संघाने चॅम्पियन ट्रॉफी आधी झालेल्या दोन्ही कसोटी मालिकेमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. त्यानंतर आता भारताचा संघ रोहित शर्माच्या निवृत्तीनंतर पहिल्यांदाच मैदानात उतरणार आहे.भारताचा संघ सध्या इंट्रा स्कॉड सामने खेळत आहे. यामध्ये भारताचा कर्णधार शुभमन गिल आणि के एल राहुल यांनी चाहत्यांचे लक्ष्य वेधले होते. त्याचबरोबर शार्दुल ठाकूरने देखील विकेट्स मिळवल्या होत्या.

आता भारताचा असा खेळाडू ज्याला भारत विरुद्ध इंग्लंड या मालिकेमधून वगळण्यात आले होते पण तो भारतीय अ संघामध्ये त्याने पहिल्या सामन्यात कमालीची खेळी खेळली होती ती म्हणजेच भारतीय संघाचा फलंदाज सरफराज खान.आता त्याच्या संदर्भात मोठी अपडेट समोर आली आहे. सरफराज खान याने भारतीय इंट्रा सामन्यात आता शतक झळकावले आहे त्याने भारतीय संघामध्ये शतक झळकावून निवडकर्त्यांचे लक्ष्य वेधले आहे.

**सरफराज खान याने इंट्रा स्कॉड सामन्यात शतक ठोकले आहे. त्याला भारतीय संघामध्ये बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमध्ये खेळण्याची संधी मिळाली होती यावेळी त्याने शतक देखील झळकावले होते. त्यानंतर पण भारताच्या संघाला त्यामुळे मालिका गमवावी लागली होती. त्यामुळे भारतीय संघाचे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनल जाण्याची स्वप्न अपुरे राहिले.आता सरफराज खान याने भारतीय क्रिकेट चाहत्याचे त्याचबरोबर बीसीसीआयच्या निवडकर्त्यांचे देखील त्याने लक्ष्य वेधले आहे. सरफराज खान याला इंडियन प्रीमियर लीग २०२५ च्या मेगा ऑक्शनमध्ये देखील कोणत्याही संघाने विकत घेतले नाही. मागील काही महिन्यांपासून त्याला भारतीय क्रिकेटमध्ये त्याचबरोबर फ्रेन्चायझींनी वगळले होते. आता त्याला मागील सामन्यांमध्ये केलेल्या कामगिरीवर संघामध्ये संधी मिळेल का हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.भारतीय संघासाठी ही मालिका फारच महत्वाची असणार आहे. भारताच्या संघाला या मालिकेनंतर वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलचा सायकल सुरु होणार आहे. भारताचा संघ या मालिकेमध्ये कशी कामगिरी करेल हे पाहणे महत्वाचे ठरले.**

## सोन्याच्या भावात पुन्हा ऐतिहासिक वाढ ; ओलांडला १ लाखाचा टप्पा




मध्य पूर्वेतील प्रचंड तणावाच्या पार्श्वभूमीवर सोन्याच्या किमतीत मोठी वाढ झाली आहे. त्याची किंमत एका दिवसापूर्वी म्हणजे शुक्रवारी एक लाख रुपयांच्या पुढे जात आहे. राष्ट्रीय राजधानी दिल्लीत सोन्याचा भाव १,०१,५४० रुपये प्रति १० ग्रॅमवर व्यवहार करत होता, ज्यामध्ये सुमारे २२०० रुपयांची मोठी वाढ झाली. अशा परिस्थितीत, अनेक लोकांच्या मनात हा प्रश्न नक्कीच येत असेल की जेव्हा सोन्याने यावेळी १ लाख रुपये ओलांडले असतील, तर एक वर्षानंतर त्याची किंमत काय असेल.खरं तर, २२ एप्रिल रोजी पहिल्यांदाच सोन्याने १ लाख रुपयांचा ऐतिहासिक भाव ओलांडला. त्यानंतर, सोन्याचा भाव १ लाख रुपयांच्या वर जाण्याची ही दुसरी वेळ आहे. अशा परिस्थितीत, त्याच्या प्रचंड वाढत्या किमती आणि जागतिक अशांतता हे एक प्रमुख घटक मानले जात आहे. ट्रम्पच्या पहिल्या टॅरिफमुळे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत खळबळ उडाली. इथे, युक्रेन युद्ध, इस्रायल हमास युद्ध आणि आता इस्रायलचा इराणवरील हल्ला.खरंतर, सोन्याबाबत गुंतवणूकदारांच्या मनात एक महत्त्वाची गोष्ट असते ती म्हणजे ती सर्वात सुरक्षित गुंतवणूक आहे. म्हणूनच, जेव्हा जेव्हा बाजारात अशांतता असते तेव्हा गुंतवणूकदार सोन्याकडे वळतात. हेच कारण आहे की जेव्हा जेव्हा त्याची मागणी वेगाने वाढली आहे, तेव्हा त्याच वेगाने सोन्याची किंमत गगनाला भिडली आहे.आणखी एक घटक म्हणजे अमेरिकेने अलीकडेच जाहीर केलेले महागाईचे आकडे अपेक्षेपेक्षा कमी आहेत. अशा परिस्थितीत, फेडरल रिझर्व्ह व्याजदरात कपात करू शकते अशी अटकळ आहे.

# इस्रायल- इराणमध्ये संघर्ष वाढल्याने कच्चे तेल भडकले

**नवी दिल्ली: दि. १५ प्रतिनिधी**

इस्रायल-इराणमध्ये संघर्ष वाढला आहे. यामुळे मध्य पूर्वेतून तेल निर्यातीबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. परिणामी कच्च्या तेलाचे ( ) दर भडकले आहेत. शुक्रवारी ब्रेंट क्रूड फ्युचर्सचा दर ४.८७ डॉलरने म्हणजेच ७ टक्के वाढून प्रति बॅरल ७४.२३ डॉलरवर स्थिरावला. काल सुरुवातीला तो सुमारे १३ टक्के वाढून ७८.५० डॉलरवर गेला होता. यूएस वेस्ट टेक्सास इंटरमीडिएट क्रूडचा दर ४.९४ डॉलर अथवा ७.२६ टक्क्यांनी वाढून प्रति बॅरल ७२.९८ डॉलरवर बंद झाला.

इस्रायलने म्हटले आहे की त्यांनी इराणचे अण्वस्त्र तळ, बॅलिस्टिक क्षेपणास्त्र कारखाने आणि प्रमुख लष्करी कमांडरना लक्ष्य केले. त्यानंतर काही वेळातच, इराणने तेल अवीवमधील इमारतींवर क्षेपणास्त्र हल्ला केला. तसेच दक्षिण इस्रायलमध्येही स्फोट झाल्याचे वृत्त आहे. इराणच्या नॅशनल ऑईल रिफायनरी आणि डिस्ट्रिब्युशन कंपनीने म्हटले आहे की, तेल शुद्धीकरण आणि तेलसाठे ठिकाणे अबाधित आणि पूर्णपणे कार्यरत आहेत.तेल निर्यातदार देशाची संघटना अर्थात ओपेक () चा सदस्य असलेला इराण दररोज सुमारे ३३ लाख बॅरल तेलाचे उत्पादन घेतो. तर इराणमधून सुमारे २० लाख बॅरल कच्चे तेल आणि इंधन निर्यात केले जाते. ओपेक आणि रशियासह त्याच्या सहयोगी देशांची तेल उत्पादन क्षमता इराणच्या उत्पादनाएवढीच आहे. यामुळे जर इराणमधून तेल पुरवठ्यात अडथळा निर्माण झाल्यास ही तूट भरून निघू शकते.भारतात तेलाच्या गरजेच्या सुमारे ८० टक्के तेल आयात केले जाते. पण मध्य पूर्वेतील वाढत्या संघर्षामुळे होर्मुझ सामुद्रधुनीमार्गे तेल वाहतुकीत संभाव्य व्यत्यय येण्याची चिंता वाढली आहे. इराणला अरबी समुद्र आणि हिंदी महासागराशी जोडणारा हा एकमेव दुवा मानला जातो. ही भारतासाठी चिंतेची बाब मानली जात आहे. कारण यामुळे पेट्रोल- डिझेलचे दर वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक गॅस मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी म्हटले आहे की येत्या काही महिन्यांत पुरेल इतका देशात पेट्रोल, डिझेल, जेट इंधन आणि एलपीजी सारख्या पेट्रोलियम उत्पादनांचा पुरेसा साठा आहे.

## ओला, उबर, रॅपिडोचा प्रवास थांबणार

**नवी दिल्ली: दि. १५ प्रतिनिधी**

१६ जून २०२५ पासून कर्नाटकात ओला, उबर आणि रॅपिडो सारख्या ॲप-आधारित बाईक टॅक्सी चालणार नाहीत. कर्नाटक उच्च न्यायालयाने त्यांना राज्यात काम करणे बंद करण्याचे आदेश दिले आहेत. न्यायालयाने आदेशात म्हटले आहे की, जोपर्यंत राज्य सरकार मोटार वाहन कायदा, १९८८ अंतर्गत बाईक टॅक्सींसाठी स्पष्ट नियम आणि मार्गदर्शक तत्त्वे तयार करत नाही तोपर्यंत या सेवा चालवण्यास परवानगी दिली जाणार नाही. या निर्णयाचा परिणाम बेंगळुरू तसेच राज्यातील इतर शहरांमध्ये टॅक्सी वापरणाऱ्या लाखो प्रवाशांवर होईल. तसेच, हा निर्णय चालकांसाठीही मोठा धक्का आहे.कर्नाटक उच्च न्यायालयाने राज्यातील ओला, उबर आणि रॅपिडो सारख्या ॲप-आधारित बाईक टॅक्सी सेवा १६ जून २०२५ पर्यंत बंद करण्याचे आदेश दिले आहेत. ओला (एएनआय टेक्नॉलॉजीज), उबर इंडिया सिस्टम्स आणि रॅपिडो यांच्या याचिकांवर सुनावणी केल्यानंतर हा आदेश देण्यात आला. या कंपन्यांची मागणी आहे की त्यांच्या बाईक टॅक्सी सेवेला कायदेशीर मान्यता देण्यात यावी.यासोबतच, पिवळ्या नंबर प्लेट असलेल्या वाहनांना वाहतूक वाहने म्हणून नोंदणी करण्याची परवानगी देण्यात यावी. कर्नाटक उच्च न्यायालयाने कंपन्यांची अंतरिम दिलासा देण्याची याचिका फेटाळून लावली. योग्य नियमांशिवाय या सेवा बेकायदेशीर आहेत, असे न्यायालयाचे म्हणणे आहे.सुनावणीदरम्यान, न्यायमूर्ती बी.एम. श्याम प्रसाद यांच्या खंडपीठाने सांगितले की, जोपर्यंत राज्य सरकार मोटार वाहन कायद्याअंतर्गत स्पष्ट मार्गदर्शक तत्त्वे लागू करत नाही, तोपर्यंत राज्यात या सेवा चालवल्या जाणार नाहीत. न्यायालयाने सरकारला नियम बनवण्यासाठी ३ महिन्यांचा वेळ दिला आहे.एप्रिल २०२५ मध्ये, कर्नाटक उच्च न्यायालयाने बाइक सेवा देणाऱ्या या कंपन्यांना १५ जूनपर्यंत बाइक टॅक्सी सेवा सुरू ठेवण्याची अंतरिम परवानगी दिली होती. तथापि, न्यायालयाने आता ही सवलत वाढविण्यास नकार दिला आहे .

# गृहकर्ज घेणाऱ्यांना दिलासा; स्टेट बँक ऑफ इंडियाने कमी केले कर्ज व्याजदर

**मुंबई : दि. १५ प्रतिनिधी**

भारतीय रिझर्व्ह बँकेने रेपो रेटमध्ये ०.५०% (५० बेसिस पॉइंट) कपात केल्यानंतर स्टेट बँक ऑफ इंडियाने आपल्या कर्ज व्याजदरात ०.५०% पर्यंत घट केली आहे. १५ जून २०२५ पासून लागू होणाऱ्या नव्या दरांमुळे गृहकर्जासह इतर कर्जे स्वस्त होणार आहेत. यामुळे कर्जदारांच्या मासिक हप्त्यांवर दिलासा मिळेल.

ने आपला एक्सटर्नल बेंचमार्क रेट ८.६५% वरून ८.१५% केला आहे. सध्याचा रेपो रेट ५.५% असून, त्यावर २.६५% स्प्रेड जोडून निश्चित केला जातो. यावर आधारित गृहकर्ज, कर्ज यांचे व्याजदर ठरतात. नव्या दरांनुसार, चे गृहकर्ज व्याजदर ७.५०% ते ८.४५%




असतील, जे सिबिल स्कोअर, कर्जाची रक्कम आणि मुदतीवर अवलंबून आहेत. मॅक्सगेन ओव्हरड्राफ्ट कर्जासाठी ७.७५% ते ८.७०% आणि टॉप-अप कर्जासाठी ८.००% ते १०.५०% व्याजदर लागू आहेत. गृहकर्जाची प्रक्रिया फी कर्ज रकमेच्या ०.३५% आहे, जी किमान २,००० आणि कमाल १०,००० रुपये ( वेगळा) आहे.

मध्ये १४ जून २०२५ पर्यंत कोणताही बदल नाही. ओव्हरनाइट आणि १ महिन्यासाठी ८.२०%, ३ महिन्यांसाठी ८.५५%, ६ महिन्यांसाठी ८.९०%, १ वर्षासाठी ९.००%, २ वर्षांसाठी ९.०५% आणि ३ वर्षांसाठी ९.१०% आहे. सिबिल स्कोअर ३०० ते ९०० च्या दरम्यान असतो, जिथे ७०० पेक्षा जास्त स्कोअर चांगला आणि ८०० पेक्षा जास्त उत्कृष्ट मानला जातो. यामुळे कर्ज मिळवणे सोपे आणि स्वस्त होते.

ही व्याजदर कपात कर्जदारांना, विशेषतः गृहकर्ज घेणाऱ्यांना मोठा दिलासा देईल.


महाराष्ट्रातील
आदिवासी आश्रमशाळा
शाळा प्रवेशोत्सव 2025
दिनांक : १६ जून २०२५
स्थळ : शासकीय आश्रम शाळा,
मुंढेगाव, तालुका इगतपुरी, जिल्हा नाशिक
आदिवासी विकास विभाग वतीने संपूर्ण महाराष्ट्रातील
शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रवेशोत्सव
मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे.
प्रा.डॉ. अशोक उईके
मंत्री, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य
पालकमंत्री, चंद्रपूर जिल्हा
आमदार, राळेगाव विधानसभा क्षेत्र
Dr. Ashokuike
ashok_uike
drashokuike_mla




अजिंक्य भारत
# आपलं अकोला
अकोला, सोमवार, दि. १६ जून २०२५




# कौलखेड चौकात दगडाने ठेचून हत्या!

## स्थानिक गुन्हे शाखेने केला अवघ्या ४ तासांत खून प्रकरणाचा उलगडा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १५ :** खदान पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कौलखेड परिसरात घडलेल्या एका रक्तरंजित खून प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखेच्या झपाट्याने केलेल्या तपासामुळे केवळ ४ तासांत उलगडा झाला असून, आरोपीला अटक करण्यात आली आहे. विशेष म्हणजे या हत्याकांडामागे 'अवैध दारू' विक्रीमुळे निर्माण झालेले तणाव व वाद कारणीभूत ठरल्याचे बोलले जात आहे. शहरात हत्याकांडाची शृंखला सुरूच आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये दहशत पसरली आहे.

फिर्यादी उमेश दिनकर मस्के (४०) रा. कौलखेड चौक यांनी पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, १५ जून रोजी सकाळी ६ वाजता ते आपले यश धाबा उघडण्यासाठी गेले असता, गेटसमोर एक इसम मृतावस्थेत आढळला. या इसमाची ओळख गंगाधर डाबेराव (३५)

रा. यवतमाळ, ह.मु. कौलखेड चौक



अशी पटली. डोक्यावर दगड व काठीने जबर मारहाण झाल्याचे दिसून आले. या प्रकरणी खदान पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करून पोलिसांनी तपास सुरू केला होता.

पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शंकर शेळके यांनी विशेष तपास पथक तयार करून वेगाने काम सुरू केले. सीसीटीव्ही फुटेज आणि गुप्त माहितीच्या आधारे संशयित रोहीत राजू सोळंके (१८) रा. नागे लेआऊट, कौलखेड यास ताब्यात घेण्यात आले.

चौकशीत त्याने कबूल केले की, मृतक गंगाधर डाबेराव याने त्याच्याकडे दारू पिण्यासाठी पैसे मागितले. रोहीतने नकार दिल्यानंतर दोघांमध्ये वाद झाला. रागाच्या भरात रोहीतने गंगाधरवर काठी व दगडाने हल्ला करून त्याचा खून केला. धडक कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो. नि. शंकर शेळके, सहा. पो.नि. विजय चव्हाण, पोउपनि. माजीद पठान, व पोलीस कर्मचारी फिरोज खान, सुलतान पठाण, किशोर सोनाने, खुशाल नेमाडे, उमेश पराये, एजाज अहमद, अभिषेक पाठक, आकाश मानकर, धीरज वानखडे, आमीर, सतीष पवार, राज चंदेल, श्रीकांत पातोंड, अशोक सोनवणे आणि श्वान पथकातील एएसआय आनंद गायकवाड, पो.का. किरण अहीर आणि श्वान 'जोया' यांच्या मदतीने पार पडली.

### 'अवैध दारू' हत्येचे मूळ कारण?

स्थानिक पातळीवरुन मिळालेल्या माहितीनुसार, खून झालेला गंगाधर डाबेराव व आरोपी रोहीत सोळंके हे दोघेही कौलखेड परिसरात बिनधास्त विकली जाणारी अवैध दारू नियमितपणे सेवन करत असल्याचे समोर आले आहे. अशा दारू विक्रीमुळे परिसरात अनेक तणावपूर्ण प्रसंग निर्माण होत असून, हे हत्याकांड त्याचाच भीषण परिणाम असल्याचे नागरिकांत चर्चा सुरू आहे. खदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत अनेक ठिकाणी आजही बिनधास्तपणे ही अवैध दारू विक्री सुरू आहे.

### नागरिकांमध्ये भीती, प्रशासनाकडे कारवाईची मागणी

या घटनेनंतर कौलखेड परिसरात नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण झालं असून, अवैध दारू विक्रीवर बंदी आणि कठोर कारवाईची जोरदार मागणी केली जात आहे. पोलिसांनी या घटनेचा धडा घेत, अशा बेकायदेशीर धंद्यांवर निर्णायक पावलं उचलावीत, अशी जनतेची अपेक्षा आहे.

# मनपा बांधकाम विभागाचा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

## एनओसी दिली कशी जाते; जबाबदार कोण?

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १५ :** अकोला महानगरपालिकेच्या बांधकाम विभागातील नियोजनशून्यता आणि बेफिकिरीमुळे शहरात विकासकामांमध्ये गंभीर अनियमितता समोर येत आहे. 'नाहरकत प्रमाणपत्र' (एनओसी) वाटप प्रक्रियेत प्रशासनाकडून गंभीर गलथानपणा केला जात असून यामुळे आधीच केलेल्या कामांचे नुकसान होते आणि सार्वजनिक निधीचा अपव्यय होतो.

अनेकदा नुकतेच झालेल्या जलवाहिनी, केबलिंग किंवा सिमेंट रस्त्यांच्या कामांवर परत एनओसी दिले जाते. काही वेळा तर दोष देय कालावधी संपण्यापूर्वीच पुन्हा त्याच भागात खणकाम केल्याचे उघड झाले आहे. हे सर्व प्रकार स्थानिक प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे होत असून त्याचा थेट फटका शहरातील नागरिकांना बसतो आहे. मनपाच्या झोननिहाय कामकाजामुळे प्रत्येक भागात कनिष्ठ अभियंते जबाबदारी सांभाळतात. मात्र या अभियंत्यांमध्ये समन्वयाचा अभाव असून, 'एनओसी' कुणी दिली याचा थांगपत्ता लागत नाही. अनेकदा 'एनओसी' ही फाईलमध्ये न राहता अभियंत्यांकडे वैयक्तिकरित्या ठेवली जाते. त्यामुळे संबंधितांना वेळेवर माहिती मिळत नाही आणि काम रखडते.

अमृत योजनेंतर्गत शहरात जलवाहिनी टाकण्याचे मोठे काम सुरू असून यामध्ये कोणतेही नियोजन न करता रस्त्यांची आणि सर्विस लाईनची मोठ्या प्रमाणावर तोडफोड करण्यात आली आहे. कुठे आणि कधी कोणते काम झाले याची नोंद नसल्यामुळे दुरुस्तीही केली जात नाही. यामुळे पूर्वीचे चांगले काम वाया जाते. अशोक वाटिका चौकात नुकतेच सिमेंट रस्त्याचे उकरून काम केले गेले. अशा अनेक ठिकाणी कंत्राटदार मनमानीपणे काम करत असून अभियंते साईटवर देखील फिरकत नाहीत. ओपन स्पेसवरही नियम धाब्यावर ठेवून कामे केली जात आहेत. मात्र मनपा प्रशासन यावर कारवाई करण्याऐवजी शांत आहे.

## मेघ दाटून आले...



जिल्ह्यातच नव्हे तर शहरात काही दिवसापूर्वी अवकाळी पावसाने धूम ठोकली होती.पण आता मृग नक्षत्र लागून सुध्दा शहरातच नव्हे तर जिल्ह्यात सुद्धा पावसाने जशी पाहिजे तशी बॅटिंग केली नाही या पावसाकडे शेतकऱ्यांचे नव्हे तर सामान्य माणसांचे डोळे आभाळाकडे लागले असून ढग येतात पण पाऊस पडत नाही अशी स्थिती निर्माण झाली आहे. (छाया. संजय ताथुरकर)

# महाराष्ट्र शासन गोसेवा आयोगाचे सदस्य उद्धव नेरकरांचा सत्कार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १५ :** महाराष्ट्र शासन गोसेवा आयोगाचे देशी गोवंश संवर्धन, संरक्षण कार्य यासाठी आयोगाचे सदस्य उद्धव नेरकर हे अकोला जिल्ह्यातील उगवा येथील गोरक्षण संस्थेला भेट देण्यासाठी आले असता तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष तथा प्रसिद्ध उद्योजक डॉ. सुगत वाघमारे यांना माहिती मिळताच त्यांनी सन्मानपूर्वक कार्यालयात त्यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी संस्थेचे सचिव विष्णुदास मोंडोकर, ॲड. संजय सेंगर, श्रीकांत पिंजरकर, ॲड. दिनेश कवडे, अश्विन शिरसाट, प्रदीप अवचार, सचिन पाटील, विशाल शिंदे, गजानन तायडे, बॉबी पळसपगार,उमेश शिरसाट,श्वेता शिरसाट, सुचिता घोगरे, सपना म्हात्रे, करण पळसपगार, रश्मी घुगे, भीमराज शिरसाट, यशवंत साळवे आदींची उपस्थिती होती.

# निवडणुकीआधी 'सहानुभूती नाट्य' झोपलेले नेते झाले जागे!



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १५ :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची चाहूल लागताच शहरात राजकीय भूकंपाचे वारे वाहू लागले आहेत. गेल्या तीन वर्षांत जे आजी-माजी लोकप्रतिनिधी गायब होते, जनतेच्या दु:खदैन्यापुढे झोपेचे सोंग घेत होते, तेच आता अचानक 'जागे' झाले आहेत. आपल्या चांगल्या वागणुकीच्या दाव्याने पुन्हा एकदा जनतेचे लक्ष वेधण्यासाठी धडपडताना दिसत आहेत.

शहरात गेल्या काही वर्षांत कचरा व्यवस्थापन, आरोग्य सुविधा, रस्त्यांची दुर्दशा, पाणी टंचाई यासारख्या मूलभूत प्रश्नांनी उग्र रूप धारण केले होते. नागरिकांनी अनेक वेळा महापालिका आयुक्तांपर्यंत निवेदनं सादर केली, ऑनलाईन तक्रारी केल्या. त्यावर काही निवडक बाबतीत वरवरची कारवाई झाली, पण मोठा वर्ग दुर्लक्षितच राहिला. याच काळात जे लोकप्रतिनिधी निवडून गेले होते, ते कुठे होते? आज त्यांच्यातलेच काही 'सक्रिय' झाले असून, पुन्हा लोकांसमोर समस्या घेऊन, तक्रारी करत महापालिकेची उंबरठी झिजवनार आहेत. हे पाहता नागरिकांचं म्हणणं आहे की संकटाच्या काळात गारद झालेल्या नेत्यांनां आता आठवण कशी काय झाली? मात्र अपवादही आहेत. काही लोकप्रतिनिधींनी निष्ठेने जनतेची कामं केली, मदत केली, कोविड काळात पुढाकार घेतला. पण बऱ्याचशा नेत्यांचा 'गंभीर निद्रा योग' आता संपल्याचं चित्र आहे. नागरिक म्हणतात, ''हे 'सहनुभूती नाट्य' सुरू झालय निवडणुकीपुरताच!''आता वेळ आहे जागरूकतेची. नागरिकांनी यावेळी मतदान करताना केवळ 'हलक्या गोड बोलां'वर न जाता, गेल्या पाच वर्षांतील कृती तपासावी लागेल. सोशल मीडियाच्या माध्यमातून तरुणाई सजग झाली आहे. त्यामुळे निवडणुकीत कोणते चेहरे पुन्हा निवडायचे आणि कोणांना कायमची विश्रांती द्यायची, हे आता जनताच ठरवेल.

# मंदिरावरील तोडफोडप्रकरणी एक अटकेत

## खडकी येथील ब्रम्हा फिटनेसजवळील घटना

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १५ :** खडकी बु गावठाण परिसरातील ब्रम्हा फिटनेस जवळील जुन्या आसरा मेस्कामाय मंदिरातील देवीच्या सात मूर्तींची जेसीबीने तोडफोड करून मंदिराची विटंबना केल्याच्या गंभीर प्रकारात खदान पोलिसांनी एका आरोपीस अटक केली आहे. त्याला न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे या प्रकरणी खदान पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा क्र. ४६८/२०२५ कलम २९८, ३(५) भारतीय दंड संहिता अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून, तपास पोलीस उपनिरीक्षक केशव देवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

फिर्यादी रोहित पंजाबराव काळे (३४), रा. काळे विद्यालय जवळ, खडकी अकोला यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक ११ जून रोजी सकाळी मॉर्निंग वॉकदरम्यान मित्र पांडुरंग मांगेकडून घटनेची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी रात्री १०.४६ वाजता पोलिसांत तक्रार दाखल केली. त्यानुसार, जुनेद जिब्राईल दिवान (३४) रा. मुकुंद मंदिर, दिवान हाऊस, रामदासपेठ याने कथितपणे अन्य आरोपींसह संगनमत करून जेसीबीच्या सहाय्याने मंदिरातील मूर्ती तोडल्या आणि धार्मिक भावना दुखावल्या. खास बाब म्हणजे सदर गुन्ह्यात चोरीस गेलेला किंवा हस्तगत झालेला कोणताही माल अद्याप नोंदलेला नाही. मात्र, आरोपीने गुन्हा करताना वापरलेली जेसीबी मशीन आणि सातही मूर्ती कुठे ठेवल्या आहेत याबाबत अधिक माहिती मिळवण्यासाठी पोलीस कोठडी आवश्यक असल्याचे तपास अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. दिनांक १४ जून रोजी आरोपीस अटक करून न्यायालयात हजर करण्यात आले असून, पुढील तपासासाठी दिनांक १६ जूनपर्यंत पोलीस कोठडी मिळविण्याची न्यायालयाकडे विनंती करण्यात आली आहे. ही घटना जातीय तणाव निर्माण करणारी असल्याने खडकी परिसरात काही प्रमाणात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून, पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

# महाकाली मंदिराजवळ अनोळखी इसम मृत अवस्थेत आढळला

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**अकोला, दि. १५ :** मोठी उमरी येथील महाकाली मंदिर परिसरात रविवारी दुपारी एक अनोळखी इसम बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. नागरिकांनी दिलेल्या माहितीनुसार, तो मंदिराजवळ गंभीर अवस्थेत पडलेला होता. तत्काळ त्याला सरकारी रुग्णालय, अकोला येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. सदर मृत इसमाची ओळख अद्याप पटलेली नसून, पोस्ट सिव्हिल लाईन पोलीस ठाण्याकडून नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, जर कुणाला या इसमाबाबत माहिती असेल तर त्यांनी तत्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. ही घटना परिसरात चिंतेचा विषय ठरत असून, पोलिसांकडून मृत व्यक्तीच्या ओळखीचा तपास सुरू आहे.

# आधी रस्ता, मग गटार... मग पुन्हा रस्ता!

## मनपाच्या नियोजनशून्य कारभारामुळे जनतेच्या पैशाची उधळपट्टी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. १५ :** डाबकी रेल्वे गेट परिसरातील पुंडलिक नगर, मते नगर, जाजू नगर, परमहंस नगर या भागांत महापालिकेने भूमिगत गटार योजना राबवली खरी, पण त्याआधी चांगल्या अवस्थेतील सिमेंटचे पक्के रस्ते उघडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. महापालिकेच्या नियोजनशून्यतेचा फटका थेट सामान्य जनतेच्या खिशाला बसतोय, याचे हे ठळक उदाहरण ठरत आहे.

या योजनेंतर्गत रस्त्याच्या मधोमध मोठे चेंबर खोदून टाकण्यात आले.



काही ठिकाणी ही चेंबर उघडीच ठेवण्यात आली होती. चार ते पाच दिवस ही चेंबर विनाझाकण पडलेली होती. त्यामुळे अपघातांची शक्यता निर्माण झाली होती. अनेक नागरिकांनी महापालिकेकडे तक्रारी केल्यानंतर झाकणे टाकण्यात आली, ही बाब नागरिकांच्या सजगतेचा विजय म्हणावी लागेल. मात्र मूळ मुद्दा असा आहे की, जर ही गटार योजना रस्ते बनवण्याआधीच राबवली असती, तर चांगले रस्ते उघडण्याची गरज भासली नसती.

अशा प्रकारे महापालिकेने आधी लाखो रुपयांचे रस्ते बनवले, आणि आता पुन्हा तेच रस्ते फोडून गटार योजना राबवली जात आहे. यामध्ये पुन्हा नव्याने डांबरीकरण किंवा सिमेंटकरण होणार, म्हणजेच पुन्हा नव्याने लाखो रुपयांचा खर्च तोही सर्वसामान्यांच्या कररुपी पैशातून! हे चित्र केवळ डाबकी रेल्वे गेटपुरते मर्यादित नाही. शहरातील अनेक भागांत अशाच नियोजनशून्य पद्धतीने कामे केली जात आहेत. आधी रस्ते, मग गटार, मग परत रस्ते, अशा दुहेरी कामामुळे सार्वजनिक निधीचा प्रचंड अपव्यय होत आहे.

अकोला महापालिकेने कामांचे पूर्वनियोजन करून एकाचवेळी गटार व रस्ते यांची कामे पार पाडावी, अशी नागरिकांची अपेक्षा आहे. अन्यथा महापालिकेवर 'जनतेच्या पैशाची लूट' हेच आरोप वारंवार होत राहतील.शेवटी प्रश्न उरतो महापालिकेचा आराखडा जनहितासाठी आहे की ठेकेदारांच्या फायद्यासाठी?

## थोडक्यात

### अण्णाभाऊ साठे पुरस्काराने सुतार सन्मानित



**वाशिम** : जिल्हा पोलिस बॉईज असोसिएनच्या वतीने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्काराने शिक्षक आनंद सुतार व अरुणा ताई ताजणे यांचा १५ जुन रोजी वाशिम येथे सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र पोलिस बॉईस संघटना जिल्हा अध्यक्ष कपील साठे, प्रमुख अतिथी ॲड. स्वाती देशमुख, चंद्रभान पौळकर, प्राचार्य आश्र्जी जाधव, शकुंतला वंजारे, प्रशांत दाभाडे, शोभा खोडके, अर्जुन राऊत, दशरथ दाभाडे, डॉ.रामकृष्ण डोंगरे, रमेश दाभाडे, माधव दाभाडे, ॲड पारवे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी चंचल वानखेडे, मनीषा वानखेडे, विजय डोंगरे, खाडे, सीमा दाभाडे, विजय डोंगरे, भगवान वैरागड, श्रावण उबाळे, रमेश बांगर, विशाल डोंगरे, नंदू कांबळे, पुष्कर साठे, खुशी साठे, मनोज कव्हर यांनी परिश्रम घेतले.

### विमान दुर्घटनेतील मृतांना भाजपाकडून श्रद्धांजली



**वाशिम** : अहमदाबाद येथे १२ जून रोजी मन सुन्न करणारी भीषण विमान दुर्घटना घडली. यामध्ये २७० हून अधिक नागरिकांचा बळी गेला. दुर्घटनेमध्ये गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजयभाई रुपाणी यांच्यासह मृत नागरिकांच्या आत्म्यांना शांती मिळण्यासाठी आणि त्यांच्या परिवाराला दुःखातून सावरण्यासाठी वाशिम भाजपच्या वतीने १५ जून रोजी शोक सभा विठ्ठलवाडी येथील जनसंपर्क कार्यालयात पार पडली. यावेळी आमदार श्यामभाऊ खोडे यांचेसह भारतीय जनता पार्टी वाशिम शहरातील पदाधिकारी, महिला, पुरुष कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी सर्वांनी सामूहिकरित्या दोन मिनिटांचे मौन पाळून दिवंगत आत्म्यांना श्रद्धांजली वाहिली. श्रद्धांजली कार्यक्रमात सर्व राजकीय पक्षांचेही पदाधिकारी, कार्यकर्ते व नेतेमंडळी यांची उपस्थिती होती. या सर्वांनी राजकीय सीमा ओलांडून केवळ मानवीयतेच्या भावनेतून सहभाग नोंदवला.

### ‘त्या’ प्रकरणी खुनाचा गुन्हा दाखल

**मगरूळपीर** : तालुक्यातील मसोला येथील ४५ वर्षीय मुरलीधर दोडके यांचा गळफास घेतलेला मृतदेह गुरुवारी सकाळी शेतशिवारात आढळला. सुरुवातीला आत्महत्या म्हणून गणल्या गेलेल्या या प्रकरणात मृतदेहावर गंभीर जखमांचे निशाण दिसून आल्याने शुक्रवारी अज्ञात व्यक्तीवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत मुरलीधर दोडके हे बुधवारी सायंकाळी घरातून बाहेर पडले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी सातच्या सुमारास गावाच्या शेतशिवारात लिंबाच्या झाडाला गळफास घेतलेल्या अवस्थेत त्यांचा मृतदेह आढळला.

## निधन वार्ता

### इंदुमती जाधव

**वाशिम** : संत निरंकारी मिशनचे ज्ञान प्रचारक प.पु. नामदेवराव जाधव महाराज यांच्या धर्म पत्नी सौ. इंदुमती जाधव यांचे वयाच्या ७६ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. इंदुमती जाधव हया अत्यंत सेवाभावी आणि धार्मिक वृत्तीच्या होत्या. निरंकारी मिशनच्या पुरातन घडामोडीमध्ये सेवेच्या माध्यमातून त्यांचे नाव सगळीकडे घेतले जात आहे. त्यांच्या निधनामुळे निरंकारी मिशनसह जाधव परिवाराचे निश्चितच कधीही भरुन न निघणारे असे नुकसान झाले. त्यांचा अंत्यविधी स्थानिक पद्मतिर्थ मोक्षधामध्ये निरंकारी संस्कृतीनुसार पार पडला. यावेळी हजारोंच्या संख्येत जनसमुदाय उपस्थित होता. त्यांच्या मागे ज्ञानेश्वर, गोविंद, वर्षा असे तीन अपत्य असून सुना जावई, नातू नाती असा बराच मोठा आप्त परिवार आहे.



# उभ्या टँकरला ट्रकची धडक; दोन ठार

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**मेडशी, दि. १५ :** अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गावरील मेडशी बायपासवर, सरपंच हॉटेलजवळ उभ्या असलेल्या टँकरवर ट्रक जाऊन आदळला . या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून एक जण जखमी झाला आहे. विशेष म्हणजे, कारमधील दोन प्रवासी थोडक्यात बचावले. ही घटना १४ जूनच्या रात्री उशिरा घडली.

प्राप्त माहितीनुसार, मालेगावकडून पातूरच्या दिशेने जाणाऱ्या ट्रक चालकाने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या (एमएच ३० बिपी ८२२९) टँकरला जोरदार धडक दिली. या धडकेत टँकरचा चालक शेख शोएब शेख मुजीब (वय २५, रा. गंगानगर, अकोला) आणि त्यांना भेटण्यासाठी आलेले दुसऱ्या टँकरचे चालक शेख जावेद शेख सलीम (वय ४५, रा. अर्धापूर, जि. नांदेड) यांचा जागीच मृत्यू झाला.

या अपघातात टँकरमधील क्लीनर हाफीजसोद्दीन मुजिबोद्दीन (वय ३५, रा. गंगानगर, अकोला) हे जखमी झाले. अपघात इतका भीषण होता की, ट्रकच्या जोरदार धडकेमुळे टँकर पलटी झाला आणि रस्त्यालगत उभ्या असलेल्या एमएच ३७ ए एच १५३१ क्रमांकाच्या कारवर जाऊन आदळला. त्या कारमध्ये मंजीत मुंडे आपल्या मित्रासोबत बसलेले होते. सुदैवाने, दोघेही बालंबाल बचावले. मात्र, कारचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

मेडशी बायपासवर अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. या ठिकाणी वळण आणि उतार असल्यामुळे समोरून येणारी वाहने लवकर दिसत नाहीत . त्यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. याबाबत ग्रामस्थांनी आणि सरपंच शेख जमीर यांनी प्रशासनाकडे गतिरोधक बसवण्याची वारंवार मागणी केली आहे. मात्र, अद्यापही याबाबत ठोस निर्णय झाला नाही . निदान या अपघातानंतर तरी प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

### भावाच्या मृत्यूची वार्ता कळताच बहिणीनेही सोडला प्राण !



**कारंजा (लाड)** : मोठा भाऊ सुनिल नारायणराव काळे (रा. सावरगाव काळे) यांच्या निधनाची वार्ता कळताच छायाताईंना दुःख पेलू शकले नाही. भावाच्या निधनानंतर १५ मिनीटातच काळाने त्यांच्यावर झेप घेतली. आणि एका तेजस्वी जीवनाचा अंत झाला. स्वतः च्या जिवनात असंख्य संघर्ष सोसूनही, शून्यातून विश्व उभारून छायाताई गावंडे यांनी हजारो वयोवृद्ध, दिव्यांग, निराधार व गरजूंच्या आयुष्यात प्रकाशाचे कवाड उघडले. त्यांच्या सेवेचा स्पर्श झालेली माणसं त्यांच्या अकाली मृत्युमुळे शोकग्रस्त झाले आहेत. त्यांच्या पश्चात पती गजानन गावंडे, कन्या कोमल व समृद्धी आणि मुलगा कपिल असा परिवार आहे. परंतु, खरं तर त्यांचा परिवार संपूर्ण समाजच होता. ज्यांच्यासाठी त्या आईसारख्या होत्या. छायाताई गावंडे या प्रशिक ग्रामीण सहकारी पतसंस्था, कारंजा यांच्या विद्यमान संचालिका, तसेच गुरुदेव सेवा मंडळ, श्रीक्षेत्र गुरुकुंज मोझरी च्या कारंजा सेवाश्रमाच्या प्रचारिका होत्या. त्या विदर्भ लोककलावंत संघटना, करंजमहात्म्य परिवार, व अनेक महिला बचतगटांचे आधारस्तंभ होत्या.

## भूजल पुनर्भरण स्पर्धा: २४ गावे पात्र

### ग्रामपातळीवर उत्स्फूर्त सहभाग: पात्रतेनुसार परीक्षण



दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. १५ :** भूजल संवर्धनासाठी जिल्हा प्रशासनाने वत्सगुल्म भूजल पुनर्भरण २०२५ ही स्पर्धा जाहीर केली होती. त्याअंतर्गत स्पर्धेच्या परिक्षणासाठी वाशिम जिल्ह्यातील सहा तालुक्यातील २४ गावे पात्र ठरली होती. या गावांचे पात्रतेनुसार परीक्षण दि. १४ जून २०२५ रोजी शनिवारच्या दिवशी प्रत्यक्ष ग्रामपातळीवर पार पडले.

वत्सगुल्म भूजल पुनर्भरण स्पर्धा २०२५ हा एक दूरदृष्टीपूर्ण आणि प्रेरणादायी उपक्रमाच्या माध्यमातून ग्रामपातळीवर लोकसहभाग वाढवून जलसंधारण, पाणलोट क्षेत्र विकास, आणि भूजल पुनर्भरण यासारख्या महत्त्वाच्या बाबींमध्ये प्रभावी बदल घडवून आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. या परीक्षणासाठी प्रकल्प संचालक आत्मा, अकोला येथील डॉ. मुरली इंगळे यांच्या नेतृत्वाखाली ५५ तज्ज्ञांचे ११ पथक तयार करण्यात आले होते. या पथकांनी गावांना भेटी देऊन जलतारा कामांची पाहणी करण्यात आली. परीक्षण कार्यामध्ये तिफन फाउंडेशनने परिक्षणाची संपूर्ण जबाबदारी पार पाडली. पथकाचे स्वागत उपविभागीय अधिकारी कैलास देवरे आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक अध्यक्ष डॉ. हरिष बाहेती,सुभाष नानोटे (जलमित्र) यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या वेळी उपविभागीय कृषी अधिकारी, सर्व तालुका कृषी अधिकारी तसेच सर्व गावांचे सरपंच, उपसरपंच, वॉटर हिरो, गावकरी, संबंधित यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ही पाहणी प्रक्रिया ग्रामस्थांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे अधिक प्रभावी ठरली असून, वाशिम जिल्हा जलसंधारणाच्या दिशेने सकारात्मक पावले उचलत आहे.

यावेळी परिक्षणाचे पथक प्रमुख विजय सरोदे मेहकर,श्रीनिवास शिंदे वसमत,के एम जाधव नांदेड, विठ्ठल धांडे मेहकर, विनोद सुसर, बुलडाणा, धनंजय वार्डेकर नाशिक, आनंद बथकल आर्णी, रवींद्र जटाळे नेर, विलास वाशीमकर अकोला, अनंत देशमुख अकोट, मिलिंद वानखेडे अमरावती यांनी कामकाज पाहिले. तर संपर्क अधिकारी म्हणून आर के राठोड, गंगाधर इंगोले,महादेव सोळंके,जगन शिंदे, प्रकाश कायंदे, रमेश जाधव, रवींद्र सवणे, रवींद्र मापारी, कैलास महाले, पंजाब जाधव, गुणवंत ढोकणे यांनी जबाबदारी सांभाळली.

## चुकीच्या पद्धतीने नाला बांधकाम; शेतात साचले पाणी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**रिसोड, दि. १५ :** चुकीच्या पद्धतीने बनवण्यात आलेला नाला व कमी खोलीकरण असल्यामुळे शेतकऱ्याच्या शेतात पाणी साचत आहे. परिणामी शेती पिकाचे नुकसान सातत्याने होत आहे. अनेक वेळा निवेदन देऊन मागणी करून सुद्धा सदर विषयाकडे गांभीर्याने लक्ष दिले जात नसल्याने शेतकऱ्याने सहपरिवार आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

रिसोड भाग दोन मध्ये रिसोड करडा मार्गावर दौलतराव भगवानराव वाळके, गोपाल पांडुरंग विखे,गणेश रामचंद्र चोपडे या शेतकऱ्यांनी १३ जून रोजी तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांना निवेदन सादर करून याकडे लक्ष देण्याची मागणी केली आहे. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की सदर शेतकरी हे शेती वर उदरनिर्वाह करून आपला परिवार चालवत आहे. दरवर्षी पावसाळ्यात पाऊस आल्यावर नाल्यावर पूर आल्यानंतर सदर पाणी हे शेतकऱ्यांच्या शेतात घुसून नुकसान करत आहेत. सदर नुकसान आम्ही शेतकऱ्यांनी किती वेळा सहन करावा व केव्हापर्यंत सहन करावा असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. सदर नाल्याचे खोलीकरण न केल्यास पत्नी व मुलाबाळासह संपूर्ण परिवार तहसील कार्यालयात आत्मदहन करेल असा इशारा दौलतराव भगवानराव वाळके निवेदनात दिला आहे. निवेदनावर दौलतराव वाळके, शेख शहनाज शेख निजामुद्दीन, गोपाल विखे, राजू इरतकर,राजू ढगे, शोभा ईरतकर,शेख सलीम,शेख जावेद,गोविंद गांजरे,विलास इरतकर, गणेश चोपडे,यांच्या सह्या आहेत.

### भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आज संवाद बैठक

**वाशिम** : भारतीय जनता पक्षाच्या वतीने आज १६ जून रोजी दुपारी ३ वाजता वाशिम येथील महेश भवन सभागृहात कार्यकर्ता संवाद बैठक तसेच प्रोफेशनल मीटिंगचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाला खासदार अनुप धोत्रे हे ‘‘मोदी सरकारच्या ११ वर्षांच्या यशस्वी कार्यकाळा’’ वर मार्गदर्शन होणार आहे. कार्यक्रमाचे आयोजन भारतीय जनता पार्टी वाशिम जिल्हा व शहर मंडळाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. या संवाद बैठकीस भाजपा जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे, वाशिम मंगरूळनाथ आमदार श्याम खोडे, कारंजा मानोरा आमदार साईताई डहाके, विधान परिषद आमदार बाबूसिंग महाराज, माजी मंत्री अनंतराव देशमुख, माजी कार्याध्यक्ष राजू राजे पाटील, माजी आमदार विजयराव जाधव, माजी पुरुषोत्तम राजगुरू यांच्यासह जिल्ह्यातील अनेक मान्यवर नेते, मंडळाध्यक्ष, आणि पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

## अनुसूचित जाती, जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी मेळाव्याचे आयोजन

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मानोरा, दि. १५ :** राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रति थेंब अधिक सूक्ष्म सिंचन योजना अंतर्गत वाशिम जिल्ह्यात ६५ लक्ष रुपये पेक्षा अधिक रक्कम प्राप्त झाली आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थींची अर्ज घेण्याकरिता जिल्हा व तालुका स्तरावरून १६ जून ते ३० जून या पंधरवड्यात विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

सहाय्यक कृषी अधिकारी यांचे मार्फत प्रत्येक गावात अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांसाठी विशेष मेळावा आयोजित करून योजनेची माहिती देण्यात येणार आहे.उपरोक्त प्रवर्गातील शेतकरी बांधवांसाठी तालुकास्तरावर मोहीम स्वरूपात कॅम्प घेऊन शेतकऱ्यांना महाडीबीटी पोर्टलवरून अर्ज करण्याकरिता आवाहन करण्यात येते की, सूक्ष्म सिंचन घटकाचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टल वर https :// mahadbt.maharashtra. gov.in या संकेतस्थळावर राष्ट्रीय कृषी विकास योजना प्रतिथेंब अधिक पीक अंतर्गत सूक्ष्म सिंचन योजना (ठिबक/ तुषार सिंचन संच) या घटकासाठी अर्ज करावे व योजनेच्या अधिक माहितीसाठी आणि सुधारित मापदंडाच्या माहितीसाठी तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन उमेश राठोड तालुका कृषी अधिकारी मानोरा यांनी केले आहे.

## प्रकाशच्या स्वप्नाची ‘तृप्ती‘: स्टेट बँकेत मिळाली नोकरी

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**कारंजा, दि. १५ :** कुठलीही शिकवणी न लावता स्पर्धा परीक्षेत यश मिळवणे थोडे कठीणच. परंतु कारंजा येथील तृप्ती प्रकाश राजगुडे या मुलीने परिस्थितीवर मात करत शिकवणी वर्गाशिवाय स्व- बळावर पहिल्याच प्रयत्नात भारतीय स्टेट बँकेची लिपीक पदाची परीक्षा उत्तीर्ण केली. तिने मिळविलेल्या यशाचे सर्व शहरात कौतुक होत आहे.

तृप्ती ही येथील छत्रपती शिवाजी महाराज नगरमध्ये राहते. वडिलांचे आपल्या घरच्याच एक कोपऱ्यात छोटेसे किराणा दुकान. आई गृहिणी. तिने येथील इन्नानी महाविद्यालयात बी.एस्सी. पदवीचे शिक्षण पूर्ण केले. नंतर स्पर्धा परीक्षेची तयारी सुरू केली. स्थानिक पातळीवर बँकिंगचे क्लास घेणाऱ्या संस्था नाहीत आणि मोठ्या शहरात जाऊन खाजगी क्लासेस लावणे तिला आर्थिकदृष्ट्या परवडणारे नव्हते. म्हणून तिने घरूनच स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याचे ठरवले. जवळपास स्पर्धा परीक्षेसंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी कुणीही उपलब्ध नसल्याने , तिने यासाठी ऑनलाईन क्लासेस जॉईन केले. तथापि, छोटे घर व त्यात राहणारे आजी, आई, वडील, मोठी बहीण आणि लहान भाऊ असे सहा जणांचे कुटुंब. शिवाय किराणा दुकानात दिवसभर ग्राहक सुरू राहत असल्याने तिच्या अभ्यासात वारंवार व्यत्यय येत होता.

अखेर यावर उपाय म्हणून तिने यासाठी एका अभ्यासिकेत प्रवेश घेतला आणि स्पर्धा परीक्षेच्या तयारीला सुरुवात केली. तिने पहिल्यांदा फेब्रुवारी २०२५ मध्ये भारतीय स्टेट बँकेतील लिपीकपदाची पूर्व तर एप्रिल २०२५ मध्ये मुख्य परीक्षा दिली. या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून, त्यात तृप्ती हिने ८२ गुणांसह ही परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्यामुळे तिची भारतीय स्टेट बँकेत लिपीक पदासाठी निवड झाली आहे. आई, वडील आणि मोठ्या बहिणीच्या प्रोत्सनामुळे तिने विपरीत परिस्थितीत हे यश संपादन केले .

## इन्सेक्ट आणि स्पायडर बाईटच्या रुग्णांमध्ये वाढ

### त्वचेवर खाज, सूज, लालसर चट्टे येण्याच्या प्रकारात वाढ





दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशीम, दि. १५ :** पावसाळा सुरू होताच डास, मुंग्या, झिंगाट्या, कोळी (स्पायडर) यांसारख्या कीटक व क्रॉलर प्राण्यांची संख्या झपाट्याने वाढत असून, त्यामुळे इन्सेक्ट बाईट व स्पायडर बाईट मुळे त्वचेवर गंभीर त्रास दिसून येत आहेत. सध्या ग्रामीण तथा शहरातील विविध त्वचावैद्यकीय केंद्रांमध्ये यासंबंधी रुग्णांची संख्या लक्षणीयरीत्या वाढलेली दिसून येत आहे.

अनेक रुग्णांमध्ये कीटक चावल्यामुळे त्वचेवर खूप खाज, सूज, लालसर चट्टे, फोड, जळजळ, तसेच काही प्रकरणांमध्ये सेल्युलायटिस (त्वचेस संसर्ग) आणि ॲलर्जिक रिॲक्शन यांसारखे त्रास दिसून येत आहेत. स्पायडर बाईटमुळे काही वेळा नरम्या ऊतींचा डॅमेज, तसेच ताप किंवा झणझणीत वेदना अशाप्रकारचे लक्षणे दिसून येत आहेत.

‘‘पावसाळ्यात दमट हवामान आणि घराभोवती साचणारे पाणी ही कीटक व कोळ्यांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करते. अनेक वेळा रुग्णांना वाटते की हे फक्त डास चावले, पण काही वेळा स्पायडर बाईट किंवा इतर विषारी कीटक चावल्यास त्वचेस गंभीर इजा होऊ शकते. वेळेवर उपचार न घेतल्यास संसर्ग शरीरात पसरू शकतो.

“ डास, मुंग्या, झिंगाट्या, कोळी यांसारख्या कीटक चालवण्याचे रूग्णाची संख्या वाढली आहे. या आठवड्यात ३० रूग्णाने उपचार घेतलें आहेत .

**- डॉ. नेहा आढाव,** वाशीम



“ कीटक चावण्याकडे दुर्लक्ष करू नका. खास करून गंभीर स्वरूप धारण करू शकतो. घरगुती उपायांपेक्षा त्वचारोग तज्ज्ञांचा त्वरित सल्ला घेणे आवश्यक आहे. स्वच्छता, योग्य कपडे, आणि सतर्कता या त्रिसूत्रीने आपण पावसाळ्यातील कीटक त्रास टाळू शकतो.

**- डॉ विठ्ठल गोटे**
त्वचारोग व सौंदर्य शास्त्र तज्ञ, वाशीम

#### काय काळजी घ्याल?

पूर्ण बाह्यांचे हलके व घट्ट कपडे परिधान करा विशेषतः संध्याकाळी व झाडाझुडपाजवळ जाताना. घराच्या कोपऱ्यांमध्ये कोळ्यांची जाळी साफ ठेवा विशेषतः अंधाऱ्या जागा, खिडक्या, कोपरे. घराभोवती पाणी साचू देऊ नका डास व इतर कीटक वाढण्याची मुख्य जागा. रात्री झोपताना मच्छरदाणी वापरा व खिडक्यांना जाळ्या लावा. कीटक किंवा कोळी चावल्यावर पुढील लक्षणे दिसल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## मद्यपींमुळे ग्रामस्थ त्रस्त: पोलिस चौकीला कुलूप

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी



**उंबर्डा बाजार, दि. १५ :** ग्रामीण पोलीस स्टेशन कारंजा लाड अंतर्गत येत असलेल्या ग्राम उंबर्डा बाजार येथील बसस्थानक परिसरात गेल्या काही दिवसांपासून मद्यपी रस्त्याने चालताना येणाऱ्या-जाणाऱ्यांशी अर्वाच्य शब्दांत संवाद साधून शिवीगाळ करीत आहेत. या प्रकारामुळे ग्रामस्थ वैतागले असून, याकडे पोलिसांनी लक्ष देण्याची मागणी करण्यात येत आहे.

उंबर्डा बाजार येथील बसस्थानक परिसरात खुलेआम अवैध दारू विक्री सुरू असल्याने परिसरात मद्यपींचा वावर वाढला आहे. हे मद्यपी रस्त्याने येणाऱ्या जाणाऱ्यांकडे पाहून अर्वाच्य शब्दांचा वापर आणि शिवीगाळ करतात. तसेच महिलांना पाहून अश्लील ताशेरे ओढतात. या प्रकारामुळे ग्रामस्थ आणि व्यावसायिक वैतागून गेले आहेत. मद्यपींचा त्रास होऊ नये म्हणून महिलांना रस्त्याने घाईने मार्गक्रमण करावे लागते. एखाद्या वेळी या मद्यपींमुळे गावात मोठा वाद घडून कायदा सुव्यवस्थेला बाधा निर्माण होण्याची भीती आहे. तरी याकडे ग्रामीण पोलीस स्टेशन कारंजा येथील वरीष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी ग्रामस्थां कडून केली जात आहे. उंबर्डा बाजार गावात अवैध दारू विक्रीला उधाण आले असून अनेक जण अवैध दारू विक्रीच्या व्यवसायात उतरले आहे. दारू विक्री करण्यासाठी अनेक दारू विक्री करणाऱ्यांमध्ये स्पर्धा सुरू झाली आहे. शरीराला घातक ठरणारी नकली दारू घरा घरात पोहचत आहे.

## थोडक्यात

### पवार यांना शांतीदुत सेवारत पुरस्कार

**मेहकर :** येथील पत्रकार, लेखक व सामाजिक कार्यकर्ते सिद्धेश्वर पवार यांना यंदाचा शांतीदुत सेवारत पुरस्कार जाहीर केला आहे. येत्या २६ जून रोजी पुणे येथे हा पुरस्कार वितरण सोहळा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे. छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंती दिनी त्यांचा उपरोक्त पुरस्काराने विविध मान्यवरांच्या उपस्थितीत गौरव केल्या जाणार असल्याचे शांतीदुत परिवाराचे अध्यक्ष सेवानिवृत्त विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ. विठ्ठलराव जाधव यांनी कळविले आहे. सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता यामधील उल्लेखनीय कार्याबद्दल पवार यांना हा पुरस्कार देण्यात येणार आहे.

### बालाजी मंदिरात भागवत कथा सोहळा

**देऊळगाव राजा :** येथील बालाजी मंदिरात दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी १५ जून पासून भागवत कथेचे आयोजन करण्यात आले आहे. गोंदीकर महाराजांच्या वंशपरंपरेने होणाऱ्या श्रीमद् भागवत सप्ताहाचे आयोजन १५ ते २१ जून दरम्यान होणार आहे. तसेच या सप्ताहाच्या अंगभूत सकल गोविंद भक्तांच्या कल्याणासाठी विष्णुसहस्त्रनाम पाठाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे भक्तांनी आपापल्या परीने विष्णुसहस्त्रनामाचे पाठ करावा व त्याची नोंद बालाजी मंदिरामध्ये द्यावी.

### सुमनबाई मल्लावत अल्पशा आजाराने निधन



**देऊळगाव राजा :** येथील राजस्थानी समाजाचे व्यापारी जुगलकिशोर मल्लावत यांच्या पत्नी सौ.सुमनबाई मल्लावत यांचे शनिवारी रात्री अल्पशा आजाराने वयाच्या ८० व्या वर्षी निधन झाले. शहरातील गणराज डिस्टीब्युटरचे मालक माजी नगरसेवक तथा दिपक मल्लावत यांच्या त्या मातोश्री तर प्रसिध्द सनदी लेखापाल राज दिपक मल्लावत यांच्या त्या आजी होत्या. त्यांच्या कुटुंबात त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर वैकुंठधाम स्मशानभूमीत अंतिम संस्कार करण्यात आले. यावेळी सर्व स्तरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
|---|---|
| ज्वारी | १०५० – २३०० |
| गहू | २४२५–२४७५ |
| तुर | ४१०० – ६६७५ |
| हरभरा | ४३०० – ५४५० |
| सोयाबीन | ३४००– ४३७५ |
| भुईमुग | ३८०० – ५२७५ |
| उडीद | ४२७५ – ६५५० |
| मक्का | १५०० – २०५५ |

# प्रलंबित मागण्यांसाठी सरपंचासह ग्रामस्थांचे शोलेस्टाईल आंदोलन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**संग्रामपुर दि.१५**



तालुक्यातील पिंप्री काथरगाव ग्रा. पं. अंतर्गत गावातील प्रलंबीत कामासाठी यापुर्वी निवेदन दिले होते. नंतर स्मरण पत्र देऊन गावातील प्रलंबीत कामे त्वरित करा अन्यथा ग्रा.प.सदस्य महिला व गावातील असंख्य महिला यांच्या सर्व गावातील पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईलने आंदोलन छेडण्याचा ईशारा कर्तव्यदक्ष सरपंचा सुवर्णा गणेश टापरे यांनी संबंधीत विभागाला दिला होता.

प्रमाणे दि १३ जुन रोजी सरपंच सुवर्णा गणेश टापरे यांच्या नतृत्वात ग्रा.पं.पदाधिकारी, ग्रामस्थ ,उपसरपंच लिलाताई मुंडे, साधना खराटे, सत्यभामा सुलताने, वर्षा बिहाडे, कुसुम डाखोडे, दिलीप बावस्कार श्रीकृष्ण मुंडे , देविदास मेंहेगे, कैलास खराटे, ग्रा.पं.सदस्य प्रियाताई गोल्हर, विलास कंकाळ, संदीप डाखोडे, पाणीपुरवठा कर्मचारी भगवान मुंडे यांनी गावातील विविध मागण्यासाठी पाण्याच्या टाकीवर चढून शोले स्टाईलने आमच्या मांगण्या पुर्ण करा अश्या घोषणा देत आंदोलन केले. आंदोलन पिण्याच्या टाकी स्थळी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण कर्मचारी राठोड, याकीब , लासुरकर यांनी भेट देऊन आंदोलन कर्त्यांना टाकी वरून खाली उतरुन चर्चा करुन तोडगा काढू विनंती केली. आंदोलन कर्ते खाली उतरले सरपंच सुवर्णा गणेश टापरे सह आंदोलन कर्त्याशी मांगण्या संदर्भात चर्चा करून मांगण्या मान्य करुन लेखी आश्वासन दिल्याने आंदोलनाला यश आल्याचे बोलले जात आहे. महाराष्ट्र जीवन प्राधीकरण विभागा करवी गावात पिण्याच्या पाण्यासाठी पाईप लाईन टाकण्याचे काम सुरू त्वरित करण्यात येईल तसेच गावातील झोपड पटटी टेकड, नाल्या मोऱ्याचे काम सार्वजनिक बांधकाम विभागा कडून सुरु करण्यात आले. याच बरोबर पिप्री काथरगाव येथे वाढीव इलेक्ट्रिकल पोल मिळण्यासंदर्भात समस्या मार्गी लागली. सरपंच सुवर्णा गणेश टापरे यांचे पिंप्री काथरगाव ग्रामस्थाकडून कौतुक होत आहे.

## पाण्याच्या टंचाईने होरपळणाऱ्या नागझरी ग्रामस्थांना दिलासा; टँकरला मंजूरी




**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**सिंदखेड राजा दि.१५**

सिंदखेड राजा तालुक्यातील नागझरी गावात गेल्या काही आठवड्यांपासून प्रचंड पाणीटंचाई जाणवत होती. गावातील विहिरी कोरड्या पडल्या असून, जनावरांसह माणसेही एक घोट पाण्यासाठी वणवण भटकत होती. अखेर या टंचाईची दखल घेत प्रा संजय खडसे उपविभागीय अधिकारी यांनी नागझरी गावासाठी दररोज टँकरद्वारे १६ हजार ३६० लिटर पाणीपुरवठा करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

या आदेशानुसार, सुमारे १०१८ लोकसंख्या असलेल्या नागझरी गावात एक टँकर दररोज पाणी पोहचवणार आहे. टँकर नादुरुस्त झाल्यास पर्यायी टँकर तत्काळ द्यावा ! निविदाधारक टँकर नादुरुस्त झाल्यास पाणीपुरवठा खंडित होऊ नये म्हणून तात्काळ दुसऱ्या टँकरची व्यवस्था करणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रशासनाच्या या निर्णायक पावलामुळे गावात समाधानाचे वातावरण आहे. पाणी म्हणजे जीवन आणि प्रशासनाने घेतलेला निर्णय हे जीवनदानच ! नागझरीतील ग्रामस्थांनी अनेकदा प्रशासनाचे लक्ष वेधूनही उपाययोजना झाल्या नव्हत्या. मात्र आता शासनाच्या निर्णयामुळे गावकऱ्यांच्या पाण्यासाठीच्या झगड्याला मोठा आधार मिळाला आहे. पाण्याची उपलब्धता आणि वितरण व्यवस्थित होण्यासाठी टँकरच्या प्रत्योक खेपांची नोंद ग्रामपंचायतीने नियमित ठेवावी, असा स्पष्ट आदेश प्रशासनाकडून देण्यात आला आहे. याचबरोबर गटविकास अधिकारी यांनी नोंदवही तपासावी, अशी सूचनाही प्रसिद्धीपत्रकात देण्यात आली आहे.

## अतिवृष्टीमुळे शेतीचे झालेल्या नुकसानीचा मोबदला न मिळाल्याने तरुण निघाला आमदारांचे घर जाळण्यासाठी!

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**संग्रामपुर दि.१५**

बावनबीर येथील शेतकऱ्याचे मागील वर्षी अतिवृष्टीमुळे शेतीचे झालेल्या नुकसानीचा मोबदला न मिळाल्याने या शेतकऱ्याने चक्क शासनाविरोधात रोष व्यक्त करत जळगाव जामोद विधानसभा मतदार संघाचे आमदार डॉ. संजय कुटे यांचे निवासस्थान गाठुन पेट्रोल टाकून घर जाळण्याचा प्रयत्न केल्याची घटना दिनांक १३ जून रोजी मध्यरात्री उघडकीस आली. या घटनेमुळे संपूर्ण मतदारसंघात एकच खळबळ उडाली आहे.

दिनांक १३ जून च्या मध्यरात्री आमदार संजय कुटे हे यांच्या जळगाव जामोद येथील निवासस्थानी संग्रामपूर तालुक्यातील बावनबीर येथील शेतकरी विशाल मुरुख या तरुणाने आ. कुटे यांच्या निवासस्थानाच्या परिसरात प्रवेश मिळवला व हातात पेट्रोलची कॅन घेऊन मला मागील वर्षीच्या अतिवृषटीमुळे झालेल्या नुकसानीचा मोबदला अद्याप न मिळाल्याने मी आमदारांचा बंगला जाळून टाकतो असे म्हणत पेट्रोलची कॅन घेऊन बंगल्याच्या प्रवेश द्वारकडे जात असताना आमदार डॉ संजय कुटे यांचे स्विय सहाय्यक प्रकाश राऊत यांनी त्या शेतकरी तरूणाला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. याप्रकरणी पोलिसांनी शेतकरी विशाल मुरुड यांच्याविरुद्ध कलम ३३३,३५१(२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. आरोपी विशाल मुरुख यास पोलिसांनी न्यायालया समक्ष हजर केले असता न्यायालयाने विशाल मुरूख यांची जामिनावर सुटका करण्यात आली.

## 'ज्ञानदान दत्तक उपक्रमाचा' लाभ घेण्याचे आवाहन

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.१५**

जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थ्यांनी कॉलेज ऑफ मॅनेजमेंटच्या '' ज्ञानदान दत्तक उपक्रमाचा'' लाभ घेण्याचे संस्था अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहान यांनी आवाहन केले आहे. लक्ष्मीनारायण ग्रुप कॉलेज ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने गेली पंधरा वर्षापासून निरंतरता पूर्वक विद्यार्थ्यांच्या हितार्थ स्व.सौ. शैलजाताई चौहान स्मृती प्रीत्यार्थ ''ज्ञानदान दत्तक उपक्रमाचा'' लाभ दरवर्षी शेकडो विद्यार्थी घेत असतात. पारंपारिक पदवी बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी. या अभ्यासक्रमासाठी हा उपक्रम वरदान ठरत आहे.

इयत्ता १०वी तसेच १२वी मधील कला, विज्ञान, वाणिज्य या शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक असणाऱ्या विद्यार्थ्यांना या ''ज्ञानदान दत्तक उपक्रमाचा''लाभ घेता येईल. हुशार आणि गरजू विद्यार्थी दरवर्षी या उपक्रमाचा कॉलेज ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने सातत्याने लाभ घेत आहे. खऱ्या अर्थाने बुद्धी कौशल्य असलेले विद्यार्थी शिक्षणाच्या मुळ प्रवाहापासून वंचित राहू नये केवळ आर्थिक अडचणी मुळे त्यांच्या शैक्षणिक जीवनामध्ये कुठेही बाधा येऊ नये तसेच त्यााच्या अंगी असलेली गुणवत्ता संपूर्णतः सिद्ध करता यावी या साठीच ''ज्ञानदान दत्तक उपक्रम'' दरवर्षी अनेक विद्यार्थ्यांना शिक्षण रुपी संजीविनी देण्यास सिद्ध होत आहे. यामुळे कॉलेज ऑफ मॅनेजमेंटची आपली एक वेगळी प्रतिमा संपूर्ण जिल्ह्याभर प्रसिद्ध झाली आहे. 'ज्ञानदान दत्तक उपक्रमाअंतर्गत'' गरजू, होतकरू आणि गुणवत्ता असलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षणाद्वारे त्यांचा सर्वकश सर्वांगीण विकास करून घेता यावा याच हेतूने त्यांना त्यांचे स्वतःचे एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे कार्य कॉलेज ऑफ मॅनेजमेंटच्या वतीने सातत्यापूर्ण रित्या अविरतपणे सुरु राहील.

## गुंज येथील जल जिवन योजना केवळ कागोपत्री ?

**अजिंक्य भारत/प्रतिनिधी**
**साखरखेर्डा दि.१५**

गुंज येथील जल जिवन योजनेच्या माध्यमातून पाणीपुरवठा योजनेचे काम मंजूर झाले होते . सदर कामाचे कंत्राट एका ठेकेदाराने घेतले होते. परंतू या कामाचे नेमके काय झाले ? की कागदोपत्री काम पूर्ण झाले असा आरोप सरपंच यांनी केला आहे.

२०१४ - १५ ला गुंज येथील जल जिवन योजना मंजूर झाली होती. सदर कामाचे कंत्राट एका ठेकेदाराने घेतले होते. या बरोबरच अनेक कामाचे कंत्राट सुद्धा त्या ठेकेदाराला देण्यात आले होते. साखरखेर्डा परिसरात शिंदी, गुंज या गावांसह अनेक गावांत काम घेतले असता एकाही ठिकाणी सदर कंत्राटदाराने काम पूर्ण केले नाही. अशी ओरड होत असताना गुंज येथील जल जिवन योजनेच्या कामाचे काय झाले हेच कळायला मार्ग नाही. कोराडी धोरणावर विहीर, पाईप लाईन, मोटार पंप, जलकुंभ आणि गावातील वितरण पाईप लाईन असा कामाचा समावेश होतो. तब्बल १ कोटी ५६ लाख रुपयांची ही योजना मंजूर झाली होती. या कामासाठी सरपंच सुरेश तुपकर यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला. परंतू काम मात्र सुरु झाले नाही. सिंदखेडराजा पंचायत समितीमध्ये पाणी टंचाई संदर्भात आमदार मनोज कायंदे यांच्या उपस्थितीत ९ मार्च रोजी मिटींग घेण्यात आली होती. त्या बैठकीत सदर प्रश्न सुरेश तुपकर यांनी उपस्थित केला होता.




तरीही कोणत्याही परिस्थितीत काम सुरू झाले नाही. आज गुंज गावात भिषण पाणी टंचाई निर्माण झाली असून नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. याची दखल घेऊन सदर काम तत्काळ सुरू करावे अन्यथा बेमुदत उपोषणाचा मार्ग अवलंबला लागेल अशी माहिती सरपंच सुरेश तुपकर यांनी दिली आहे.

## अजितदादा यांच्यासह मंत्र्यांना प्रभु श्रीराम दरबारची चांदीची मूर्ती भेट

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**खामगाव दि.१५**



महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार हे दि.१२ जून २०२५ रोजी खामगाव शहराच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी माजी आमदार दिलीपकुमार सानंदा यांच्या सानंदा निकेतन येथील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांच्या समवेत महाराष्ट्र राज्याचे मदत व पुर्नवसन मंत्री तथा बुलढाणा जिल्हयाचे पालकमंत्री मकरंद पाटील, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ना.इंद्रनील नाईक, अमरावती विभागाचे समन्वयक ,विधान परिषद सदस्य संजयभाऊ खोडके,विधान परिषद सदस्य अमोल मिटकरी, सिंदखेड राजा विधानसभा मतदार संघाचे आमदार मनोज कायंदे,राष्ट्रवादी कॉंग्रेसचे युवक प्रदेश अध्यक्ष सुरज चव्हाण, माजी आमदार झिशान सिद्दीकी, राष्ट्रवादी कॉँग्रेसचे बुलढाणा जिल्हा अध्यक्ष ॲड,नाझेर काझी यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

यांप्रसंगी माजी नगराध्यक्षा सौ. अलकादेवी सानंदा यांनी ना.अजितदादा पवार यांचे कुकुंम तिलक लावुन औक्षण केले.तसेच यावेळी माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचा शाल व पुष्पहार घालुन सत्कार केला व क्षत्रिय थाटामध्ये ना.अजितदादांना प्रभु श्रीरामचंद्राची राम दरबारची चांदीची मूर्ती भेट दिली. तसेच यावेळी ना.अजितदादा पवार यांच्यासोबत असलेले बुलढाणा जिल्हयाचे पालकमंत्री मकरंद पाटील, सार्वजनिक बांधकाम राज्यमंत्री ना.इंद्रनील नाईक यांचा सुध्दा सानंदा परिवाराच्या वतीने प्रभु श्रीरामचंद्राची राम दरबारजी चांदीची मूर्ती भेट देवुन सत्कार करण्यात आला. यावेळी माजी नगराध्यक्ष राणा अशोकसिंह सानंदा,सौ.सवितादेवी सानंदा,सहकार मित्र राणा राजेंद्रसिंह सानंदा,माजी नगरसेवक राणा अमेयकुमार सानंदा, राणा आनंदकुमार सानंदा, राणा सागरकुमार सानंदा,राणा गौरवकुमार सानंदा, राणा प्रतिकसिंह सानंदा, राणा दिग्वीजयसिंह सानंदा,राणा तन्मयसिंह सानंदा यांच्यासह सानंदा परिवारातील सदस्य उपस्थित होते.

## व्यायामाच्या साहित्यासाठी निधी उपलब्ध करून देणार- माजी आ.रायमुलकर

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मेहकर दि.१५**

व्यायाम शाळांमध्ये शरीर सदृढतेसोबतच युवकांना निर्व्यसनी राहण्याचे धडे मिळतात व त्याातून संपन्न समाजनिर्मिती होते.भारत तालीम संघाला १५० वर्षांची वैभवशाली परंपरा आहे. इथे पिढ्या घडल्या. तालीम संघाला आधुनिक व्यायाम साहित्य खरेदीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात येईल,असे विचार माजी आमदार संजय रायमुलकर यांनी व्यक्त केले.



केंद्रीय आयुष,आरोग्य,कुटुंबकल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन आमदार संजय रायमुलकर यांनी एक कोटी रुपये भारत तालीम संघाच्या इमारतीसाठी उपलब्ध करून दिले होते. काल ता. १४ रोजी सायंकाळी या दुमजली इमारतीचे उद्घाटन संजय रायमुलकर यांच्या हस्ते झाले.त्यावेळी बोलतांना त्यांनी वरील माहिती दिली.

युवा सेनेचे जिल्हाप्रमुख ऋषिकेश जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती माधवराव जाधव, शिवसेना तालुकाप्रमुख सुरेशतात्याा वाळूकर, बबनराव भोसले, नगरपालिकेचे अभियंता अजय मापारी ,रवीकुमार अग्रवाल, नारायण काबरा, संतोष पवार, रामेश्वर भिसे,ओम सौभागे, मोहन जाधव, सचिन चुनडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तालीम संघात बजरंगबलींच्या संगमरवरी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. प्रमुख अतिथींच्या हस्ते होमहवन व पूजा करण्यात आली. शहरातील चंद्रेश्वर व्यायाम शाळा इमारतीसाठी ५० लाख रुपये आणि माळी पेठ भागातील व्यायाम शाळेसाठी ३० लाख रुपये यापूर्वीच उपलब्ध करून देऊन इमारतींचे बांधकाम करण्यात आल्याची माहिती ही यावेळी बोलताना संजय रायमुलकर यांनी दिली. तालीम संघातील मल्लांनी जिल्हा व राज्य पातळीवर अनेक वर्षे कामगिरी बजावली आणि पोलीस, सैन्यदल, सरकारी क्षेत्रामध्ये मोठ्या संख्येने युवकांनी नोकऱ्याही मिळवल्या, अशी माहिती यावेळी बबनराव भोसले यांनी दिली.

आकाश सास्ते, देवदत्त पितळे, नंदू काळे, सिद्धेश व्यास, सुनील लोहिया, सतीश जाधव, संतोष राणे, संदीप तट्टे ,गोपाल जाधव ,नितीन भराडे ,विशाल हेडा, सुधीर खरात, जीवन शर्मा, विजय तोष्णीवाल, अनिल लादे, अनिल काटकर, जयदेव पितळे ,अनिल नरवाडे ,योगेश गिरी, अमर बाजड, अमोल मिरे, रोहित जाधव ,मनोज विटकरे ,राजेश घोडे आदिंसह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

## अहमदाबाद दुर्घटनेतील मृतकांना मलकापुर कॉँग्रेसच्यावतिने वाहिली श्रध्दांजली

**अजिंक्य भारत/ प्रतिनिधी**
**मलकापुर दि.१५**



भारतीय राष्ट्रीय कांग्रेस पक्ष मलकापुर शहर तथा तालुकाचे वतिने अहमदाबाद विमान दुर्घटनेत मरण पावलेले सम्माननीय प्रवाशी तथा सम्माननीय नागरीकांना रविवार दिनांक १५ जून रोजी सकाळी ११:०० वाजता हुतात्मा स्मारक मलकापुर येथे सामूहिक श्रद्धांजली वाहन्यात आली या प्रसंगी पक्षाचे जेष्ठ नेते मा डॉ अरविंदजी कोलते, माजी नगराध्यक्ष ॲड हरीश रावळ, तालूकाध्यक्ष अनिल भारंबे, शहराध्यक्ष राजू पाटील, अतामास्टर जमादार, अनिल गांधी, ॲड जावेद कुरैशी, सुहास (बंडू) चवरे, डॉ सलीम कुरैशी, संभाजी शिर्के, प्रविण पाटील,जाकिर मेमन, हरीश सिद्धिक सूपडु, अशोक मराठे, तुषार पाटील, विनय काळे, उस्मान मास्टर, अनिल मुंधोकार, प्रा अनिल खर्चे सर, फिरोज पटेल, विलास खर्चे,कैलास धाडे, भूषण सनिसे, अशरफ पेंटर ,प्रशांत नाफडे इत्यादि लोक उपस्थित होते

अजिंक्य भारत
# आपला जिल्हा
अकोला । सोमवार, दि. १६ जून २०२५



# गोरक्षण संस्थाना स्वत: च्या पायावर उभे करणे आयोगाचा मुख्य उद्देश

। सिद्धार्थ तायडे ।

**अकोला, दि. २३ :महाराष्ट्र शासन गोसेवा आयोगाचे देशी गोवंश संवर्धन, संरक्षण कार्य अविरत आणि समाधान कारक असून आयोगाकडून अजूनही राज्यातील गोरक्षण संस्थाचा विकास करून त्यांना स्वत: च्या पायावर उभे करून देशात गोसेवा वाढीवर भर देण्यासाठी विविध योजना व उपक्रम सुरु असून हे काम अविरत सुरु असून याचबाबत अधिक आणि विस्तृत माहिती घेण्यासाठी महाराष्ट्र शासन गोसेवा आयोगाचे सदस्य उद्धव नेरकर यांच्याशी दै अजिंक्य भारत ने बातचीत केली असता त्यांनी समर्पक उत्तरे दिली.**





**प्रश्न : महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना कधी झाली? आणि सदस्य संख्या किती?**
महाराष्ट्र गोसेवा आयोगाची स्थापना करण्याचा निर्णय २८ एप्रिल २०२३ रोजी घेण्यात आला. त्याची अंमलबजावणी १० मे २०२३ रोजी झाली. आयोगाचे कामकान ७ जुलै २०२३ पासून सुरू झाले. गोसेवा आयोगाचे ९ अशासकीय तर १४ शासकीय सदस्य आहेत. शेखर मुंदडा आयोगाचे अध्यक्ष आहेत. मंजूषा पुंडलिक या आयोगाच्या सदस्य सचिव आहेत. आयोगाचे मुख्यालय पुणे येथे पशुसंवर्धन आयुक्तालयाच्या इमारतीत हे मुख्यालय आहे.

**प्रश्न : आयोगाची प्रमुख उद्दिष्टे काय आहेत?**
राज्यात पशु संवर्धन, संरक्षण व कल्याणासाठी कार्यरत असणाऱ्या संस्थांचे पर्यवेक्षण करणे, गोसदन, गोशाळा, पांजरपोळ, व गोरक्षण संस्थांची नोंदणी करणे, अस्तित्वात असलेल्या कायद्यान्वये पशुच्या संरक्षणाची सुनिश्चिती करणे, संस्थांच्या विकासासंबंधीचे राज्य शासनाचे कार्यक्रम व योजना यांची अंमलबजावणी होईल हे सुनिश्चित करणे, देशी जातीच्या पशु विकासासाठी सक्रिय सहभाग, पशु आरोग्य सेवा प्रचालन, अस्तित्वात असलेल्या कायद्यानुसार
जप्त केलेल्या पशुची काळजी व्यवस्थापन, नोंदणीकृत संस्थेद्वारे देखभाल करण्यात येणाऱ्या दुर्बल, वयस्क व रोगग्रस्त पशुचे योग्य व्यवस्थापन, काळजी व उपचारासाठी सुनिश्चिती करणे ही उदिष्टे आहेत . तसेच पशु व्यवस्थापनासंबंधी शेतकरी व इतर घटकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करणे, राज्याच्या गोवंश प्रजनन धोरणाची अंमलबजावणी व त्याचे सनियंत्रण, माफसू व पशु वैरण विकास कार्यक्रमाशी संबंधित इतर संशोधन करणे आहे नोंदणीकृत संस्था आणि आयोग यांच्यात समन्वय साधणे, वैरण विकास क्षेत्रात अद्यावत तंत्रज्ञान वाणाची उपलब्धता यावरील गौ हत्येला प्रतिबंध करण्याच्या कृतीचा आवाका, जिल्हा प्राणी कोष प्रतिबंधक सोसायटीच्या कामाचा आढावा घेणे या जबाबदाऱ्या आहेत.

**प्रश्न : देशी गोवंशाच्या संख्येविषयी काय सांगाल?**
२०२० व्या पशुगणनेनुसार महाराष्ट्रात एकूण गोवंशाची मंख्या १ कोटी ३९ लाख ४८ हजार ६५३ इतकी आहे. त्यामध्ये खिल्लार ६ लाख ७६ हजार ९४७, गौर १ लाख ६० हजार ३४५, लाल कंधारी १ लाख ४९ हजार १५९, डांगी १ लाख २७ हजार ९३०, देवणी १ लाख २३ हजार ९४७ आहे. तर. विदर्भातील मुख्य देशी गोवंश मानल्या जाणाऱ्या गौळाऊची संख्या ७३ हजार ५६४ इतकी अत्यल्प आहे. कोकण कपिलाची संख्या अवघी ८ हजार असल्याचे त्यावेळी करण्यात आलेल्या गणनेनुसार स्पष्ट होते. एच.एफ आणि जर्सी गायींची संख्या ५६ लाख ७ हजार ७३० इतकी नोंदविण्यात आली आहे. अवर्गीकृत जनावरांची संख्या ८० लाख २१ हजार ३९ इतकी होती. केंद्र सरकारकडून नव्याने पशु जनगणना करण्यात येत आहे. ती पूर्ण झाल्यावर राज्यातील देशी गोवंशाची नेमकी स्थिती स्पष्ट होईल.

**प्रश्न : राज्यात गोशाळांची संख्या किती आहे?**
राज्यात एकूण १०६५ गोशाळा असल्याचे काही निरीक्षणातून समोर आली आहे. मात्र त्याविषयी अधिकृत सांगता येत नाही. विशेष म्हणजे गडचिरोली जिल्ह्यात एकही गोशाळा नाही. आयोगाकडे राज्यातून ७८६ इतक्या गोशाळांची नोंदणी झाली आहे. गोशाळांच्या नोंदणीकरीता आयोगाने खास संकेतस्थळ विकसित केले आहे. नोंदणीकरीता एक हजार रुपयाचे शुल्क आकारले जाते. त्या अंतर्गत वर्षातून चार वेळा गोशाळांची तपासणी होते. कंपनी कायद्यांतर्गत असलेल्या तरतुदीनुसार कंपनी, न्यास, नोंदणीकृत संस्था अशा प्रकारे गोशाळांची नोंदणी होते. सुधारित गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजनेचा उद्देश गोशाळांना पायाभूत सुविधांसाठी निधीची उपलब्धता करणे हा आहे. पूर्वी राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून याची अंमलबजावणी होत होती. परंतु ११ जुलै २०२४ रोजी या योजनेचे हस्तांतरण आयोगाकडे झाले. आयोगाने योजनेसाठी १९.५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पायाभूत सुविधांमध्ये चारा, पाणी, शेड, बायोगॅस यांचा समावेश आहे. गोशाळांमध्ये ५० ते १०० इतक्या संख्येत जनावरे असल्यास १५ लाख रुपये, १०१ ते २०० जनावरांच्या संख्येसाठी २० लाख रुपये, २०० पेक्षा जास्त जनावरे गोशाळेत असल्यास २५ लाख रुपयांच्या निधीची उपलब्धता केली जाते. दोन टप्यात हे अनुदान दिले जाते: पहिल्या टप्यात ६० तर दुसऱ्या टप्यात ४० टक्के अनुदान देण्याची तरतूद आहे.

**प्रश्न : गाईला राज्यमातेचा दर्जा दिल्यानंतर पुढे काय?**
गो वंन्शाची हत्या केल्यास शिक्षेची तरतूद आहे. महाराष्ट्रात गोमातेला राज्यमातेचा दर्जा देण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर राजस्थानच्या वर गोमातेला इजा पोचल्यास किंवा तिची हत्या झाल्यास गोसेवा कायदे अधिक कडक असावेत . त्यामुळे गौहत्या थांबण्यास मदत होईल.

**प्रश्न : गोवर्धन गोवंश सेवा केंद्र योजना काय आहे? गोशाळेतील गैरप्रकार कसे रोखता येतील?**
एखाद्या गोशाळेच्या कारभाराविषयी तक्रार आल्याम त्यावर कारवाई करण्याचे अधिकार आयोगाला आहेत. जालना जिल्ह्यातील वाल सावंगी आणि मंठा येथील दोन गोशाळांनी अनुदानाचे प्रस्ताव दाखल केले होते. परंतु या गोशाळांत काही व्यक्तीनी आयोगाकडे तक्रार केली होती. त्याची दखल घेऊन आयोगाने पाहणी केली. त्यावेळेस आवश्यक तितक्या संख्येने गोवंश दिसून आले नाही . त्यामुळे या दोन्ही गो शाळांचे पहिल्यातील लाख रुपयांचे अनुदान थांबविण्याची प्रक्रिया कराण्यात आली.

**प्रश्न : गो-१० धोरणात कोणत्या बाबींचा समावेश आहे?**
गोसेवा आयोगाच्या वतीने गो १० धोरण अवलंबिण्यात आले आहे त्यामध्ये गो संगोपन, गोसंवर्धन गोसंरक्षण, गोमय मूल्यवर्धन, गोशाळा, गोरक्षक गोपालक, गो आधारित शेती, गो साक्षरता, गो पर्यटन अशा दहा घटकांचा समावेश आहे. देशातील राज्यांमध्ये असलेल्या गोसेवा आयोगांना सि एसआर फंड देण्याची तरतूद नियमावलीमध्ये नाही परंतु महागोसेवा आयोगाने तशी खास तरतूद केली आहे. त्यामुळे सीएसआर केंद्र घेत त्याचा विनियोग गोवंश साक्षरतेच्या कामासाठी केला जाणार आहे.

**प्रश्न : गोशाळा संचालकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आहेत का?**
राज्यातील ३४ जिल्ह्यांमध्ये गोशाला संचालकांचे प्रशिक्षण आयोजित करण्याचे नियोजन आहे. अमरावती, यवतमाळ, वाशीम, हिंगोली, बीड, नदिड या जिल्ह्यात प्रशिक्षण घेण्यात आले, त्यांनी रेकॉर्ड कसे ठेवावे, यासोबत गोशाळांनी निधी मिळविण्याचा प्रयत्न प्राथमिक टप्प्यातील बाबीची माहिती या प्रशिक्षणातून दिली जाते. याकरिता प्रति व्यक्ती ५०० रुपये खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. हा निधी पशुसंवर्धन विभागाकडे वळता करण्यात आला असून त्यांच्या माध्यमातून प्रशिक्षणाचे आयोजन होते. गोशाळा स्वावलंबनाचा आमचा उद्देश आहे. सुक्ष्म व लघु उद्योग मंत्रालयाच्या माध्यमातून वर्धा येथे ५० गोवश संचालकांसाठी प्रशिक्षण दिले जाणार आहे.

**प्रश्न : गोसेवा आयोगातर्फे कोणकोणत्या विषयांवर प्रशिक्षण दिले जाते?**
गो आधारित शेती प्रशिक्षण संकल्पना गोसेवा आयोगाने राबविली आहे. जिल्ह्यांतील २२० तालुक्यात अंमलबजावणी केली आहे राज्य सरकारच्या गोशाळांसाठी देशो देशी गोवंशाच्या शेण गोमुत्राचा उपयोगाविषयी प्रशिक्षण दिले जाते.प्रति ३५०रू या प्रशिक्षणासाठी बचत स्वयंसहायता समूह, गोशाला संचालकांना या प्रशिक्षणातही समाविष्ट केले जात आहे.

## थोडक्यात

### अकोला मल्टी स्पेशलिस्टच्या वतीने मोफत रोग निदान शिबिर



**देवरी :** अकोट तालुक्यामधील आदर्शगाव म्हणून प्रसिद्ध असलेले आलेवाडी येथे पावन हनुमान मंदिरात अकोला येथील डॉ.नरेंद्र सरोदे, अस्थिरोग तज्ञ तथा डॉ. प्रतीक भेंडे, फुफ्फुसतज्ञ यांच्या वतीने गोरगरीब व गरजू सामान्य नागरिकांना मोफतऔषधोपचार करून १५० रुग्णांना तपासणी करून औषधोपचार करण्यात आला. डॉ. नरेंद्र सरोदे हे ग्रामीण भागातीलच असल्यामुळे त्यांना ग्रामीण भागाची मुळातच कल्पना आहे त्यामुळे त्यांचा जास्तीत जास्त कल हा ग्रामीण जनतेच्या सेवेकडे आहे. त्यांनी आजपर्यंत अनेक मोफत शिबिर केली. गरजूंची ऑपरेशन सुद्धा त्यांच्या माध्यमातून करण्यात आली. झालेल्या शिबिरामध्ये गरजवंतांचे ऑपरेशन करून देण्यात येणार आहे असे त्यांनी कळविले आहे. आलेवाडी गावामध्ये झालेल्या शिबिरामध्ये गरजवंतांनी खूप मोठ्या प्रमाणात गर्दी केली व रुग्णांनी या संधीचा लाभ घेतला आहे त्यामुळे आलेवाडी येथील झालेल्या शिबिराची नागरिकांच्या वतीने कौतुक करण्यात आले.

### अकोट न्यायालयात वृक्षारोपण



**अकोट** : पर्यावरण दिनाचे औचित्य साधून आकोट येथील जिल्हा न्यायालयाच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.वृक्षारोपण कार्यक्रम जिल्हा न्यायाधीश तथा तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष बी,एम.पाटील यांच्या मार्गदर्शनात पार पडला.याप्रसंगी जिल्हा न्यायाधीश पाटील,दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर एम.एस.काळे,सह दिवाणी न्यायाधीश आरिफ हारून शेख,दुसरे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर ए.ए.माळी,जिल्हा सरकारी वकील अजित देशमुख यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.या कार्यक्रमाला वकील संघ,न्यायालयाचे अधीक्षक धर्मे,सौ.टिकार, कंजरे, लवरिष्ठ लिपिक हरणे,मिलिंद वानखडे,डिक्कर,सामाजिक कार्यकर्ते विजय जितकर,विधी स्वयंसेवक राजकुमार भगत,संदीप रामचवरे,न्यायालयीन कर्मचारी उपस्थिती होती.

## वीज वितरण कंपनीचा एकाच व्यक्तीवर दहा गावांचा प्रभार

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**जानोरी मेळ, दि. १५ :** निंबा अंदुरा सर्कलमधील वानखडे नामक व्यक्तीची बदली रत्नागिरी येथे करण्यात आली तसेच त्यांच्या जागेवर खाजगी व्यक्ती शिरसाट नामक यांना ठेवण्यात आले. परंतु या व्यक्तीवर दहा गावांचा प्रभार आहे.
काजीखेळ, स्वरूपखेळ, जानोरी मेळ, वझेगाव, मोखा, दगडखेळ, निंबा, नागद, सागद इत्यादी गावांचा प्रभार त्या व्यक्तींवर देण्यात आला आहे. वझेगाव येथील सरपंचपती राजेश माळी हे स्वतः रात्री बे रात्री विज वितरण कंपनी च्या व्यक्तींसोबत फिरत असतात व या परिसरातील विद्युत पुरवठा सुरळीत राहण्यासाठी कामे पार पाडत असतात. मात्र पंजाबराव परघरमोर यांची शेती हिंगणा शेत शिवारात आहे. स्वरूपखेळ फाट्यावर एक हरण कॅप टाकायचा होता तो टाकण्यासाठी पंधरा दिवसापासून विज वितरण कंपनीच्या ते संपर्कात आहेत मात्र त्यांना वेळ मिळाला नाही. शेतकऱ्यांना बागायती कपाशी लावायची होती मात्र विज वितरण कंपनी च्या असहकार्याने कपाशी लावायला खूप उशीर होत आहे अगदी छोट्याशा कामासाठी सुद्धा पंधरा-पंधरा दिवसाचा वेळ लागतो तर इतर कामांचे काय असा प्रश्न नागरिकामार्फत उपस्थित करण्यात येत आहे. तसेच मोखा गावातील वार्ड क्रमांक दोन मध्ये मोठे बाभळीचे झाड विज वितरण कंपनीच्या केबलवर पडलेले आहेत ते झाड पडून चार दिवसांचा अवधी लोटून गेला तरीही कंपनीला अजूनही जाग आली नाही. मात्र कार्यकारी अभियंता यांनी अकोला ऑफिसला एक व्यक्ती स्पेशल पाच गावांकरिता मागावा अशी चर्चा जोर धरत आहे. तीन दिवसांपूर्वी वादळ आले होते त्यामध्ये शिरसाट यांनी त्यांच्यासोबत काही व्यक्तींना घेऊन आल्यावर ती जानोरीमेळ येथील तुटलेले तार रात्रीलाच व्यवस्थित करून दिले पण बरीच कामे अशी आहेत की ती कामे विज वितरण कंपनीला अजून करायचे बाकी आहेत.असाच प्रकार पुन्हा घडू नये त्या केबलचे नुकसान होऊ नये किंवा इतर नागरिकांना इजा होऊ नये याची खबरदारी विज वितरण कंपनीने घ्यावी व नागरिकांचे प्रश्न लवकरात लवकर सोडवण्याचा प्रयत्न करावा अशी मागणी नागरिकांमार्फत कार्यकारी अभियंता यांना करण्यात आलेली आहे

## विमान दुर्घटनेतील मृतांना श्रद्धांजली

**पातुर :** देशातील अहमदाबाद येथे दिनांक १२जून रोजी झालेल्या विमान दुर्घटनेत बळी पडलेल्या सर्व लोकांना काँग्रेसच्या वतीने ३ दिवसांचा दुखवटा पाळला जात आहे. त्यानुसार देशभर श्रद्धांजली चे कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून पातूर तालुक्यात पातुर शहर कांग्रेस व तालुका कांग्रेस कमेटीचे वतीने शहर कांग्रेस कमेटीचे जनसंपर्क कार्यालय घेणयात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष कांग्रेस नेता हाजी सै कमरोद्दीन हे होते. यावेळी तालुका कांग्रेस कमिटी चे अध्यक्ष राजेश गावंडे शहर कांग्रेस कमेटीचे अध्यक्ष मुख्तार शेख अहमद, माजी सरपंच मोहम्मद शब्बीर,जिल्हा सचिव अतुल अमानकर, बब्बू भाई, माजी अध्यक्ष भिमराव कोथलकर,कु उ बा स, चे दौलतराव घुगे, शेख मुख्तार नजीब, मोहसिन खान, राजेश अत्तरकार, सै कौसर,मधू ईंगले, नामदेव करोड्वें, गजानन चव्हाण सह कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते.

## श्री संत वासुदेव महाराज पालखी सोहळा वाशिम जिल्ह्यामध्ये दाखल



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**आकोट, दि. १५ :** गात जा गा गात जा गा । प्रेम मागा विठ्ठला ।। संतांच्या या वचनानुसार वारकरी भाविकांचे श्रद्धास्थान सद्गुरु श्री संत वासुदेव महाराज उपाख्य श्रीज्ञानेश्वरदास यांच्या पालखी सोहळ्याचे मागील आठवड्यामध्ये श्री क्षेत्र श्रद्धासागर या पुण्यभूमीतून भावपूर्ण प्रस्थान झाले. आकोटवासीयांनी व परिसरातील बहुसंख्य भाविकांनी या पालखी सोहळ्याला भक्तिमय वातावरणात निरोप दिला. मजल दरमजल गाठवत हा पालखी सोहळा आकोला शहरामध्ये प्रविष्ट झाल्यानंतर आकोला शहर स्वागत समितीतर्फे जल्लोषात श्रींचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर स्थानिक भाविकांनी ठिकठिकाणी श्री संत वासुदेव महाराज पालखी सोहळ्याचे पूजन, स्वागत, चहा, सरबत, फराळ, अन्नदान, नित्य उपयोगी वस्तू देऊन वारकरी भाविकांची सेवा केली. पालखी मुक्कामाचे ठिकाणी राहुल हिंगणकर, मोहन ठाकरे, ललितादेवी अग्रवाल, हनुमंता जायले, पुरुषोत्तम मुरकुटे, नंदकिशोर राणे, सुधाकर अवारे, गोपाळराव दोड, श्री विठ्ठल भजनी मंडळ मोठी उमरी, संतोष सावरकर, पवित्रकार परिवार, श्रीधरराव टिकार, वासुदेवराव महल्ले, गजाननराव नारे, तेजराव थोरात, डॉ. किरण खंडारे, सुभाष इंगळे, आदी भाविकांनी भोजनाची व्यवस्था केली. त्याचप्रमाणे वैद्यकीय क्षेत्रातील विविध सदभक्तांनी आपली सेवा वारकऱ्यांच्या चरणी रुजू केली.
श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर, आकोट द्वारा या पालखी सोहळ्याचे दरवर्षी आयोजन केल्या जाते. दररोज २० ते २५ किलोमीटर पायी प्रवास करून वारकरी भाविक पुढे पुढे जात आहेत. आता हा पालखी सोहळा वाशिम जिल्ह्यामध्ये दाखल झाला आहे. वाशिम जिल्ह्यातील भाविकांनी या पालखी सोहळ्याचे अतिशय उत्स्फूर्तपणे स्वागत केले. पुरुष, महिला, बालवैष्णव असे २५० वारकरी पालखी सोहळ्यामध्ये आहेत. या सर्व वारकरी भाविकांची निवास व भोजन व्यवस्था वाशिम जिल्ह्यामध्ये डॉ. श्रीराम घुगे मेडशी, आनंद बिर्ला मालेगाव, नामदेवराव कडू सावरगाव बर्डे, दिनकरराव वाटाणे वाशिम, ज्ञानबा पायघन आजनखेडा, पुरुषोत्तमसेठ बाहेती कन्हेरगाव नाका यांचेकडे सुनियोजित आहे. याशिवाय पालखी मार्गातील असंख्य भक्त मंडळी सेवेसाठी वाट बघत आहेत. पालखी सोहळ्यासोबत श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोटचे अध्यक्ष श्री.ह.भ.प. वासुदेवराव महाराज महल्ले, उपाध्यक्ष महादेवराव ठाकरे, सहसचिव अविनाश गावंडे, निमंत्रित सदस्य अनिल कोरपे, दिंडी सोहळा व्यवस्थापक अंबादास महाराज मानकर यांच्या मार्गदर्शनात पालखी सोहळा मार्गक्रमण करीत आहे.

## रोजगार हमी योजनेतून मंजूर विहीरीचे हजेरी पट देण्यास टाळाटाळ!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी



**मूर्तिजापूर, दि. १५ :** तालुक्यातील ग्राम अकोली जहाँगीर येथील रहिवासी अमोल मधुकर खंडारे वय ३७ वर्ष यांची मालकीची मौजे धामोरी खुर्दः तालुका मुर्तिजापूर जिल्हा अकोला येथे शेत गट नंबर ४७ क्षेत्रफळ ०.८१ हे आर मध्ये एम.आर.ई.जि.एस रोजगार हमी योजनेंतर्गत मंजूर विहीरीचे हजेरी पट देण्यास संबंधित अधिकारी व रोजगार सेवक टाळाटाळ करीत असुन त्यामुळे सदर शेतकऱ्यांस मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.
अमोल मधुकर खंडारे रा.अकोली जहाँगीर ता.मुर्तीजापुर येथील रहिवासी आहेत.त्यांची मौजे धामोरी खुर्दः येथे मालकीची शेत गट नंबर ४७ क्षेत्रफळ ०.८१ हे आर मध्ये सन २०२४/२५ मध्ये एम.आर. ई.जि.एस.रोजगार हमी योजनेंतर्गत विहीर मंजूर झाली आहे.त्यांनी विहीरीचे जवळपास २८ फुट पर्यंत खोदकाम केलेले आहे.परंतु त्यांच्या विहीरीचे नावाने एक हजेरी पट ( मस्टर) खोदकाम करण्याबाबतचे काढण्यात आले आहे.त्यांच्या व्यतिरिक्त त्यांच्यासोबतच मंजूर झालेल्या शेतकऱ्यांच्या विहीर कामाचे हजेरी पट ( मस्टर) ७/८ जमा झाले आहे.माझे नावे हजेरी पट (मस्टर) काढण्यास रोजगारसेवक दिवाकर शेंडे तसेच इतर कर्मचारी रुमाल शिवपाल, इंजिनिअर प्रविण ढोके यांना प्रत्यक्ष भेटून सुध्दा मस्टर काढण्यास टाळाटाळ केली जात आहे.ते रोजगार सेवक दिवाकर शेंडे यांना जवाबदार ठरवित आहे. तर रोजगारसेवक हे कर्मचाऱ्यांचे नाव सांगतात यामुळे मानसिक त्रास सहन करावा लागत आहे.पाच महीने पुर्ण झाले आहे.तरीही विहीरीचे हजेरी पट काढण्यास दिरंगाई केली जात आहे.अमोल खंडारे यांनी स्वखर्चाने विहीरीचे खोदकाम केलेले आहे. सध्या पावसाळ्याचे दिवस सुरु झाले आहे.विहीरीचे केलेले खोदकाम पावसाचे पाण्याने ढासळुन जाण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाल्यास त्याला रोजगारसेवक व संबंधित अधिकारी जवाबदार राहणार आहेत. संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी तात्काळ पहाणी करून विहीरीचे हजेरी पट मस्टर काढण्यात यावे.अशी मागणी त्यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी अकोला यांना ही दिली आहे. गटविकास अधिकारी पंचायत समिती मुर्तिजापूर यांनी याकडे लक्ष द्यावे असेही पत्रात नमूद केले आहे.

# दैनिक अजिंक्य भारत बातम्यांचा गतिमान पाठलाग

# आपलं यवतमाळ

वर्धापन दिनानिमित्त मंगलमय शुभेच्छा..!!

---

"वार्ता, विचार आणि मंथन, अखंड ज्ञानाचा झरा,
विश्वासाच्या नात्याला, दिला तुम्हीच आसरा.
प्रत्येक पहाटे येतो, ज्ञानाचा नवा प्रकाश,
तुमच्या लेखणीने उजळले, यवतमाळचे आकाश."




दैनिक **अंजिक्य भारत** या वृत्तपत्रास **वर्धापन** दिनानिमित्त मंगलमय शुभेच्छा..!!

शुभेच्छुक :

**विनीत संजय हातगांवकर**
७८४०९३७८१७

न्यू इंदिरा गांधी मार्केट महाजनवाडी रोड, यवतमाळ

---

"अक्षर झाले शस्त्र तुमचे,
जागरूक करण्याचे व्रत मोठे।
समाजसेवेचा घेतला वसा,
जनमानसात उमटवला ठसा।"

**वर्धापन** दिनानिमित्त मंगलमय शुभेच्छा..!!



शुभेच्छुक :

**शनि मंदिर चौक, मित्र परिवार**

---



शुभेच्छुक :

**जिल्हा शल्य चिकित्सक**

दैनिक **अंजिक्य भारत** **वर्धापन** दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!!

---

"अक्षरांच्या दिव्यांनी, उजळली नवी पहाट,
यशाच्या शिखराकडे, अविरत आहे वाटचाल.
वर्धापन दिनाच्या शुभेच्छा, घेउनी नवी उमेद,
अजिंक्य रहा सदैव, नसो कुठलाच भेद!"

दैनिक **अंजिक्य भारत** या वृत्तपत्रास **वर्धापन** दिनानिमित्त मंगलमय शुभेच्छा..!!



शुभेच्छुक : **जिल्हा पोलिस दल**

---

"शब्दांच्या सामर्थ्याने, जिंकले प्रत्येक मन,
अजिंक्य भारतचा प्रवास, ठरला मैलाचा दगड!
सत्य आणि न्यायाची, सदैव धरली कास,
वाचकांच्या विश्वासाचा, जपला अनमोल ध्यास."



दैनिक **अंजिक्य भारत** या वृत्तपत्रास **वर्धापन** दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा..!!



शुभेच्छुक :

**अमोल गुड्डलवार**
सामाजिक कार्यकर्ता

# जिल्ह्यात मागणीप्रमाणे बियाण्यांचा तुटवडा

## कृषि विभाग दखल घेणार काय? | दुकानात जादा भावाने बियाण्यांची विक्री

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १५ :** जिल्ह्यात मागील वर्षीपेक्षा यावर्षी सोयाबीन व कापूस हे वान शेतकरी आपल्या शेतात पेरणी करीत मागत आहे. परंतु कृषि केंद्रात हे वान शेतकऱ्यांना पाहिजे त्या वानाचा तुटवडा असल्याचे सांगून कुठलेही वान शेतकऱ्यांना कृषि दुकानदार देत आहे. मागणी असलेल्या बियाण्याचा तुटवडा असल्याचे कारण सांगण्यात येत आहे. तसेच या वानाची मागणी आहे त्या वानाची बेभाव पणे विक्री होत असल्याचे चित्र सध्यास्थित जिलह्यात सुरू आहे. याकडे कृषि विभाग लक्ष देणार काय अशी मागणी शेतकऱ्यांना केली आहे.

खारपाणपट्ट्यात सर्वाधिक मागणी असलेल्या संकरीत कपाशीच्या विशिष्ठ वाणाची मागणी आता जिल्ह्याभरात वाढली आहे. गतवर्षी कर्मचाऱ्याच्या कृषी उपस्थितीत व पोलिस बंदोबस्तात बियाणे विकण्याची वेळ कृषी विभागावर आली होती. यातून यंदा काही धडा घेतल्याचे दिसत नाही, अशा परिस्थितीत यावेळी 'त्या' वाणांचा पुरवठा कमी झाल्याने तुटवडा पडण्याची शक्यता आहे.

चार दिवसात मान्सून धडाका देण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर चार दिवसांपासून पावसाची उसंत असल्याने शेतकऱ्यांद्वारा पेरणीपूर्व मशागत सुरू आहे. मागच्या हंगामात कपाशीच्या एका विशिष्ठ वाणाची मागणी जास्त होती. त्यातुलनेत कंपनीद्वारा कमी पुरवठा करण्यात आल्याने बियाणे उपलब्ध असलेल्या केंद्रात कृषी विभागाने रेशनिंग केले होते. तेथे कृषी सहायकांच्या निगराणीत व पोलिस कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत बियाणे विक्री करण्यात आली होती.





यंदादेखील 'त्या वाणाची मागणीसोबतच त्याच कंपनीच्या अन्य एक वाणाची मागणी वाढत आहे. माहितीनुसार यंदा १.२० लाख पाकिटांची मागणी कंपनीकडे नोंदविण्यात आलेली आहे. शिवाय कपाशीच्या अन्य वाणांचेही बियाणे पुरेसे उपलब्ध असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

> 'संकरीत कपाशीच्या सर्वच वाणांची उत्पादकता सारखीच आहे. शेतकऱ्यांनी विशिष्ठ वाणाचा आग्रह धरू नये, बियाण्यांसाठी कंपनी एकत्रितपणे मागणी नोंदविते, त्या वाणांच्या बियाण्यासाठी कंपनीला पत्र दिले आहे.
>
> **राहुल सातपुते,**
> **जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

### कपाशीच्या त्या बियाण्यांची जिल्हास्थिती

यंदा कपाशीच्या त्या वाणाच्या १.२० लाख पाकिटांची मागणी कंपनीकडे नोंदविली होती. त्यातुलनेत ७४,१२० पाकिटे जिल्ह्यात उपलब्ध झाली आहेत. यामध्ये अमरावतीमध्ये सर्वाधिक ३९,७६०, धामणगाव ७,८४०, दर्यापूर ११,३००, भातकुली १९८०, अंजनगाव २६४०, अचलपूर १९८०, मोर्शी २७८०, वरूड २३६० व तिवसा तालुक्यात ३४८० पाकिटांचा पुरवठा झालेला आहे.

### विशिष्ट वाणांच्या मागणीचे जिल्ह्यात विविध बेल्ट

जिल्ह्यात केवळ संकरीत कपाशीच्या त्याच वाणाची मागणी आहे, असे नव्हे तर प्रत्येक बेल्टमध्ये वेगवेगळ्या वाणांची मागणी असल्याचे एसएओ सातपुते यांनी सांगितले. वरूड, मोर्शी तालुक्यात वेगळ्याच वाणाची आहे, तर चांदूर रेल्वे, धामणगाव तालुक्यात कपाशीच्या वेगळ्या वाणाची मागणी असते.

## थोडक्यात

### नाचोना येथे ग्रामविकास अधिकाऱ्याला मारहाण

**खल्लार :** नाचोना येथे ग्रामविकास अधिकाऱ्याला घरकुलाच्या एका लाभार्थ्याने घरकुलाची फाईल तयार करण्याच्या कारणावरून मारहाण करीत शासकीय कामात अडथळा निर्माण केला. याबाबत ग्राम विकास अधिकारी आशिष जोजेराव गवई (३५, रा. साईनगर, दर्यापूर) यांनी खल्लार पोलिसात तक्रार नोंदवली. पोलिसांनी योगेश नारायण अरबट (३५, रा. नाचोना) याच्याविरुद्ध १३२, १२१(१), ३५२, ३५१(२) कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### वाळू चोरी करणाऱ्या तिघांवर गुन्हे दाखल

**ब्राह्मणवाडा थडी :** पूर्णा नदी पात्रातून बैलबंडीद्वारे वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या तिघांवर कारवाई करीत गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांनी अंदाजे २१ हजारांच्या तीन लोखंडी बैलबंड्या, व त्यातील ६ हजारांची वाळू, असे एकूण २७ हजारांचे साहित्य जप्त केले, तर अब्दुल सलीम अ. मतीन (३१), मोहम्मद सलाम मो. सलीम (२३) व मुशीर खाँ अबीब खाँ (१९) तिघेही रा. ब्राह्मणवाडा यांच्यावर ३०३(२) कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### लाखनवाडी येथून दुचाकी चोरी

**शिरजगाव कसबा :** लाखनवाडी येथील गुणवंत बाबा मंदिराच्या बाजूला असलेल्या शेडमध्ये दुचाकी उभी करून बाहेरगावी लग्नाला गेलेल्या व्यक्तीची दुचाकी अज्ञाताने चोरून नेली. तिची अंदाजे किंमत २० हजार रुपये आहे. याबाबत उमेश हिंमतराव सुरोशे (४५, रा. मार्की, ता. भातकुली) यांनी शिरजगाव कसबा पोलिसात तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध दुचाकी चोरीचा गुन्हा दाखल केला.

### रुग्णालय परिसरातून दुचाकी लंपास

**परतवाडा :** शहरातील भंसाळी हॉस्पिटलमध्ये भरती असलेल्या भावाला भेटायला गेलेल्या एकाची दुचाकी (एमएच २७-एडब्ल्यू ८७६१) अज्ञाताने चोरून नेली. याबाबत अजीज बेग मनीर बेग (५९, रा. फरमानपुरा, अचलपूर) यांनी परतवाडा पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी ३०३(२) कलमान्वये गुन्हा नोंद केला.

### मुलीचा विनयभंग; एकावर गुन्हा दाखल

**धारणी :** मुलीचा विनयभंग करणाऱ्या एकावर धारणी पोलिसांनी ७४, २२२, ८, १२ कलमान्वये गुन्हा दाखल केला. याबाबत मुलीच्या नातेवाईकांनी धारणी पोलिसात फिर्याद दिली होती.

### मुलीला फूस लावून पळविले

**चिखलदरा :** गावातच असलेल्या नातेवाईकाकडील कार्यक्रम आटोपून घरी निघालेली मुलगी परत आली नाही. पालकांनी तिचा शोध घेतला. मात्र, तिचा कुठेही ठावठिकाणा लागला नाही. दरम्यान त्याच वेळी गावातील एक युवकही बेपत्ता असल्याने पालकांनी मुलीला त्यानेच पळवून नेल्याचा संशय व्यक्त केला. याबाबत चिखलदरा पोलिसांनी राकेश गंठू जामुनकर (२०) याच्यावर १३७ (२) अन्वये गुन्हा दाखल केला.

### मजुरीच्या पैशांच्या कारणावरून मारहाण

**माहुली जहांगीर :** ट्रॅक्टर मालकाकडे असलेले मजुरीचे ५ हजार रुपये थकीत असल्याने चालक कामाला गेला नाही. त्याचा राग मनात ठेवत मालकाने ट्रॅक्टर चालकाला काठीने मारहाण करीत धमकी दिली. ही घटना धानोरा कोकाटे येथील प्रदीप काकडे यांच्या शेतात घडली. याबाबत मजुराच्या पत्नीने तक्रार नोंदवली. पोलिसांनी आकाश बंडू कोकाटे (३०) याच्याविरुध्द दुखापतीचा गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहे.

## धारणीत पुन्हा उभारली सात खांबांची वीज वाहिनी

### महावितरणच्या युद्धपातळीवरील प्रयत्नांना यश



अजिंक्य भारत | भारत वरठे

**धारणी, दि. १५ :** डाबका उपकेंद्राला वीज पुरवठा करणाऱ्या ३३ केव्ही वीज वाहिनीचे ७ खांब तुटल्याने,वाहिनी विस्कळीत होऊन ३३ केव्ही डाबका उपकेंद्राचा वीज पुरवठा खंडित झाला होता.तथापि वाहतुकीसाठी अडचण असतानाही महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी वीज खांबाचे वहन केले आणि युद्धपातळीवर काम करत अवघ्या काही तासांतच ही वाहिनी उभारून ३३ केव्ही डाबका उपकेंद्राचा वीज पुरवठा सुरू केला.

धारणी तालुक्यातील दूरस्थ भागात दिनांक १२ जून रोजी झालेल्या नैसर्गिक आपत्तींमुळे वीज वाहिन्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. मुसळधार पाऊस आणि जोरदार वादळामुळे अनेक ठिकाणी वीज खांब जमीनदोस्त झाल्यामुळे ३३ केव्ही धारणी उपकेंद्र,३३ केव्ही डाबका उपकेंद्र आणि ३३ केव्ही गोंडवाडी उपकेंद्राचा वीज पुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे या उपकेंद्र ावरून विजपपरवठा होणाऱ्या जवळपास १७० गावाचा वीज पुरवठा खंडित झाला होता.

मुख्य अभियंता यांचे संपूर्ण परिस्थितीवर लक्ष असून अधीक्षक अभियंता दिपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात आणि कार्यकारी अभियंता प्रदिप अंधारे आणि उपकार्यकारी अभियंता श्याम येनगंटीवार यांच्या पुढाकाराने वादळ थांबताच महावितरणच्या कामाला टप्प्या -टप्प्याने सुरूवात केली,पहिले ३३ केव्ही वीज वाहिन्या उभ्या केल्यात,त्यांनतर ११ केव्ही वाहिन्या आणि नंतर लघुदाब वाहिन्यावरील अडथळे दूर करत तीनही उपकेंद्राचा वीज पुरवठा सुरू केला.परंतू १२ जूनला मध्यरात्री पुन्हा झालेल्या वादळामुळे डाबका उपकेंद्राला वीज पुरवठा करणाऱ्या वीज वाहिनीचे ७ विजेचे खांब पडल्यामुळे ३३ केव्ही डाबका उपकेंद्र आणि त्यावरील ३७ गावे अंधारात गेली, दुसऱ्या दिवशी महावितरण कर्मचारी व कंत्राटदार एजन्सींच्या कर्मचाऱ्यांनी संपूर्ण दिवसभरात विजेचे खांब उभे करून ३३ केव्ही वाहिनी पुन्हा उभी केली,परंतू रात्र झाल्यामुळे त्या वाहिनीवर वीज वाहिन्या ओढण्यास अडथळे निर्माण झाल्यामुळे काल (१४ जून) ला वीज पुरवठा सुरू केला. ३३ केव्ही डाबका उपकेंद्रातून ११ सुसार्दा,११ केव्ही चेंडो आणि ११ केव्ही नारदू या तीन वाहिन्यांच्या माध्यमातून ३७ गावांना वीज पुरवठा करण्यात येतो.

### हत्तीघाट येथे क्षुल्लक कारणावरून युवकाला मारहाण

**परतवाडा :** हत्तीघाट येथे क्षुल्लक कारणावरून चौघांनी युवकाला मारहाण करीत डोक्यात दगड मारून जखमी केले. या प्रकरणी मुकेश राजू भिकार (२५) याने दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी देवा देवराव सावलकर (१९), देवराव लालमन सावलकर (४०), मलाय लालमन सावलकर (६५) व एक महिला यांच्याविरुद्ध दुखापतीचा गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास परतवाडा पोलीस ठाण्याचे ठाणेदार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस करीत आहे.

## वीज चोरट्यांवर गुन्हा दाखल

### महावितरणची कारवाई; ५६ हजारांचा दंड

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १५ :** महावितरणकडून सुरू असलेल्या विजचोरी विरोधातील मोहिमेत शहरातील बिच्छुटेकडी, वडाळी आणि अमरावती परिसरात तीन वेगवेगळ्या विजचोरीचे प्रकार उघड करण्यात आले आहेत. या तिन्ही कारवाईत तिघांनी मिळून ५६ हजार ४४३ रुपयांची विजचोरी केल्याचे निष्पन्न झाले असून, ७ जणांविरुद्ध बडनेरा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मो. अमिन मो. शफिक (रा. बिच्छुटेकडी) याने वीज खांबावर आकोडा (तार) टाकून अनधिकृतपणे ४५२ युनिट वीजेचा वापर केला. या विजेची एकूण किंमत ११ हजार ७६३ रुपये इतकी असून,



महावितरणच्या तक्रारीनंतर त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जगदेव शामराव थोरात (रा. वडाळी) याने बिनानंबरचे मीटर बसवून विजेचा वापर सुरू ठेवला होता. त्याला महावितरणकडून बिलही येत नव्हते. त्याने ९३६ युनिट वीज (१७३४० रुपये किंमतीची) चोरी केली होती. सचिन माणिकराव चव्हाण याने सुद्धा पोलवर आकोडा टाकून अनधिकृतपणे विज वापर केला. यामुळे महावितरणचे २२५६ युनिट विजेचे (३६४४० रुपये किंमतीचे) नुकसान झाले.

या तिन्ही प्रकरणांमध्ये महावितरणचे सहायक अभियंता मुकेश उमाकांत माळेगावकर (४७) यांनी बडनेरा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, एकूण सात जणांविरुद्ध गुन्हे नोंदवण्यात आले आहेत. पुढील तपास सुरू आहे.

## तुरखेड येथील शेतकऱ्यांच्या अंगावर वीज कोसळून मृत्यू

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. १५ :** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील तुरखेड येथील पवन दिपक कोल्हे वय २७ या शेतकऱ्यांच्या अंगावर वीज कोसळून मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.



मृतक शेतकरी पवन हे अल्प भूधारक असून आपल्या शेतात तुरीची लागवड करीत असताना अचानक दुपारी ४ वाजता विजेचा कडकडा सुरू झाला आणि मृतक पवन यांच्या अंगावर काळाने घाला घातला. विज कोसळल्याचे पाहुन आजू बाजूच्या शेतकऱ्यांनी मृतक पवन यांच्या कडे धाव घेतली आणि तात्काळ ग्रामीण रुग्णालय अंजनगाव सुर्जी येथे उपचारा करीता दाखल केले. परंतु डॉक्टरांनी शेतकरी पवन ला मृत घोषित करण्यात आले. पोलिसांनी ही घटनेचा पंचनामा केला आहे.मृतक पवन च्या पश्चात त्याचे आई वडील व एक लहान भाऊ असुन पवन च्या जाण्याने त्यांच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून तुरखेड गावात स्मशान शांतता पसरली आहे गावातील नागरिकांच्या मनात ही हळ हळ निर्माण झाली आहे.




## प्लास्टिक बंदी युद्ध पातळीवर – मंत्री पंकजा मुंडे

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १५ :** पर्यावरणाच्या दृष्टिकोणातून प्लास्टिक बंदी करणे अत्यंत गरजेचे आहे. प्लास्टिक मुळे पर्यावरणाला धोका निर्माण होत असून प्रत्येकाने बाजारात नेताना सोबत कापडाची पिशवी न्यावी. तसेच पिण्याचे बॉटल रस्त्यावर टाकू नये असे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी भाजप कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत सांगितले.

संकल्प ते सिद्धी हा मोदिंचा संदेश आहे. या संदेशातून देशभर लोकांना मार्गदर्शन केले जाते आहे. जनधन योजनेतून बँकिंग सेक्टरमध्ये सर्वसामान्यांना पोहोचविण्याचे काम केले आहे. उज्वला गॅस योजना चालू करून महिलांना चुलीपासून अलिप्त केले आहे. केंद्र सरकार हे गोर गरीबांचे सरकार असून अनेक योजना राबविल्या जात आहे. देश सुरक्षित असला पाहिजे या भावनेतून केंद्र व राज्य सरकार काम करीत आहे. शहरातील नाले, नाद्या तुडूंब भरल्या असून त्यामध्ये प्लास्टिक पन्नी व पाण्याचे बॉटल फे कल्या जात असल्याने पावसाळ्यात पाण्याचा प्रवाह थोपला आहे. भारत-पाकिस्तान युद्धा झाले यामध्ये मोदिंनी देशाचा सन्मान वाढविल्याचा दावा पंकजा यांनी केला.

सैनिकांनी योग्य कारवाई करून एक प्रकारे विजय मिळविला असल्याचे पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या. पत्रकार परिषदेला शहराध्यक्ष डॉ. नितिन धांडे, जिल्हाध्यक्ष रविराज देशमुखा, प्रभुदास भिलावेकर उपस्थित होते.

## पेट्रोल टाकून कार्यालयाला लावली आग

### विद्युत वितरण कार्यालयात दोन युवकांचा हैदोस

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**वलगांव, दि. १५ :** येथील विद्युत उपकेंद्रात (सब स्टेशन) सोमवारी दुपारी एक धक्कादायक घटना घडली आहे. कनिष्ठ अभियंता (ॲडिशनल) यांच्यावर पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण वलगाव परिसरात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, रविवारी रात्री रेवसा परिसरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाल्याने विद्युत पुरवठा खंडित झाला होता. यानंतर सोमवारी रेवसा येथील काही स्थानिक नागरिक वलगाव सब स्टेशन कार्यालयात तक्रार घेऊन आले होते. त्यावेळी संतप्त झालेल्या दोन युवकांनी अचानक आपल्या खिशातून पेट्रोलची बाटली काढत कनिष्ठ अभियंत्याच्या टेबलवर आणि दस्तावेजांवर पेट्रोल ओतले. इतक्यावरच न थांबता त्यांनी अभियंत्यांच्या अंगावर पेट्रोल टाकण्याचा प्रयत्न केला. या घटनेदरम्यान कार्यालयात



उपस्थित असलेल्या इतर कर्मचाऱ्यांच्याही जिवाला धोका निर्माण झाला. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे उपस्थितांनी तात्काळ प्रतिकार केला आणि मोठा अनर्थ टळला. घटनेनंतर कनिष्ठ अभियंत्यांनी वलगाव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, पोलिसांनी या दोन्ही युवकांविरोधात गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरु केला आहे. या प्रकरणामुळे एमएसईबी कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विद्युत यंत्रणेवर वारंवार होणारे असे हल्ले थांबवण्यासाठी योग्य ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी कर्मचारी संघटनांनी केली आहे.

# वार्ड क्रमांक ६ मधील नाली गायब

## अंजनगांव बारीत दुर्गंधीमुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात, स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष

अजिंक्य भारत | साहेबराव राऊत

**अंजनगाव बारी, दि. १५ :** वार्ड क्र.६ मधील शरद इंगोले याच्या घरापासून ते महादेव पुरा कडे जाणाऱ्या मुख्य नाली कित्येक दिवसापासुन पुर्णपणे खचली असुन जमीनदोस्त झाली असुन परिसरातील घरधुती व पावसाचे पाणी नालीत साचल्याने दुर्गंधी येत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात

आले आहे. मुख्य रस्त्याचे काम करून सिमेंट रोडचे पक्के बांधकाम स्थानिक प्रशासना कडून करण्यात आले पण नालीचे बांधकाम न करण्याचा विसर स्थानिक

प्रशासनाला पडला आहे. ही १९७८ पासूनच्या नालीचे काम अजूनही का झाले नाही? असा सवाल नागरीक उपस्थित करीत आहे. येथील नालीचे अवस्था पाहून ही नाली गायब झाल्याचे नागरीकांमध्ये चर्चिले जात आहे.

यासंदर्भात स्थानिक ग्राम पचांयत प्रशासनाला जाब विचारला असता नालीचे काम होईलच असे कित्येक वर्षापासुन सांगण्यात येत आहे. मात्र प्रथम प्रत्याक्षात नालीचे बांधकाम कधी पुर्ण होईल हा नागरीका समोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळें नागरीक आक्रमक झाले असुन नालीचे बांधकाम लवकरात लवकर करण्याची मागणी नागरीकाकडून करण्यात येत आहे.








> 'गावातील रस्त्याच्या कामासोबतच सार्वजनिक नाल्यांच्या कामाला स्थानिक ग्रामपचांयत प्रशासनाने सुरूवात केली पण, कित्येक वर्षापासून प्रभाग ६ मधील महत्त्वाच्या नालीचे काम का रखडले याबाबत गांभिर्याने लक्ष देण्याची गरज आहे.'
>
> **शरद इंगोले, नागरिक, अंजनगाव बारी**

## थोडक्यात

### युवकावर तीन जणांचा प्राणघातक हल्ला

**अमरावती :** फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत उत्तमनगर गार्डनजवळ फिरायला गेलेल्या युवकावर तिघांनी प्राणघातक हल्ला केला. तिन युवकांचा एकाशी वाद सुरू होता. दरम्यान तो युवक पळून गेला. तेवढ्यात जखमी युवक तेथे आला. त्यापैकी एकाने लोखंडी मुठीच्या चाकूने त्याच्या डोक्यावर वार केला. त्यात त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांनी फिर्यादीला शिविगाळ करत पुन्हा मारहाण करण्याची धमकी देत पळून गेले. या प्रकरणी प्राप्त फिर्यादीवरून पोलिसांनी मारहाण करणऱ्या तिघांविरुद्ध ३५२, ३(५) कलामानुसार गुन्हा दाखल केला.

### कारण नसतांना तिघांची युवकाला मारहाण

**अमरावती :** दुकानातून घरी जाण्यासाठी निघालेल्या विजय भागचंद कवराणी (३८, रा. विलास नगर) याला मागून दुचाकीवर ट्रिपल सिट आलेल्या तीन अनोळखी युवकांनी कारण नसताना मारहाण केली. सोबतच त्याच्या डोक्यावर दगड मारून जखमी केले. याबाबत जखमीने गाडगे नगर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी तीन अनोळखींविरुद्ध ११८(१), ३(५) अन्वये गुन्हा दाखल केला.

### चांगापूर येथे युवकावर धारदार शस्त्राने हल्ला

**अमरावती :** चांगापूर मंदिराजवळी रहिवाशी प्रवीण किसनराव धुर्वे (३१) याच्या घरी आलेल्या दोन अनोळखी व्यक्तींनी त्याच्या डोक्यावर धारदार शस्त्राने वार करीत जखमी केले. याबाबत जखमीने गाडगे नगर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### गोदाम फोडून रोकडसह साहित्याची चोरी

**अमरावती :** अकोली रेल्वे स्टेशन जवळील जयराम नगर येथे अज्ञाताने गोडाऊनमध्ये चोरी करीत १४ हजार ५०० रुपये रोख व डीव्हीडी, वायफाय राऊटर असे एकूण १८ हजारांचे साहित्य चोरून नेले. याबाबत मंगेश विश्वनाथ धर्माळे (४५, रा. प्रभू विहार) यांनी राजापेठ पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध गुन्हा दाखल केला. या घटनेचा पुढील तपास राजापेठ पोलीस करीत आहे.

### शहरात वेगवेगळ्या ठिकाणी दोन दुचाकींची चोरी

**अमरावती :** अज्ञात चोरट्यांनी नवी वस्ती, बडनेरा येथील आठवडी बाजारातून दुचाकी (एमएच २७-एडी ६७१०) अंदाजे १० हजार रुवये चोरी केली. याबाबत अंकुश रामकृष्ण ग्रेसपुंजे (३८, रा. दाभा, ता. नांदगाव खंडेश्वर) यांनी बडनेरा पोलिसात तक्रार दिली, तर दुसरी घटना पार्वती नगर नं. २ येथे घडली. चोरट्याने घरासमोरून अंदाजे ३० हजारांची दुचाकी (एमएच २७-सीआर ४१३८) चोरून नेली. याबाबत गोपाल हरिकिशन मुंदडा (४०, रा. पार्वती नगर) यांनी खोलापुरी गेट पोलिसात तक्रार नोंदवली.

### सबनीस प्लॉट येथे गाय वासराची चोरी

**अमरावती :** सबणीस प्लॉट येथील कालीमाता मंदिराजवळून अज्ञाताने एका गाईसह वासरू चोरून नेले. त्यांची अंदाजे किंमत ५५ हजार रुपये आहे. याबाबत पशु पालक प्रदीप राम निहोर (४०) यांनी राजापेठ पोलिसात तक्रार नोंदवली. पोलिसांनी अज्ञाताविरुद्ध ३०३ (२) कलमान्वये गुन्हा दाखल केला.

### राजपेठ बस स्थानकात पाकिटमारी

**अमरावती :** पत्नी यवतमाळ येथे जाणार असल्याने प्रशांत केशवराव गुल्हाने (४५, रा. वडगाव, जि. यवतमाळ) हे राजपेठ बसस्थानकावर दुचाकीने सोडण्यास आले. त्या वेळी अज्ञाताने त्यांच्या खिशातील ३० हजार रुपये चोरून नेले.

# मोबाईल टॉवरचे उत्पन्न शासनाच्या तिजोरीत

## राज्य शासनाचा नवा निर्णय : पाच ते सात कोटीने घटणार महापालिकेचे उत्पन्न

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती दि. १५ :** राज्य शासनाने नुकताच एक निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार महापालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रात उभारण्यात येणा?या मोबाईल टॉवरमधून मिळणारे परवाना शुल्क व वार्षिक महसूल थेट राज्य सरकारकडे वर्ग करावे लागणार आहे. राज्य शासनाच्या या निर्णयाचा फटका महापालिकेच्या उत्पन्नाला बसणार आहे. तर दूसरीकडे शहरात मोबाईल टॉवरची संख्या वाढण्याची शक्यता या निर्णयाने बळावली आहे.

राज्य शासनाने एक निर्णय घेतला आहे. शहरात मोबाईल टॉवरच्या माध्यमातून महापालिकेला व स्थानिक संस्थांना उत्पन्न मिळत



होते. मोबाईल कंपन्यांना टॉवर लावायचे असल्यास महापालिकेची परवानगी घेणे अनिवार्य होते. अवैध मोबाईल टॉवर लावल्यास त्या संदर्भात महापालिकेकडे तक्रार कडून त्यावर कारवाई केली जायची. महापालिका संबंधित कंपनीकडून दंड वसूल करीत होती. शहरात खासगी कंपन्याचे केबल टाकायचे असल्यास रस्त्याचे खोदकाम करावे लागते. त्यामुळे सुध्दा महापालिकेला शुल्क देणे अनिवार्य होते. मोबाईल टॉवरच्या माध्यमातून का होईना स्वराज्य संस्थांना लाखो व कोट्यवधीचा महसूल प्राप्त होत होता. या निर्णयामुळे आता तो महसूल राज्य शासनाच्या तिजोरीत जमा होणार आहे.

> यासंदर्भात बैठक झालेली आहे. त्यामध्ये शासनाने महापालिकेला किती उत्पन्न मिळत होते, किती मोबाईल टॉवर आहेत, या संदर्भात माहिती मागितली आहे. महापालिका क्षेत्रात १९९५ पासून टॉवर लावणे सुरु केले. महापालिकेला त्यापासून ६ ते ७ कोटीचे उत्पन्न मिळत होते. या संदर्भातील प्रस्ताव शासनाला तयार करुन पाठविण्यात येणार आहे.
>
> **घनश्याम वाघाडे,**
> **सहाय्यक**
> **संचालक नगररचना**

### दुर्गम भागात सेवा देण्यासाठी वापर

राज्य सरकारच्या परिपत्रकानुसार एकसंघ धोरण राबविण्यासाठी आणि टेलिकॉम सेवा सुरळीत ठेवण्यासाठी महसूल थेट सरकारकडे जमा होणे आवश्यक आहे. शहरी भागासोबत ग्रामीण व दुर्गम भागातील डिजिटलायझेशनकरिता या निधीचा वापर करण्यात येणार असल्याने हा निर्णय घेण्यात आल्याचे स्पष्ट करण्यात आले.

### महापालिकांची आर्थिक कोंडी

शासनाच्या या निर्णयाचा महापालिकांकडून तीव्र विरोध केला जात आहे. मोबाईल टॉवरमधून मिळणारे उत्पन्न महापालिकेचे असून स्थानिक विकास कामांसाठी या निधीचा वापर केला जातो. स्वराज्य संस्थांचे हे उत्पन्न थांबल्यास त्याचा परिणाम शहराच्या विकासावरसुध्दा होऊ शकतो.

### शहरात ३०० मोबाईल टॉवर अवैध

विधानसभेच्या प्रश्नत्तोरात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अमरावती महापालिकेत ३८३ मोबाईल टॉवर असून त्यापैकी ८३ मोबाईल टॉवर वैध व उर्वरित ३०० मोबाईल टॉवर अनधिकृत असल्याचे सांगितले. या टॉवरला परवानगी देण्याचे काम सुरु असल्याचे ते म्हणाले होते. ८३ मोबाईल टॉवरच्या माध्यमातून महापालिकेला १ कोटी ६५ लाखाचे शुल्क प्राप्त झाले होते तर उर्वरित ३०० मोबाईल टॉवरच्या माध्यमातून ५ कोटी १० लाख रुपये राजस्व मिळणार होते. शासनाच्या या निर्णयामुळे महापालिकेला ५ कोटीचा फटका बसला आहे.

# पीक विमा काढण्यासाठी शेतकरी संभ्रमात?

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. १५ :** महाराष्ट्र शासनाने प्रधानमंत्री फसल बीमा योजना अंतर्गत एक रुपयात पीक विमा योजना आता येत्या खरिप रब्बी२०२५ यावर्षीपासून गुंडाळली जाणार आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत नुकताच हा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या खरिपापासून अंमलबजावणी करण्याचे निर्देश २६ मार्च रोजीच्या पत्राद्वारे कृषी विभागाने आयुक्तांना दिले आहेत. शेतकऱ्यांना भरावा लागणारा त्यांचा वाटा राज्य शासनानेच भरण्याचा निर्णय दोन वर्षापूर्वी घेतला होता. मात्र, योजनेचे खरिपातील लाभार्थी दुपटीने तर रब्बीत ९ ते १० पट लाभार्थी वाढल्याने व गैरव्यवहारही वाढीस लागल्याचा दावा करीत पूर्वी प्रमाणेच शेतकऱ्यांना त्यांचा वाटा भरून योजनेत सहभागी करून घ्यावे, असा निर्णय घेण्यात आला आहे. विशिष्ट धोक्यासाठी ही प्रमानके (ट्रिगर) शासनाने वगळले.

> राज्य व केंद्र शासनाने खरीप व रब्बी पिक विमा योजना ही हवामाना आधारित फळ पिक विमा योजनेवर आधारित राबवावी. त्यासाठी मी स्वत: महाराष्ट्र पीक विमा योजनेच्या बैठकीमध्ये ही प्रश्न मांडले होते. पण नंतर यामधील चार निकष काढून शेतकऱ्यांना या विमा योजनेचा खरोखर फायदा होईल का हा प्रश्न चिंतेचा विषय आहे. यावषी शेतकरी ही चार ट्रिगर वगळल्यामुळे सहभागी होईल का?
>
> **पुष्पक श्रीरामजी खापरे**
> **जिल्हाधीकारी पीक विमा समिती शेतकरी प्रतिनिधी अमरावती.**



प्रधानमंत्री पीक विमा योजनेत केवळ पीक कापणी प्रयोगावर आधारित भरपाई मिळते. प्रतिकूल हवामान घटकामुळे पेरणी न होणे, हंगामातील प्रतिकूल परिस्थितीत झालेले नुकसान, काढणीपश्चात नुकसान, स्थानिक नैसर्गिक आपत्ती, या या बाबींचा समावेश होता.

मात्र या नवीण योजनेत केवळ कापणी प्रयोगाआधारित रक्कम मिळणार आहे. यामध्ये विमा कंपनीच्या कार्यपद्धतीबाबत अनेक तक्रारी मागी निघाल्या नाही. एक रुपयात विमा संरक्षण दिल्याने शासकीय, देवस्थानच्या जमिनीवरही विमा भरून गैरव्यवहार झाल्यामुळे प्रामाणिक शेतकऱ्यांना याचा नुकसानीचा सामना करावा लागणार आहे. शेतकऱ्यांना रक्कम वाढल्यामुळे शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम १ रूपया ऐवजी केंद्र शासनाने निर्धारित केल्याप्रमाणे खरीप, रब्बी आणि नगदी हंगामातील पिकांना अनुक्रमे २ टक्के, १.५% टक्के व ५ टक्के असा निर्धारित केलेला नियमित विमा हप्ता दर शेतकऱ्यांसाठी ठेवावाअसा शासन निर्णय घेण्यात आला आहे.

### असाही आगळा-वेगळा एक विवाह सोहळा

# महसूल विभाग व पत्रकारांनी पार पाडला दोन दिव्यांगाचा विवाह सोहळा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, दि. १५-** ऐरवी अनेक विवाह सोहळे आपल्या आजूबाजुला होत असतात त्यात आपण सहभागी होत असतो.परंतू दोन्ही डोळ्यांची दृष्टी गेलेल्या आणि दोन परस्पर जातीचे परंतू शिक्षित असलेल्या दिव्यांगाच्या विवाह सोहळ्याला तालूक्यातील महसुल विभाग आणि पत्रकार, नातेवाईक म्हणुन लग्न सोहळा पार पाडण्यासाठी धावत आल्याचा अनूभव तालूक्यातील शेकडो नागरिकांनी बघितला आणि त्या दिव्यांग जोडप्यास भरभरुन आशिर्वाद दिले.

सविस्तर वृत्त असे की दर्यापुर तालूक्यातील दारापुर या गावातील निवृत्ती वानखडे व अंजनगाव सुजी तालूक्यातील गाडगेबांबाचे जन्मगाव असलेल्या शेंडगाव येथील संगिता सोळंके हे जन्मापासूनच दोन्ही डोळ्यांनी दिव्याग आहेत.निवृत्तीने परिस्थितीवर मात करीत उच्च शिक्षण घेतले तर संगीता ने सुद्धा १२ वीपर्यतचे शिक्षण पुर्ण केले आहे.या दोघाचेही लग्न झाले



पाहीजे यासाठी अंजनगाव सुजी येथीलच एक दिव्यांग पुंजाराम यांनी पत्रकार पींजरकर यांना सांगीतले अशोक पींजरकर हे तालूक्यातील दिव्यांगासाठी नेहमी झटत असताता हे विषेश .त्यांनी दोन्ही कुटूंबासोबत सपर्क साधून दोघांचाही विवाह घडवून आणण्याचे मनात ठरवले परंतू हा विवाह सोहळा आगळा वेगळा व्हावा आणि समाजाने यातून आदर्श घ्यावा यासाठी सर्वप्रथम अंजनगाव सुजी येथील तहसीलदार पुष्पा सोळंके(डाबेराव) आणि तालूक्यातील पत्रकार यांचेशी चर्चा केली.तहसीलदार अंजनगाव यांनी ह्या संपुर्ण विवाह सोहळ्याची जबाबदारी स्विकारली आणि दिवस ठरला १३ जून.दोन तीन दिवस अगोदरच लगीनघाई सुरु झाली महसुल कर्मचारी कार्यालय संपल्यानंतर लग्नाच्या कामला लागायचे तर ईकडे पत्रकार सुद्धा लग्नात काही कमी पडू नये आणि लग्नाला तालूक्यातील सर्व मान्यवरांनी उपस्थित राहावे यासाठी धावपळ करु लागले.जिल्ह्यातील सर्व वरिष्ठ आधिकाऱ्यांना लग्नसोहळ्याचे निमत्रण दिल्या गेले.सोबतच माजी लेडी गव्हर्नर कमलताई गवई यांना सुद्धा विषेश अतीथी म्हणुन निमत्रण दिले.दि १२ ला जिजाऊ ब्रिगेड अंजनगाव सुर्जीच्या महिलांनी निवृत्ती आणि संगिता या दोन्ही दिव्यांगाच्या हळदिचा कार्यक्रम अतिशय उत्साहात पार पाडला.तर लग्नाच्या दिवशी नवरदेव नवरीच्या तयारी करण्याची सपुर्ण जबाबदारीही घेतली.लग्नाच्या दिवशी दि. १३ ला महसुल कर्मचारी, पत्रकार, जिजाऊ ब्रिगेडच्या महीला आणि तालूक्यातील समाजसेवेचे भान असलेली मंडळी घरचे लग्न असल्याप्रमाणे धावपळ करित होती. आणि तालूक्यातील मान्यवरांच्या डोळ्यासमोर या दोन्ही जन्मजात दृष्टी नसलेल्या दिव्यांगाचा सोहळा अंतीशय उत्साहात पार पडला.यावेळी या विवाह सोहळ्याला कमलताई गवई, आ. गजानन लवटे,माजी आमदार रमेश बुंदिले,तहसीलदार पुष्पा सोळके, उपविभागीय पोलीस अधीकारी गायकवाड, गटशिक्षणाधीकारी सुधीर खोडे, प्रा.प्रेमकुमार बोके,सप्रखंजेरीवादक सदिपपाल महाराज, रामपाल महाराज, प्रवीण पेटकर प्रामुख्याने उपस्थित होते.तर या आयोजनासाठी तालूक्यातील सर्व पत्रकार, तहसील कार्यालयाचे सर्व कर्मचारी,जीजाऊ ब्रीगेडच्या महीला यांनी परिश्रम घेतले.आणि हा विवाह सोहळा पार पडला.

# भारत कृषक समाज तालुकाध्यक्षपदी प्रा. गजानन भारसाकळे

## दर्यापूर येथे अधिवेशन आयोजनाची तयारी

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. १५ :** भारताचे पहिले कृषी मंत्री तथा शिक्षण महर्षि डॉ पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांनी देशात स्थापन केलेल्या भारत कृषक समाज या राष्ट्रीय संस्थेच्या दर्यापूर तालुका अध्यक्षपदी स्थानिक गाडगेबाबा मंडळाचे अध्यक्ष प्रा. गजानन भारसाकळे यांची निवड करण्यात आली आहे . महाराष्ट्र राज्यातील अमरावती जिल्हा भारत कृषक समाज संस्थेचे जिल्हाध्यक्ष प्राचार्य भैय्यासाहेब मेटकर यांनी ही नियुक्ति केली असून दर्यापूर तालुक्यातील संपूर्ण गावांमध्ये या संस्थेच्या शाखा स्थापन करण्याचे निर्देश या नियुक्ती पत्रात देण्यात आलेले आहेत . दर्यापूर हा तालुका अमरावती जिल्ह्यामध्ये जवळपास सर्वच क्षेत्रात अग्रेसर असल्याने या ठिकाणी भारत कृषक समाजाचे राज्यस्तरीय अधिवेशन संपन्न व्हावे असा मानस जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब मेटकर यांनी व्यक्त केला असल्याने दर्यापूर शाखेवर फार मोठ्या जबाबदारीचे संकेत



प्रात झाले आहेत . लवकरच प्रा. भारसाकळे हे या शाखेची तालुका कार्यकारिणी जाहीर करणार असून या मध्ये तालुक्यातील प्रत्येक जिल्हापरिषद सर्कल मधील किमान दोन सदस्यांना प्रतिनिधित्व प्राप्त होणार आहे . ही कार्यकारिणी जिल्हाध्यक्ष भैय्यासाहेब मेटकर यांची अमरावती येथे भेट घेऊन शाखेच्या वार्षिक कार्यक्रम नियोजना बाबत सविस्तर चर्चा करणार असल्याचे प्रा. भारसाकळे यांनी आमच्या वृत्त पत्राच्या स्थानिक प्रतिनिधीला कळविले आहे . या गौरवशाली नियुक्ती बाबत स्थानिक गाडगेबाबा मंडळाचे अध्यक्ष प्रा. गजानन भारसाकळे यांच्यावर सर्व स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

### दोन विवाहितांचा सासरच्यांकडून छळ

**अमरावती :** सासरच्यांकडून विवाहितांचा छळ होत असल्याच्या दोन गुन्ह्यांची नोंद फ्रेजरपुरा व राजापेठ पोलिसात करण्यात आली. याबाबत दस्तुर नगर येथील जयंता कॉलनी येथील रहिवाशी गंगाधर हिंमतराव लोंधे याच्याविरुद्ध फ्रेजरपुरा, तर चारित्र्यावर संशय घेवून विहितेला घरातून बाहेर काढणाऱ्या गोपाल सोपाजी इंगळे (२९) यांच्याहस तीन पुरुष व तीन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

# कोळी समाजाला एसटीचे प्रमाणपत्र द्या

## मुख्यमंत्र्यांना संघटनेचे निवेदन

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि.१५ :** जुन रोजी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अकोला जिल्हाचे दौऱ्यावर आले असता त्यांना क्रिकेट क्लबस्थित सभास्थळी कोळी महादेव पदाधिकारी या जमातीचे नेते उमेश ढोणे यांचे नेतृत्वात युवा स्वाभिमान पाटीचे वत्तीने विभागीय आयुक्त अमरावती अंतर्गत येणाऱ्या अमरावती, अकोला , बुलढाणा, यवतमाळ व वाशीम या पाच जिल्ह्यातील कोळी महादेव



जमातीला एस.टी. चे प्रमाणपत्र देण्यात यावे. या संबंधाने मागणीचे निवेदन दिले. या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी आदेश देण्यात यावे कोळी महादेव शिष्टमंडळाचे कडून उमेश ढोणे, अकोला येथील विनायक भगत, राम लोखंडे, अमरावती येथील अनिल पुणकर, नगराध्यक्ष योगिता राजू कोलटेके, रुपेश कळसकर, राजू चुंनकीकर, शंकर डोंगरे , गोपाळ ढोणे, गोपाळ सपकाळ , वंदना जामनेकर आर्दीनी मागणीचे निवेदन मुख्यमंत्र्यांनकडे सोपवले असता. नागपूर येथे बैठक आयोजित करण्यात येईल असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांना दिले.

### अवैधरित्या वीज चोरी करणाऱ्यावर गुन्हा दाखल

**अमरावती :** अवैधरित्या आकोडा टाकून वीज चोरी करताना महावितरणच्या अधिकाऱ्यांनी जुनी वस्ती येथे एकावर कारवाई केली. त्याच्याविरुद्ध बडनेरा पोलिसात तक्रार नोंदवली. पोलिसांनी शेख अन्वर शेख नुरा (५३) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणी पोलिस तपास करीत आहे.

### रहदारीला अडथळा; एकावर गुन्हा दाखल

**अमरावती :** रस्त्याच्या मधोमध ऑटो (एमएच २७-बीडब्ल्यू ७८२४) उभा करणाऱ्या चालकावर बडनेरा पोलिसांनी गुन्हा दालख केला. त्याच्या या कृत्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण झाला होता. शेखा सलीम शेख एजाज (२७) असे गुन्हा दाखल झालेल्या ऑटो चालकाचे नाव आहे. पोलिसांनी चालकाविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढिल तपास पोलिस ठाण्याचे ठाणेदाराच्या मार्गदर्शनात पोलिस करीत आहेण

# गरजू शेतकऱ्यांना सोयाबीन बियाण्यांचा मदतीचा हात

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**वलगाव, दि. १५ -** नया अकोला येथो राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री प्रकाश साबळे तसेच Helping hand गुप अमरावती च्या प्रयत्नातून ७ गरजू शेतकऱ्यांना महाबीज सोयाबीन बियाण्याच्या बॅगा प्रदान करण्यात आल्या. यामध्ये पूजदा येथील शेतकरी गणवीर, नांदुरा येथील विलास घुरडे, थुगाव येथील रामकृष्ण मेटांगे, जयवंत छापाणी,





नथुजी सोनटक्के, नामदेवराव ठाकरे, रामकृष्ण अंभोरे ह्या गरजू शेतकऱ्यांना बियाण्याची मदत करण्यात आली. राजीव गांधी कृषी विज्ञान प्रतिष्ठान त्यांच्या शेताच्या बांधावर जाऊन अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांची संवाद साधून त्यांना सर्वतोपरी मदत करण्याची भूमिका गेल्या किती वर्षापासून राबवित असल्याबाबतचे मत प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री प्रकाश साबळे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी श्री ज्ञानेश्वर टिपरे, अक्षय साबळे, सौरभ विघे, तुषार भोकरे , ऋतिक चौधरी, यश रुद्रकार आदी मंडळी उपस्थित होती.

# अमरावती-मुंबई विमान पुन्हा रद्द; प्रवाशांमध्ये संताप

### बहुप्रतीक्षेनंतर सुरू झालेली सेवा ठप्प

**अमरावती, दि. १५ -** तब्बल २ दशकांच्या प्रतिक्षेनंतर सुरू झालेली अमरावती-मुंबई-अमरावती विमानसेवा सध्या प्रवाशांसाठी निराशेचे कारण ठरत आहे. शुक्रवारी (दि.१३) ही सेवा कोणतेही ठोस कारण नसताना पुन्हा एकदा दोन्ही बाजूंनी (अप-डाउन) रद्द करण्यात आली. हे मागील काही दिवसांतील तिसरी वेळ असून, प्रत्येकवेळी प्रवाशांना केवळ एक एसएमएस पाठवून





अनपेक्षित धक्का दिला जात आहे. त्यामुळे प्रवाशांमध्ये संतापाची लाट असून, 'हे आमच्या भावना आणि अपेक्षांशी थट्टा नाही का?' असा सवाल विचारला जात आहे. जेव्हा अमरावती विमानतळावर प्रथमच विमानसेवा सुरू झाली, तेव्हा तिला ऐतिहासिक उपलब्धी असे गौरविल्या गेले होते. मात्र, आता ही उपलब्धी केवळ दिखावा ठरत असल्याचे चित्र आहे. यापूवी इंधन टैंकर चिखलात अडकल्यामुळे विमानसेवा बंद राहिली. नाईट लँडिंगची सुविधा उपलब्ध नाही आणि आता वारंवार होणारे रद्दीकरण, या सर्व गोष्टी प्रशासन व एअरलाइन्सच्या सेवेबाबतची असंवेदनशीलता दर्शवितात. सध्या आठवड्यात फक्त सोमवार, बुधवार आणि शुक्रवार असे तीनच दिवस विमानसेवा उपलब्ध असताना देखील अशी अनागोंदी होत असल्याने ही सेवा केवळ फोटोसेशन आणि उद्घाटन भाषणापुरती मर्यादित होती का? असा प्रश्न नागरिक विचारू लागले आहेत.

या वारंवार रद्द होणाऱ्या फ्लाइट्समुळे व्यापारी, विद्यार्थी, रुग्ण आणि इतर प्रवाशांना मोठा आर्थिक तोटा व मानसिक तणाव सहन करावा लागत आहे.

### ही बाब महत्वाची नसल्याचे अधिकाऱ्यांचे मत

या रद्द करण्यामागे हवामानासंबंधी कोणतेही कारण नव्हते. अमरावतीकडे येणाऱ्या विमानाचे आगमन वेळेत न झाल्यामुळे (डिले झाल्यामुळे) शुक्रवारची फ्लाइट रद्द करण्यात आल्याचे अमरावती विमानतळाच्या एका अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच ही बाब काही फार महत्वाची नाही. जेथे एअरपोर्ट असते तेथे अशी विमाने रद्द होतच असतात. त्यात नाविन्य काही नाही. असेही एका अधिकाऱ्यांनी सांगितले. मात्र, अमरावती शहरापासून १२ ते १५ किमी अंतरावर असलेल्या विमानतळावरून परत येणे यामध्ये प्रवाशांना होत असलेला मनस्तापही या संबंधित अधिकाऱ्यांनी लक्षात घेणे महत्वाचे असल्याचे प्रवाशी नागरिकांनी सांगितले.


### जाहिरनामा

सर्व संबंधित उमेदवारांना सुचित करण्यात येते की, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), (अवप्र) लाभक्षेत्र क्र. २, अमरावती या कार्यालयातील स्थानिक डाक, अभिलेख कक्षाचे रेकॉर्ड पाहणे, त्याची देखभाल करणे व आवश्यक त्यावेळी अभिलेख कक्षामधील नस्तीचे व्यवस्थापन व उपलब्ध करुन देणेकरीता आणि झेरॉक्स मशीन हाताळणे याकरीता कंत्राटी सहाय्यक (भूसंपादन) या पदाला मा. जिल्हाधिकारी अमरावती यांनी मान्यता दिली असल्याने कंत्राटी सहाय्यक (भूसंपादन) पदाकरीता खालीलप्रमाणे दिनांक २५/०६/२०२५ रोजी वेळ सायं. ६.१५ वाजेपर्यत उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), (अवप्र) लाभक्षेत्र क्र. २, अमरावती या पत्त्यावर अर्ज मुदतीच्या आत अर्जदाराने व्यक्तीशः सादर करावा, विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी. कंत्राटी सहाय्यक (भूसंपादन) पदाकरीता उमेदवार खालील अटीस पात्र असावा. १) उमेदवार किमान पदवीधर असावा. २) उमेदवाराला संगणक हाताळण्याचे ज्ञान असावे. ३) उमेदवार शारिरीक दृष्ट्या सदृढ असावा. ४) उमेदवार भूसंपादन कायद्याचे ज्ञान असल्यास प्राधान्य देण्यात येईल. ५) उमेदवाराला शासकीय काम करण्याचा आणि टंकलेखनाचे ज्ञान असल्यास प्राधान्य देण्यात येईल. ६) उमेदवार अमरावती तालुक्यातील रहिवासी असावा.

**(प्रसन्नजित चव्हाण)**
**उपजिल्हाधिकारी, (भूसंपादन)**
**(अ.व.प्र.) लाभक्षेत्र क्र. २ अमरावती**

अजिंक्य भारत

आपलं यवतमाळ

सोमवार, दि. १६ जून २०२५





## मल्लखांबची प्रात्यक्षिके...

यवतमाळ : येथील नेहरू स्टेडियमवर जागतिक मलखांबदिनानिमित्त प्रात्यक्षिकांचा कार्यक्रम घेतला. यावेळी मल्लखांबपटू लाकडी मलखांब, लटकता मलखांब व दोरीवरील मलखांब याविषयीचे शारीरिक प्रात्यक्षिके मुला मुलींनी करून दाखविले. याकरिता मल्लखांबचे ज्येष्ठ प्रशिक्षक संजय सातारकर व प्रशिक्षक किशन प्रजापती यांनी पुढाकार घेतला. याप्रसंगी मान्यवरांची उपस्थिती होती. प्रात्यक्षिके सादर करताना मल्लखांबपटू.

# हेलिकॉप्टर अपघातात वणीतील एकाच कुटुंबातील तिघांचा मृत्यू

## केदारनाथ येथे दुर्घटना; जयस्वाल कुटुंबावर काळाचा घाला, देशभरात हळहळ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि.१५:** वणी येथील व्यावसायिक राजकुमार जयस्वाल (४१), त्यांची पत्नी श्रद्धा राजकुमार जयस्वाल (३६) आणि त्यांची दोन वर्षांची मुलगी काशी जयस्वाल यांचा उत्तराखंडमध्ये रविवारी पहाटे साडेपाच वाजतादरम्यान हेलिकॉप्टर अपघातात मृत्यू झाला. हे कुटुंब देवदर्शनासाठी उत्तराखंडमधील केदारनाथ येथे गेले होते.



केदारनाथांचे दर्शन करून परतणाऱ्या भाविकांसाठी रविवार, दि. १५ जूनचा दिवस काळरात्र ठरला. सकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास केदारनाथहून गुप्तकाशीकडे निघालेले आर्यन एव्हिएशनचे हेलिकॉप्टर रुद्रप्रयाग जिल्ह्यातील उखीमठ तालुक्यातील गौरीकुंड परिसरात कोसळून दुर्घटनाग्रस्त झाले. या भीषण अपघातात यवतमाळ जिल्ह्यातील वणी येथील एकाच कुटुंबातील तिघांसह एकूण सात जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. त्यात वणी येथील राजकुमार सुरेश जयस्वाल (वय ४१), त्यांची पत्नी श्रद्धा राजकुमार जयस्वाल (वय ३५) आणि त्यांची दोन वर्षांची चिमुकली काशी राजकुमार जयस्वाल यांचा समावेश आहे. केदारनाथचे दर्शन घेतल्यानंतर ते गुप्तकाशीकडे परतत असताना ही भीषण दुर्घटना घडली. या अपघातात अन्य चौघांचाही मृत्यू झाला असून, त्यात पायलट कॅप्टन राजबीर सिंग चौहान (जयपूर), बीकेटीसीचे विक्रम रावत (रा. रासी, उखीमठ), विनोद देवी (वय ६६, उत्तर प्रदेश) आणि तृष्टी सिंह (वय १९, उत्तर प्रदेश) यांचा समावेश आहे. या घटनेने देशभरात हळहळ व्यक्त होत आहे. अपघाताचे मुख्य कारण खराब हवामान असल्याचे समोर येत आहे. गौरीकुंड-सोनप्रयाग परिसरात दाट धुके आणि अवकाळी पावसामुळे दृश्यमानता कमी झाली होती. यामुळे हेलिकॉप्टर नियंत्रण गमावून कोसळल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. राजकुमार आणि त्यांच्या कुटुंबाचा या अपघातात मृत्यू झाल्याचे कळताच वणीसह जिल्ह्यात शोककळा पसरली आहे. वणीमध्ये राजकुमार जयस्वाल हे कोळसा व्यावसायिक, ट्रान्सपोर्टर आणि शिवभक्त म्हणून ओळखले जात होते. वणीमध्ये प्रदीप मिश्रा यांचा शिवपुराण कार्यक्रम घडवून आणण्याचे श्रेय राजकुमार जयस्वाल आणि त्यांची पत्नी श्रद्धा यांना मिळाले होते. त्यांनी कमी वयात एक उत्कृष्ट व्यावसायिक म्हणून वणी परिसरात आपली ओळख निर्माण केली होती. त्यांच्या पश्चात दोन मुले, आई, बहिणी, जावई असा मोठा परिवार आहे. ते परिसरात अत्यंत धार्मिक व्यक्ती म्हणून ओळखले जात होते. दुर्घटना घडल्यानंतर प्रशासनाने तत्काळ शोध आणि बचावकार्य सुरू केले. एनडीआरएफ, एसडीआरएफ, डीडीआरएफ, तसेच स्थानिक पोलिस आणि आपत्ती व्यवस्थापन पथके घटनास्थळी दाखल झाली आहेत.

> **'उत्तराखंडमधील केदारनाथ येथे सकाळी झालेल्या हेलिकॉप्टर अपघातात यवतमाळ जिल्ह्यातील वणी तालुक्यातील राजकुमार जयस्वाल, त्यांची पत्नी श्रद्धा जयस्वाल आणि मुलगी काशी जयस्वाल यांचे दुर्दैवी निधन झाले. केदारनाथच्या दर्शनासाठी गेलेल्या या कुटुंबावर काळाने घाला घातला, ही घटना अत्यंत दुःखद आणि अंतःकरण हेलावून टाकणारी आहे. या दुःखद प्रसंगी, जयस्वाल कुटुंबाच्या आणि त्यांच्या आप्तस्वकीयांच्या दुःखात मी सहभागी आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.'**
>
> **-संजय राठोड, पालकमंत्री, यवतमाळ जिल्हा.**

# काँग्रेसची १७ जून रोजी महत्त्वपूर्ण आढावा बैठक

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे नियोजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१५:** जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि नगरपरिषद निवडणुका काही महिन्यांवर आल्याने भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने तयारीला सुरुवात केली आहे. या पार्श्वभूमीवर मंगळवार, दि.१७ जून रोजी दुपारी १२ वाजता यवतमाळ शहरातील सेलिब्रेशन हॉल, मेडिकल चौक येथे एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीत यवतमाळ विधानसभा मतदारसंघासह शहर व ग्रामीण भागातील काँग्रेस पक्षाचे सर्व आजी-माजी पदाधिकारी, आघाड्यांमधील पदाधिकारी, युवक काँग्रेस, महिला काँग्रेस, एनएसयुआय, सेवा दल, इतर घटक संघटनांचे जबाबदार प्रतिनिधी आणि निष्ठावान कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. नगरपरिषदच्या निवडणुकीसाठी ही उमेदवारांची चाचपणी असून, यासाठी शहरातील कट्टर काँग्रेसी कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, तसेच निवडणूक लढविणा-या उमेदवारांनी आलेल्या अर्जावर आपले संपूर्ण नाव लिहावे.

या बैठकीला खासदार प्रतिभा धानोरकर, माणिकराव ठाकरे (माजी मंत्री), शिवाजीराव मोघे (माजी मंत्री), वसंतराव पुरके (माजी मंत्री), कीर्ती बाबू गांधी (माजी आमदार), वामनराव कासावार (माजी आमदार), प्रफुल्ल मानकर (जिल्हाध्यक्ष, जिल्हा काँग्रेस कमिटी), संजय ठाकरे (प्रदेश अध्यक्ष, रा.प. राज्य संघटना), मनीष पाटील (अध्यक्ष, यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक), प्रकाश जानकर (प्रदेश सरचिटणीस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी, ओबीसी विभाग) आणि प्रमोद बगाडे (जिल्हाध्यक्ष, युवक काँग्रेस) यांची उपस्थिती राहणार आहे. सर्व काँग्रेस आजी-माजी कार्यकर्ते तसेच पदाधिकाऱ्यांनी वेळेत या बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन आमदार बाळासाहेब मांगुळकर, प्रा. डॉ. बबलू उर्फ अनिल देशमुख (अध्यक्ष, शहर काँग्रेस कमिटी), रवी ढोक (सभापती, कृषी उत्पन्न बाजार समिती), रमेश भिसनकर (अध्यक्ष, तालुका काँग्रेस कमिटी) आणि विकी राऊत (अध्यक्ष, विधानसभा युवक काँग्रेस) यांनी केले आहे.

## थोडक्यात

### दारूसाठी पैसे न दिल्याने मारहाण

**दिग्रस :** दारू पिण्याकरीता पैसे न दिल्याने मारहाण केली. याप्रकरणी दारू पिण्याकरीता पैसे न दिल्याच्या कारणावरून वाद करून फिर्यादीस शिविगाळ करून लाथाबुक्याने मारहाण केली व फिर्यादीचे गळ्यातील शेल्याने आरोपीने ओढतान केल्याने फिर्यादीस गळ्याला वळ उमटले तसेच मारहाण केल्याने फिर्यादीच्या डोक्याला, ओठाला व दाढीवर मार लागला व जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी बाबुलाल लालसिंग आडे यांच्या तक्रारीवरून निलेश विष्णु राठोड गुन्हा नोंद केला.

### रॉडने हल्ला

**आर्णी :** लोखंडी रॉडने हल्ला केल्याची घटना घडली. याप्रकरणी आरोपीने गैरकायद्याची मंडळी जमा करून तु आमच्या मुलांना भुईमुंगाच्या शेंगा फेकफाक करीत असता का टोकले या कारणावरून वाद करून घरात घुसुन ओढत आणुन शिविगाळ करून लोखंडी रॉडने मारहाण केली. याप्रकरणी इंदल तुकाराम आडे यांच्या तक्रारीवरून वसंता चव्हाण, गणेश चव्हाण, महेंद्र चव्हाण, लक्ष्मण चव्हाण, कृष्णा चव्हाण, शिशुपाल राठोड, मंदा राठोड यांच्या विरूध्द गुन्हा नोंद केला.

### जखमीचा मृत्यू

**पुसद :** अपघातातील जखमीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याप्रकरणी विनायक भीमराव सुरोशे (६०) हे शेतात दुचाकी क्र. एम.एच. २९ ए.वाय. १४५० ने जात असतांना आरोपी ट्रॅक्टर क्र. एम.एच. २९ बी.व्ही. ३३९२ च्या चालकाने वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन वाहनाला धडक दिल्याने फिर्यादीच्या वडीलांचा गंभिर जखमी होवून मृत्यू झाला. याप्रकरणी मधुर विनायक सुरोशे यांच्या तक्रारीवरून ट्रॅक्टर क्र. एम.एच. २९ बी. व्ही. ३३९२ च्या चालकाविरूध्द गुन्हा नोंद केला.

### मोबाईल लंपास

**यवतमाळ :** घरी आलेल्या पाहुण्यांनी मोबाईलवर डल्ला मारल्याची घटना घडली. याप्रकरणी सविस्तर वृत्त असे कि, कार्यक्रमाकरीता आलेल्या पाहुण्यांना घरी चहा पिण्याकरीता बोलावले असता त्यांनी गॅलक्सी ए ०५ एस कंपनीचा मोबाईल किंमत ४५०० रूपयाचा घरातील कपाटावरून चोरून नेला. ही घटना ८ जुन रोजी घडली. याप्रकरणी सौ. अनीता शंकरराव बोरकर यांच्या तक्रारीरून सुनिल येलनकर, अजय पारसेकर, संदीप विरूध्द कलम ३०३ (२) नुसार गुन्हा नोंद केला.

### झिंगे चोरी

**दिग्रस :** डॅम्पवरून झिंगे चोरी केल्याची घटना घडली. याप्रकरणी अरूणावती डॅम्पवरून ३० किलो झींगे किंमत ४५००० रूपयाचे चोरी करून घेवुन जात असतांना मिळून आल्याने तक्रार दाखल करण्यात आली. ही घटना १४ जुन रोजी घडली. याप्रकरणी उमेश सुधाकर भगत यांच्या तक्रारीवरून शंकर नारायण बावणे विरूध्द गुन्हा नोंद

# स्टेट बँक ऑफ इंडियातर्फे शेतकरी सन्मान सोहळा



दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**म्हसोला, दि.१५:** स्टेट बँक ऑफ इंडिया, जवळा शाखेतर्फे म्हसोबा कानोबा येथे नियमित पीककर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला. बँकेचे क्षेत्रीय प्रबंधक प्रशांत एकुडे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन शेतकऱ्यांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला एसबीआय जवळा शाखेचे व्यवस्थापक स्वप्नील फटाले, गावच्या सरपंच मंदा भागवत, उपसरपंच राहुल माळोदे, ज्येष्ठ नागरिक राजन भागवत, गावातील शेतकरी आणि बचत गटातील महिला उपस्थित होत्या. यावेळी एसबीआय जवळा शाखेतर्फे सर्व शेतकरी व कास्तकार यांना बँकेच्या विविध योजनांबद्दल माहिती देण्यात आली. बँकेचे कर्ज नियमित भरल्यास होणाऱ्या फायद्यांबद्दल मार्गदर्शन करण्यात आले. दुपारच्या भोजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# खूनातील आरोपीस पोलिस कोठडी

**यवतमाळ, दि. १५ :** वडगाव जंगल पोलिस स्टेशन हद्दीतील आकपुरी येथे शेतात काटे टाकण्यावरून झालेल्या वादामुळे एका शेतकऱ्याचा खून झाल्याची घटना घडली होती. या प्रकरणात अटक केलेल्या आरोपीला पोलिसांनी रविवारी, (दि. १५) न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. आकपुरी शिवारातील शेतात रस्त्यावर आरोपीने काटे टाकल्याने हा वाद निर्माण झाला. मृतक सुधाकर महादेव बोटरे (वय ४५, रा. धानोरा) आणि आरोपी रमेश शामराव कुळसंगे (वय ४०, रा. गणेशपूर) यांच्यात अचानक वाद झाला. रागाच्या भरात रमेश कुळसंगेने हातातील कुऱ्हाडीच्या लोखंडी बाजूने सुधाकर बोटरे यांच्या छातीवर आणि पाठीवर मारून गंभीर जखमी केले. दरम्यान, त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.

# आरोग्य संकल्प अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त शिबिर; २ हजार ३०० रुग्णांनी घेतला लाभ

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि.१५:** राज्याचे मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त रविवार, १५ जून रोजी सकाळी १० वाजल्यापासून दिग्रस येथील दिनबाई विद्यालयात 'माँ आरोग्य सेवा समिती यवतमाळ' द्वारे आरोग्य संकल्प अभियान शिबिर आयोजित करण्यात आले. यात दत्ता मेघे उच्च शिक्षण व संशोधन संस्था संचलित, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) यांच्या संयुक्त विद्यमाने उपचार व सुविधांसह मोफत रोगनिदान, शस्त्रक्रिया, उपचार आणि मोफत औषधी वाटप करण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून, जवळपास २ हजार ३०० रुग्णांनी याचा लाभ घेतला.



या मोफत रोगनिदान, शस्त्रक्रिया, उपचार व औषधी वाटप आरोग्य संकल्प अभियान शिबिरात मेडिसीन तज्ज्ञ, हृदय रोग तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, सर्जरी तज्ज्ञ, स्त्रीरोग, अस्थिरोग, त्वचारोग, बालरोग, कान-नाक-घसा, श्वसन रोग, मानसिक रोग तज्ज्ञ, न्यूरो सर्जन तज्ज्ञ, दंत व मुखरोग, युरो (किडनी), कर्करोग तज्ज्ञ आदी शरीरातील विविध आजारांच्या सर्व तज्ज्ञ डॉक्टरांनी विविध आजारांची मोफत तपासणी व उपचार करून औषधी वाटप केले. रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांच्या भोजनाची व थंडगार पाण्याची व्यवस्था शिबिरस्थळी करण्यात आली होती. दोन हजार ३०० रुग्णांच्या तपासणीनंतर पुढील उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांना संपर्क साधून, त्यांना तारीख देऊन टप्प्याटप्प्याने दत्ता मेघे आयुर्विज्ञान संस्था संचलित, आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालय, सावंगी (मेघे) येथे पुढील उपचारांसाठी पाठवले जाणार आहे. विशेष बाब म्हणजे रुग्ण व त्यांच्यासोबतच्या एका नातेवाईकाची येण्या-जाण्याची, भोजन व राहण्याची व्यवस्था आयोजकांतर्फे मोफत करण्यात येणार आहे. आरोग्य संकल्प अभियानाच्या यशासाठी शिवसेना, युवासेना, विद्यार्थी सेना व महिला आघाडी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पुढाकार घेतला.

# दिव्यांगांची वारी; चालली विठ्ठलाच्या दारी, सेवा समर्पणचा उपक्रम

## यवतमाळच्या ३० दृष्टीहिनांचा सहभाग; आमदार बाळासाहेब मांगुळकर यांचा पुढाकार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.१५:** पंढरपूरच्या पांडुरंगाच्या ओढीने संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी विठ्ठलाच्या भेटीसाठी निघाले आहेत. याच वारीमध्ये यवतमाळमधील सेवा समर्पण प्रतिष्ठानतर्फे ३० तरुणांनी पायी वारी करत सहभाग घेतला आहे. दृष्टिहीन वारकऱ्यांच्या या दुसऱ्या वर्षातील वारीचे उद्घाटन रविवारी (दि. १५) सकाळी दि. ९ वाजता स्थानिक सिद्धी विनायक मंदिरातून संत सूरदास महाराजांच्या पालखी पूजनाने झाले आणि ही दिंडी पंढरपूरकडे मार्गस्थ झाली.





आमदार बाळासाहेब मांगुळकर आणि तहसीलदार डॉ. योगेश देशमुख यांच्या हस्ते पालखीचे पूजन करून वारीला रवाना करण्यात आले. या प्रसंगी सेवा समर्पण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रशांत बनगीनवार, सचिव अनंत कौलगीकर, संचालक सुरेश राठी, दीपक बागडी, डॉ. आलोक गुप्ता यांच्यासह प्रा. डॉ. माणिक मेहरे, दत्ता देशपांडे, शैलेश देशकर उपस्थित होते. या वारीचे सह-आयोजक ईसीई इंडिया, सोलार पॅनेल उत्पादक कंपनीचे संचालक श्रीकांत तिखिले, व्यवस्थापक स्वप्नील चापरणे, संकल्प फाउंडेशनचे प्रलय टिप्रमवार, तसेच पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यवतमाळयेथील सेवा समर्पण प्रतिष्ठान आणि दिव्यांग सेवा समितीने गेल्या वर्षी प्रथमच दृष्टिहीनांची पायी वारी सुरू केली होती. सेवा समर्पण संस्थेमध्ये ३० दृष्टिहीन वास्तव्य करतात. या दृष्टिहीनांना पंढरपूरच्या वारीत घेऊन जाण्याची कल्पना संस्थेचे अध्यक्ष प्रशांत बनगीनवार यांनी मांडली आणि हा अभिनव उपक्रम सुरू झाला. यावर्षीही ही वारी संत सूरदास यांच्या प्रतिमा व पादुका घेऊन पंढरपूरला विठ्ठलाच्या भेटीसाठी निघाली आहे. आर्णी, दिग्रस, पुसद, कळमनुरी, परभणी, परळी, आंबेजोगाई, कुर्डुवाडी, पंढरपूर असा २२ दिवसांचा आणि ५२१ किलोमीटरचा पायी प्रवास करून ही वारी पंढरपूर येथे पोहोचणार आहे. दररोज किमान २० ते २५ किलोमीटरचा प्रवास केला जाणार असून, वारीच्या मार्गावर भजन, कीर्तन असे कार्यक्रमही घेतले जातील. या वारीत २५ दृष्टिहीन मुले आणि ५ मुली, तसेच १० कार्यकर्ते असे एकूण ४० वारकरी सहभागी झाले आहेत. वारीसोबत तीन वाहने असून, सेवा समर्पण संस्थेचे प्रशांत आणि प्राची बनगीनवार, प्रशांत परसोडकर व प्रमोद जनगडे यांचे कुटुंब दृष्टिहीन बांधवांसोबत पूर्णवेळ आहेत. या अनोख्या वारीसाठी समाजात विविध स्तरांतून आर्थिक व इतर सहकार्य मिळत आहे. या वारीला पंढरपूरकडे रवाना करण्यासाठी शहरातील अनेक नागरिक आणि विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पंढरीच्या वारीचे आगळेवेगळे स्वरूप

**पंढरीची वारी ही महाराष्ट्र संस्कृतीचा अविभाज्य भाग आहे. दृष्टिहीन बांधवांनी पायी वारी काढण्याचा निर्णय हा त्यांच्या अदम्य इच्छाशक्तीचे आणि श्रद्धेचे प्रतीक आहे. शारीरिक मर्यादा असूनही विठ्ठलाच्या भेटीची त्यांची ओढ ही इतरांसाठी प्रेरणादायी आहे, ज्यामुळे वारीचे महत्त्व आणखी वाढले आहे.**